
# शरच्चंद्र मुक्तिबोध

# नवी मळवाट



REFBK-001-092

REFBK-0014092

मौज प्रकाशन गृह

मुंबई चार

विषय काव्य
सं. क्र. ७६८

# शरच्चंद्र मुक्तिबोध



## शरच्चंद्र मुक्तिबोध

# नवी मळवाट



REFBK-0014092

REFBK-0014092

मौज प्रकाशन गृह

मुंबई चार

मौज प्रकाशन : ९३

दुसरी आवृत्ति : जून १९६४

© १९६४, सौ० सुरेखा मुक्तिबोध

**किंमत सहा रुपये**

चित्रकार :
केशव फडके

पहिली आवृत्ति :
वीणा प्रकाशन, नागपूर
२३ ऑक्टोबर १९४९

मुद्रक :
वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

प्रकाशक :
वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह,
खटाववाडी, मुंबई ४

माझ्या आईवडिलांस

३७७१७
१६-९

# अनुक्रम

प्रस्ताविक — नऊ

नवी मळवाट — १
पिऊनिया पोसली जी नवे तुषार — २
नवी कविता — ४
जीवाची प्रचंड फेक — ५
भविष्याच्या गर्भातल्या बाळाचें रुदन — ९
कुणाच्या वेदना — १३
रुधिराच्या लाल सड्यांतच — १५
कष्टाचें गीत — १८
गभीर झडते गगनदुंदुभि — १९
माझ्या पीडेला अर्थ येईल — २७
छंदांच्या लहरींवर लहरी — ३३
उसळला वरती तेजोगोल — ३५
नको मनाला हळहळ असली — ३७
मळकें उदास — ३९
हिंवाळ्याचा परिचित गूढ गार अंधकार — ४१
सांज ये हळूहळू — ४३
विसर क्षणाचें मृदु नातें — ४४

युगांच्या नंतर ४६
वर्षागम ४८
विस्मय ४९
किती मधुर जादु ही ५०
म्हातारे शब्द ५२
त्रिशंकूचें स्वप्न ५४
स्वप्नसाक्षात्कार ६१
आज कशानेशी मला
येईनाशी झाली झोप ६४
फिरून आले— ७२
शिशिरांतील पौर्णिमा ७५
लाल कंदील ७८
असेंच आहे कांही ८२
अंत आहे तसा आरंभ आहे ८५
सूर्य-युग ९४

*परिशिष्ट :*

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना ९७

# प्रास्ताविक

'नवी मळवाट' हा काव्यसंग्रह १९४९ सालीं प्रसिद्ध झाला. आज त्याची दुसरी आवृत्ति निघत आहे. दरम्यानच्या काळांत काव्याचें स्वरूप व काव्यदृष्टि या दोहोंत बराच बदल घडून आलेला आहे. आजची विशुद्ध कलावादी काव्यदृष्टि तेव्हा अस्तित्वांतच नव्हती असें नाही. मर्ढेकर स्वतः कलातत्त्वचर्चा करीत होते व प्रत्यक्ष काव्यसमीक्षा करून दाखवीत होते. ही विशुद्धकलावादी काव्यदृष्टि आज सर्वमान्य झालेली आहे. काव्याची आविष्कारविषयक जाणीवहि सखोल आणि सूक्ष्म बनली आहे. काव्यसमीक्षक व कवि आज काव्यविचाराच्या एकाच पातळीवर उभे आहेत.

पहिल्या आवृत्तींत मीं नवकाव्याच्या जाणिवांना जन्म देणाऱ्या सामाजिक पार्श्वभूमीचें पृथक्करण केलें होतें. मर्ढेकरांच्या काव्यांतील नैतिक निराशा व्यक्तिवादी मानवतावादामधून जन्माला आलेली आहे व त्यांचें काव्य ऱ्हासशील काव्यपरंपरेंत बसणारें आहे, असें मीं सुचविलें होतें. मानवी जीवनांतील विनाशाबद्दल माणसाच्या मूलभूत स्वभावाला जबाबदार न धरतां समाजव्यवस्थेला जबाबदार धरलें पाहिजे, अशी जाणीव असणाऱ्यांची दुसरी एक आशावादी काव्यपरंपरा मीं कल्पिली होती. मात्र, या काव्यपरंपरेंतील कवींच्या नांवांचा मीं जाणूनबुजून उल्लेख केला नव्हता. अनिलांची मुक्तछंदाची कामगिरी व पुरोगामी अर्थाचीं प्रदीर्घ काव्यें मजसमोर होतीं. पण त्यांचीं हीं काव्यें निव्वळ बौद्धिक सहानुभूति दर्शविणारीं होतीं: त्यांत सखोल अनुभवाचा अभाव होता. आधुनिक काव्यांत म० मो० कुंटे यांची कामगिरी ज्या स्वरूपाची मानली जाते, कांही अंशीं त्याच स्वरूपाची कामगिरी अनिलांची. कुंट्यांच्या विचारांची तडफ व धाडस अनिलांमध्ये

नसलीं तरी त्यांनी युगधर्मानुकूल काव्यविचार मांडले व तशी रचना केली यांत संशय नाही. पुरोगामी कवींची लोकजीवनाबद्दलची जाज्वल्य निष्ठा व वैश्विक जाणिवेची अस्सल प्रचीति अनिलांच्या काव्यांत नाही, हें मला तेव्हाहि अगदी स्पष्टपणें जाणवलें होतें. करंदीकरांच्या काव्याची तेव्हा नुकतीच सुरुवात झाली होती. खरें म्हणजे, आशावादी काव्यपरंपरा कल्पिण्याचें कारण वेगळेंच होतें. स्वातंत्र्योत्तर काळांतील संक्रमणावस्थेंत आजवर अप्रकट राहिलेल्या सर्व विसंगति डोकें वर काढतील व मानवी स्वातंत्र्याचा व समतेचा संघर्ष भारतांत सर्वव्यापी बनून समाजवादी निष्ठा ही कवींच्या प्रत्यक्ष प्रचीतीची व त्यांच्या समग्र व्यक्तित्वाला नैतिक आवाहन देणारी जाणीव ठरेल, असा माझा विश्वास होता. हें भविष्य चुकलें, व भारतीय समाजाने नव्या वळणाने वाटचाल केली. हा माझ्या विचारसरणीचा दोष होता असें मला अजूनहि वाटत नाही. दोष असेल तर तो अपुऱ्या निरीक्षणाचा व जाणिवेचा होता असेंच म्हटलें पाहिजे. म्हणून आशावादी परंपरेचा विचार पुस्तकांतच राहिला व मर्ढेकरांच्या काव्यांतील अभिव्यक्तिविलक्षण वृत्तीचाच गेल्या दहापंधरा वर्षांत प्रामुख्याने विकास होत राहिला. मर्ढेकरांची सहानुभूति थोर होती. ते निराशावादी कवि असले तरी केशवसुतांइतकेच मानवनिष्ठ होते. केशवसुत आशावादी-मानवतावादी तर मर्ढेकर निराश-मानवतावादी. एकीकडे मानवी व्यक्तित्वाच्या सामर्थ्याबद्दल पूर्ण आशा व अभिमान तर दुसरीकडे त्याबद्दलची संपूर्ण निराशा व (क्वचित् तुच्छतामूलक) अनुकंपेचा भाव. सरंजामी संबंध व जीवनकल्पना नष्ट करून वर येणाऱ्या मध्यमवर्गीय व्यक्तिवादाचा क्रांतिकारक उत्कर्ष एकीकडे, तर दुसरीकडे कुचंबलेल्या मध्यमवर्गांतील एकाकी व्यक्तींची संबंध-विच्छेदाची वेदना. केशवसुतांना दिव्य भविष्याचें दृश्य दिसत होतें, तर मर्ढेकरांच्या डोळ्यांच्या भिंती झालेल्या होत्या. मात्र पुढे केशवसुतांपासून मर्ढेकरांपर्यंत बाह्य जगाशीं चाललेला हा कवींचा संवाद मर्ढेकरपरंपरेंतील कवींनी अजिबात बंद करून टाकला. मर्ढेकरांच्या तुच्छतावृत्तीच्या मागे एक वास्तवदर्शी, उदास झालेलें, गंभीर व अगतिक व्यक्तित्व उभें होतें—एक माणूस उभा होता. आज जीवनसंदर्भांत जगणारा

माणूसच निघून गेलेला आहे व नवकाव्याने वेगळीच वाट धरली आहे. मर्ढेकरांच्या अश्रद्ध बनलेल्या व्यक्तित्वाकडून आजच्या कवींनी सौंदर्याचें तत्त्व घेतलें, व्यक्तिनिष्ठा व अभिव्यक्ति-विलक्षणता घेतली व याच गोष्टींना मध्यवर्ती स्थान दिलें. आज याच परंपरेला विशेष महत्त्व आहे.

अशा वातावरणांत 'नवी मळवाट'ची दुसरी आवृत्ति निघत आहे. या काव्यामागील मनोवृत्ति व भूमिका ओळखणें आजच्या घटकेला कदाचित् तितकेंसें सोपें राहिलेलें नाही. अशा परिस्थितींत 'नवी मळवाट'च्या काव्यामागील प्रेरणांचें वर्णन करण्याचा, त्यामागील भूमिका विशद करण्याचा मी प्रयत्न करणार आहें. त्यावरून माझ्या एकंदर काव्याविषयींहि मी कांही सांगितल्यासारखें होणार आहे. 'नवी मळवाट'च्या पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना मी माझ्या परीनें पूर्ण तटस्थ राहून लिहिली होती, तशीच हीहि प्रस्तावना लिहिण्याचा मी प्रयत्न करणार आहें. विचारांच्या ओघांत कोठे आत्मसमर्थनाचा किंवा समकालिनांसंबंधी अनुदार वृत्तीचा भास होत असल्यास तो भासच आहे असें निश्चित समजावें. चालू काव्याच्या तारतम्यासधून माझ्या कवितेसंबंधी चर्चा करण्याचा विचार असल्यामुळे समकालीन काव्याची चर्चा करणें मला आवश्यक वाटतें एवढें मात्र खरें.

. २ .

मर्ढेकरांनंतर त्यांच्या परंपरेंतील काव्याचें स्वरूप बदललें. कविमन —जाणिवेच्या पातळीवर—बाह्य जगापासून अलग झालें. कवि स्वतःच्या व्यक्तित्वाबाहेरील जीवनाशीं समरस होण्याचा, तें न्याहाळण्याचा, त्यावर भाष्य करण्याचा प्रयत्न करीनासा झाला. रविकिरण मंडळांतील सत्कवींप्रमाणे तो कौटुंबिक जीवनासंबंधी अथवा भोवतालच्या सामाजिक जीवनासंबंधी जिव्हाळ्याचा भावदेखील व्यक्त करीनासा झाला. मर्ढेकरांनी मानवी जीवनांतील दुहेरीपणा ज्या मूलभूत अस्तित्ववादी (Existentialist) जाणिवेंतून दाखविला होता त्यामधील दंभस्फोटात्मक प्रवृत्तीच तेवढी या परंपरेंतील कवीने कधीमधी घेतली. अर्थात्, सामाजिकता ही कांही

आजच्या काव्याची खरीखुरी प्रवृत्ति नव्हे. या काव्याच्या एकंदर स्वरूपाची स्थूल चर्चाच आता आपणांस करावयाची आहे.

(अ) आजच्या काव्याचें पहिलें आणि प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तें प्रयोगवादी आहे हें होय. मर्ढेकरांनी केलेल्या प्रयोगामागे एक विशिष्ट असें उद्दिष्ट होतें. त्या प्रयोगाद्वारा त्यांना विवक्षित आशय व्यक्त करावयाचा होता. याच्या उलट, काव्यरूपांचे नित्य नवे प्रयोग करीत राहणें हाच आजचा कविधर्म होय. याच वृत्तीचा प्रभाव अर्थात् आजच्या जुन्यानव्या अनेक कवींवर पडलेला आहे. परंतु, पु० शि० रेगे, विंदा करंदीकर व चित्रे यांचीं नांवें प्रातिनिधिक प्रयोगवादी कवि म्हणून डोळ्यासमोर ठेवण्यास हरकत नाही.

प्रयोगवाद्यांपैकी पु० शि० रेगे हे एक श्रेष्ठ कवि आहेत. अनिल-मर्ढेकरांच्या पूर्वीपासून स्वतंत्रपणें त्यांनी या वाटेवर निष्ठेने पावलें टाकावयाला सुरुवात केली होती. आज या क्षेत्रांत त्यांनी मोठीच सिद्धि मिळविलेली आहे. एकोणिसाव्या शतकांतील मेलार्मे या कवीप्रमाणे त्यांनी स्वतःची स्वतंत्र अशी काव्यभाषाच निर्माण केलेली आहे. रेगे हे शब्दानुभवी कवि आहेत. शब्दांच्या व शब्दसंहतींच्या नादरूपात्मक संवेद्य शक्तींचा जणू कांही अर्कच काढून घेऊन ते एक नागर असा शब्दबंध तयार करतात व त्याद्वारें अनेक सादपडसादयुक्त अशा, अमूर्त व मनोरम मनोवस्था साकार करीत असतात. त्यांच्या शब्दबंधाची रचना ही व्याकरणानुसारी न होतां शब्दांच्या संवेदक शक्तींच्या ताळामेळांतूनच होत असते. शब्दांसंबंधीची त्यांची जाणीव अतिशय सूक्ष्म असून त्याद्वारें त्यांनी शिल्पित केलेली अनुभूति मराठी काव्यक्षेत्रांत तरी अपूर्व होय यांत शंका नाही.

प्रयोगवादी कवींमध्ये ज्यांचें नांव आज विशेष गाजत आहे असे दुसरे कवि म्हणजे विंदा करंदीकर हे होत. मुक्तसुनीतांपासून तालचित्रांपर्यंतचा त्यांचा प्रवास गाजलेला आहे. शब्द व शब्दक्रम यांच्याऐवजी प्रतिमा व प्रतिमाक्रम यांनाच त्यांच्या काव्यांत विशेष महत्त्वाचें स्थान मिळालेलें आहे. करंदीकरांच्या 'मृद्गंध'मधील समाजविषयक भावना पुढे हळूहळू क्षीण होत गेली व त्यांची प्रतिभा निरनिराळे आकृतिविषयक प्रयोग करण्यांतच

रमूं लागली. प्रतिमा हें त्यांचें मुख्य काव्यसाधन होय व शारीर-संवेदनात्मकता हा त्यांच्या काव्यानुभवाचा प्रमुख गुण होय. संवेदक प्रतिमांच्या विवक्षित रचनांमधून ते स्वानुभवास आकार देतात. व प्रतिमारचनेचे नवनवे विलक्षण प्रयोग करीत असतात. करंदीकरांच्या काव्यांत रचनाबंधाला मध्यवर्ती महत्त्व आहे. सामाजिक-राजकीय विषयापासून काव्याला सुरुवात करून अमूर्त संवेदनात्मकतेपर्यंत त्यांच्या काव्याने प्रवास केलेला आहे.

या दोन कवींच्या बरोबरीने व प्रयोगवादी दृष्टींतून काव्यरचना करणारे कवि म्हणजे दिलीप चित्रे हे होत. पु० शि० रेगे हे आपल्या विलक्षण भाषेच्या द्वारा एक नितळ मनोवस्था निर्माण करतात, करंदीकर स्वतःचा संवेदनाप्रधान अनुभव आपल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमा-तंत्रांतून साकार करतात, तर दिलीप चित्रे ह्यांची प्रवृत्ति या दोघांपेक्षा भिन्न स्वरूपाची आहे. त्यांच्या काव्यांतून प्रकट होणारी प्रचीति ही मुख्यतः ऐंद्रिय स्वरूपाची वा निव्वळ मनोवस्थाप्रधान नाही. ही जाणीव आत्मनिष्ठ तर खरीच पण मुख्यतः ती व्यक्तिकेंद्री आहे. आजच्या विसंगत जीवनांतून स्वतःच्या अलगपणाच्या धारदार संवेदना, वासना व कल्पना निरंतर भोगणाऱ्या व त्याचे पापुद्रे उलगडूं पाहणाऱ्या कवीचें हें काव्य आहे. बाहेरचें जग अलगपणाच्या या विपरीत जाणिवेंत शोषलें जाऊन निरनिराळ्या प्रयोगात्मक प्रतिमाबंधांचें रूप घेऊन त्यांच्या काव्यांत प्रकट होतें. चित्र्यांचा शब्दांच्या व प्रतिमांच्या मंत्रशक्तीवर मोठा विश्वास आहे व संवेदक शक्तीने रसिकाच्या नेणिवेला ढवळून टाकणारे प्रतिमाप्रेरक शब्द ते वापरूं शकतात. परंतु अभिव्यक्तिविषयक व शब्दविषयक जागरूक चिंतन व मौलिक प्रतिमानिर्मिति यांवर अजून त्यांचा विशेष भर आहे. अतिरिक्त भावनाप्रधान व एकाकी वृत्तीमुळे त्यांच्या व्यक्तित्वाचें नातें रिल्के व काफ्का या कलावंतांशीं तसेंच एकोणिसाव्या शतकांतील फ्रेंच कवींशीं प्रकृतिदृष्ट्या जवळचें आहे. मर्ढेकरी परंपरेचा अतिव्यक्तिवादी आविष्कार, असें चित्र्यांच्या काव्याचें वर्णन करतां येईल. अत्याधुनिक युरोपीय जाणिवेंतून कविता लिहिणारा आणखी एक दुसरा प्रतिभाशाली कवि म्हणजे अरुण कोलटकर. या सर्वच कवींच्या काव्यरचनेचें समान वैशिष्ट्य म्हणजे प्रयोगशीलता हें आहे, असें म्हणतां येईल.

(आ) आजच्या काव्याचें आणखी एक महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे तें प्रतिमाप्रधान आहे. अर्थात् नवकाव्याचें हें वैशिष्ट्य अगदी आरंभापासूनचेंच आहे. मर्ढेकरांच्या कविता नव्या प्रतिमांमुळेच विशेष गाजल्या. या गोष्टीचा येथें स्वतंत्र उल्लेख करण्याचें कारण, आशय-अभिव्यक्ति संबंधांत घडून आलेला बदल हें होय. आज प्रतिमांचें प्रयोजन बदललें आहे. प्रतिमेला व प्रतिमा-बंधाला आज मध्यवर्ती स्थान मिळालेलें आहे. आजची प्रतिमा साधनरूप (functional) राहिलेली नाही. ती प्रयोजनशून्य आहे असेंहि म्हणतां येईल. तें या अर्थी की, आता अनुभवाच्या जागीं प्रतिमासृष्टीच तेवढी उभी असते. आजच्या काव्यांत शब्दप्रतिमायुक्त असा एकच एक अनुभव साकार व्हावयाचा असतो. त्याद्वारा आणखी वेगळें असें कांहीच साकार व्हावयाचें नसतें. अर्थात् कोठेंकोठे या प्रतिमेला प्रतीकाचें (symbolचें) रूप मिळूं शकतें हें उघड आहे, व तसें तें क्वचित् मिळतेंहि. परंतु तसें प्रतीकरूप येण्या करिता कवीची अनुभूति दार्शनिकाच्या पातळीवर सतत असावी लागते. या बाबतींत रिल्केचें उदाहरण घेतां येईल. आत्यंतिक व्यक्तिनिष्ठेंतून, त्या भयानक एकाकीपणांतूनहि रिल्केची निष्ठा ही अशी आहे : "...Yet no pain has been able or shall be able to tempt me into giving false testimony about life as I recognize it." आपले प्रतिमावादी कवि मात्र मुख्यतः प्रतिमानुभवच उभा करतात असें म्हणणें भाग आहे.

(इ) तिसरा महत्त्वाचा विशेष म्हणजे आजची कविता मुख्यतः अमूर्त स्वरूपाची (abstract) आहे. तें या अर्थी की प्रत्यक्ष जीवनदर्शनात्मक व जीवनसंदर्भमूलक अशी आजची कविता नाही. ती पुरेशी प्रतीकवादीहि (symbolical) नाही, याचें मुख्य कारण आपल्या प्रतिमेंतून सूक्ष्म जीवनसत्यांवर प्रकाश टाकूं पाहणारी तत्त्वज्ञाची प्रवृत्ति आजच्या काव्यामागे सातत्याने उभी आहे असें वाटत नाही. आजचें काव्य अमूर्त आहे याचें कारण, आज सुखदुःखात्मक समस्यांचे विवक्षित मानवसंबंध जाणिवेच्या कक्षेपलीकडे गेल्यासारखे वाटतात. आजचा कलावंत आपल्या कलेद्वारा कांही महत्त्वाचें सांगूं इच्छितो, पण तें त्याला स्वतःच्याच

संवेदनेंत (sensations), स्वतःच्या गोड हुरहुरवजा मनोवस्थेंत सापडतें. आजचें काव्य हें ऐंद्रियप्रतीतिप्रधान, संदर्भरहित, व्यक्तिमनोवस्था वा शारीर संवेदना यांना महत्त्व देणारें असें आहे. शब्दप्रतिमायुक्त अनुभव हाच आजचा काव्यगत अनुभव असतो. तो तेवढाच असतो व त्यापलीकडे फार थोडें असतें व असलेंच पाहिजे अशी अपेक्षाहि आज करावयाची नसते.

(ई) आजच्या काव्याचा चौथा महत्त्वाचा विशेष म्हणजे तें सौंदर्यवादी आहे, हें होय. अर्थात् आजचा सौंदर्यवाद व केशवसुतादि कवींचा कालचा सौंदर्यवाद (Romanticism) या मूलतः भिन्न गोष्टी आहेत. केशवसुतादि कवींच्या सौंदर्यवादाचें रहस्य त्यांच्या उत्कट स्वातंत्र्योन्मुख व्यक्तित्वांत व चैतन्यतत्त्वाशीं एकरूप होऊं पाहण्याऱ्या त्यांच्या वृत्तींत आहे. कविमनानें आदर्शाकडे घेतलेली ती प्रचंड झेप आहे. जीवनाच्या तीव्र प्रत्ययानें अनिवार बनलेला तो व्यक्तिमनाचा उमाळा आहे. केशवसुतादि कवींच्या रोमँटिसिझमचा संबंध जीवनविषयक वृत्तीशीं आहे. आजचा सौंदर्यवाद रूपसौंदर्याला महत्त्व देणारा आहे. लौकिक जीवनांतील ऐंद्रिय व आल्हादक संवेदनांमधून कलात्मक रचनाबंध निर्माण करणें ही या सौंदर्यवादाची खरी प्रवृत्ति आहे. आजचा सौंदर्यवाद म्हणजे मूल्यामूल्यविरहित वृत्तींतून जगाकडे इंद्रियाल्हादक रचनाप्रबंध निर्माण करण्याचें एक साधन म्हणून पाहणें. जीवननिष्ठा हें केशवसुतादि कवींच्या काव्याचें वैशिष्ट्य, तर प्रबंधविलक्षणता हें आजच्या सौंदर्यवादाचें लक्षण होय. रोमँटिक वाङ्मयाचा संबंध परंपरादृष्ट्या मागील संतवाङ्मयाशीं व पुढील पुरोगामी काव्याशीं (तसें निर्माण झाल्यास) जोडतां येतो, तर आजच्या सौंदर्यवादी काव्यप्रेरणेचा संबंध मागच्या पंडित कवींशीं व कलाकवींशीं सहज जुळवितां येतो. हे दोन भिन्न प्रवाह आहेत. जुन्या सौंदर्यवादी काव्याचे प्रवर्तक केशवसुत, तर नव्या रीतिवादी सौंदर्यवादाचे प्रवर्तक (विचारवंत) मर्ढेकर. एक परंपरा आशयप्रधान तर दुसरी अभिव्यक्तिप्रधान.

ही सौंदर्यवादी प्रवृत्ति मुख्यतः रेगे, संत या कवींमध्ये विशुद्ध स्वरूपांत व बोरकर, बापट, पाडगांवकर, कांत, इत्यादि कवींच्यामध्ये मिश्र स्वरूपांत आढळून येते. वस्तुतः प्रयोगवादी सर्वच कवि एका अर्थी सौंदर्यवादी

ठरतात; कारण त्या सर्वांचीच कविता अभिव्यक्तिविलक्षण असते, रचनात्मक सौंदर्याला महत्त्व देणारी असते. परंतु रेगे, संत, (व कांही अंशी) पाडगांवकर हे सौंदर्यवादी आहेत ते या अर्थानें नव्हे. यांना सौंदर्यवादी हें नांव द्यावयाचें तें, लौकिकांतील सुंदर दृश्यांचे व रंगसंवेदनांचे नितळ रचनाबंध निर्माण करणें ही या कवींची मुख्य प्रवृत्ति आहे, म्हणून. रेग्यांना रेशमी शब्दांची फार आवड आहे. मधुर, ललित, (कधीकधी दुर्ललित) शब्दांच्या गुणानुकूल रचनेंतून ते एक तशीच, बहुशः गर्भरेशमी, प्रणयमधुर मनोवृत्ति साकार करतात. त्यांच्या काव्यांतील अनुभूति अगदी समग्रतेने व सहज आकळतां, न्याहाळतां येते. या अनुभूतीची व रंगसंगतीची जात मोठी सुबक व सुखवस्तु असते. त्यांच्या कवितांची तुलना कधीकधी चिनी जलरंगांतील धूसर व सूक्ष्म रेषांच्या चित्रांशी करण्यांत येते; पण हें बरोबर वाटत नाही. कारण चिनी जल-रंगांच्या बाबतींत अनुभव असा आहे की, त्यांतील सूक्ष्म रेषांच्या स्पर्शानें अवकाशाला अनंताचें रूप मिळतें, व केवढा तरी आशयगर्भ अनंतस्पर्शी भव्य अनुभव साकार होतो. भव्यता, अनंतस्पर्शित्व, इत्यादि गुण रेग्यांच्या अनुभवक्षेत्रांत येणारे नाहीत. इंदिरा संतांची प्रतिमासृष्टि तशीच आल्हादकारक व रंगीबेरंगी आहे. त्यांची विरहानुभूति स्मृतिजन्य म्हणून स्थिरकेंद्री आहे. पुन्हा, ती त्यांच्या नियंत्रणांत पूर्णपणें असल्यामुळे पुष्कळदा साधनरूपच बनते. अभिव्यक्तीसंबंधीच्या विलक्षण जागरूकते-मुळे ही मुळांत विशुद्ध मानवीय असलेली अनुभूति ललित व नाट्यपूर्ण रूप धारण करते. बालकवींच्या सौंदर्यानुभूतीशीं या कवितेची तुलना करून पाहावी म्हणजे त्यांमधील फरक चटकन लक्षांत येईल. संतांच्या काव्यांत कुशल कारागिरी आहे, तर बालकवींच्या काव्यांत व्यक्तित्वाच्या आवेगाचें चैतन्य आहे. दवबिंदूचें सहजसौंदर्य व पैलू पाडलेला हिरा यांमध्ये फरक हा राहणारच. आधुनिक विशुद्ध कलावादी समीक्षकांनी बालकवींच्या ‘फुलराणी’चें उदाहरण (व विशेषतः सौंदर्याचीं समीकरणें सिद्ध करण्यासाठी मधूनच उचललेल्या एखाददुसऱ्या काव्यपंक्तीचें उदाहरण) वारंवार समीक्षणा-साठी खरें पाहतां घेऊं नये; कारण त्यामुळे बालकवींवर अन्याय होतो.

बालकवि हे रोमँटिक आहेत, तर इंदिराबाई या सौंदर्यवादी आहेत. मात्र, स्वतःच्या या मर्यादेपलीकडे इंदिराबाई अनेकदा जाऊं शकतात हेंहि कबूल केलें पाहिजे. करंदीकर-कोलटकर-चित्रे हे कवि रेगे-संत इत्यादि कवींप्रमाणे सौंदर्य-वादी (aesthetes) नाहीत, हे येथे स्पष्ट केलें पाहिजे. करंदीकर-चित्रे-कोलटकर यांच्या जाणिवा रेगे-संतांप्रमाणे सौंदर्यमूलक नाहीत हें उघड आहे.

आजचें सर्वच काव्य या प्रकारचें आहे असें मी म्हणत नाही. परंतु कुसुमाग्रज, बोरकर, इत्यादि कवींचें काव्य पूर्वीपासून वाचकांसमोर आहे व म्हणून त्यांचा उल्लेख येथे अप्रस्तुत ठरतो. ज्या काव्याला सर्वाधिक महत्त्व आजचे टीकाकार देत आहेत, नवकवींमध्ये ज्यांची प्रामुख्याने गणना होते आहे व मराठी काव्याला पुढे नेणारे म्हणून टीकाकारांनी ज्यांचा गौरव केला आहे, त्यांच्या काव्यासंबंधीच ही चर्चा आहे. केशवसुत-बालकवींनी मराठी काव्यांत सर्वांगीण क्रांति केली असली तरी ते प्रयोगवादी होते असें कोणीच म्हणणार नाही. त्यांनी क्रांति केली ती जीवनदृष्टीच्या बाबतींत, आशयाच्या बाबतींत. अभिव्यक्तींतील क्रांति अपरिहार्य परंतु आनुषंगिक अशीच होती. चालू काव्यांतील परिवर्तन हें अभिव्यक्तीच्या टोकाकडून झालेलें आहे. कवीचा प्रत्यय मुख्यतः अभिव्यक्तीचा प्रत्यय आहे व त्याच्या प्रज्ञेची सूक्ष्मता ही अभिव्यक्तीच्या अंगाने प्रकट होत आहे. अशा या परस्परभिन्न व विरुद्ध टोकाच्या प्रवृत्ति आहेत.

उक्त सर्वच कवि हे मान्यता पावलेले यशस्वी कवि आहेत व या ठिकाणीं त्यांच्या काव्याच्या स्वरूपाचेंच स्थूल वर्णन मला करावयाचें होतें. विशुद्ध कलावादी समीक्षकांनी त्यांचें मूल्यमापनहि केलेलें आहे. मर्ढेकरांनी घालून दिलेले निकष (त्यांच्या स्वतःच्या व बालकवींच्या काव्याला लागू पडत नसले, तरी ते) उक्त कवींच्या काव्याला बऱ्याच अंशीं लागू पडतात यांत संशय नाही.

. ३ .

मागे एकदा, एकोणीसाव्या शतकांतील फ्रेंच काव्यांतहि अशीच घडामोड झाल्याचें आपणाला दिसून येतें. ह्यूगो, म्यूसे वगैरे रोमँटिक

कवींच्या काव्यानंतर बॉदलेरपासून फ्रेंच काव्यांतील देखावा एकदम बदलून जातो. बॉदलेरमध्ये रोमँटिक तत्त्वें बरींच असलीं तरी त्याच्या काव्यापासून धारदार जाणिवेचें वेगळेंच काव्यविश्व फ्रेंच काव्यांत उदयास आलें यांत संशय नाही.

द्रव्याधिष्ठित भांडवलशाहीच्या पहिल्यावहिल्या भेसूर व निर्दय रूपाकडे पाहून फ्रान्समधील नवा कवि रेनेसांच्या सर्व मूल्यांकडे तुच्छतेने पाहूं लागला. तीं मूल्यें त्याला पोकळ वाटूं लागलीं. द्रव्यार्जनासाठी लागणाऱ्या मूल्यश्रेणींची व प्रवृत्तींची दक्षतेने लागवड करणारा, माणसाच्या नैसर्गिक परंतु अनुपयुक्त प्रवृत्तींना नाकारणारा, संकुचित धार्मिक प्रवृत्तीवर पोसला जाणारा, असा नवा मध्यम वर्ग त्या काळांत उदयाला आलेला होता. या परिस्थितीच्याविरुद्ध जोरदार प्रतिक्रिया म्हणून नवा कवि स्वतःच्या प्रवृत्तीवर व संवेदनांवरच विश्वास ठेवूं लागला. ज्या वर्गाविरुद्ध त्यानें हें बंड केलें होतें त्याच्या मूल्यश्रेणीच्या अगदी विरुद्ध अशा मूल्यांचा तो उद्घोष करूं लागला व वैयक्तिक मोक्षासाठी त्याने स्वतःचाच असा एक गूढवाद निर्माण केला. काव्यलेखन ही त्यांची साधनाच बनली. हे सर्व कवि सर्वस्वी कवि होते, हौशी कवि (dilettantes) नव्हते. त्यांच्या संपूर्ण व्यक्तित्वाने एका विवक्षित पातळीवरून केलेल्या जीवनशोधांतूनच त्यांचें काव्य जन्माला आलें. या फ्रेंच कवींचें लोण इंग्लंडांत गेल्यावर त्यांच्या कलातत्त्वांचा स्वीकार इंग्रजी कलावंतांनी (रॉसेटी, वाइल्ड, पेटर) केला; पण तो उथळ स्वरूपाचा होता असें मत सी० एम्० बावरा यांनी '*Symbolism*' या आपल्या पुस्तकांत प्रकट केलें आहे व तें योग्यच आहे असें वाटतें.

या फ्रेंच कवींचा उल्लेख करण्याचें कारण असें की त्यांचीं कलाविषयक तत्त्वें आजच्या मराठी काव्यांत विशेष महत्त्वाचीं ठरलेलीं आहेत. वर्ले, रिंबो, मेलार्मे इत्यादि कवींना तीं एका विवक्षित गरजेंतून गवसलीं व त्यांचा त्यांनी केलेला वापर हा त्यांच्या संपूर्ण जीवनसाधनेला व्यक्त रूप देणारा होता. या सर्वच कवींचा विचार एकोणिसाव्या शतकांतील मध्यमवर्गीय परिस्थितीच्या संदर्भांत करतां येतो व केला पाहिजे. एकोणिसाव्या शतकांतील फ्रान्समध्ये एकीकडे बौद्धिकक्षेत्रांत यांत्रिक (mechanistic) वैज्ञानिक

पद्धतीला विशेष महत्त्व आलें होतें; दुसरीकडे, कलाक्षेत्रांत, रोमँटिक काव्याचें क्रांतिकार्य संपून वक्तृत्वप्रधान, आभासनिष्ठ रोमँटिक काव्याची चलती होती. वास्तव जीवनांत एकीकडे गळेकापू स्पर्धा, पै-पै-जोडू वृत्ति, संकुचित आचार-निष्ठ धर्मदृष्टि इत्यादि गोष्टींना विशेष महत्त्व होतें, तर दुसरीकडे, जादूटोणा, जंतरमंतर इत्यादि गोष्टींवर सर्वसामान्यांचा विशेष विश्वास बसलेला होता. नव्या फ्रेंच कवींचीं व्यक्तित्वें अशा व्यावहारिक, स्वार्थकेंद्री मध्यमवर्गाच्या मुशींत सामावूं शकत नव्हतीं. या समाजाने जें जें निषिद्ध ठरविलें त्या त्या गोष्टीकडे, अंतःकरणांतील फार मोठ्या असंतोषामुळे, या कवींनी झेप घेतली. मध्यमवर्गाने संवेदना नाकारल्या, या कवींनी संवेदनेला मध्यवर्ती स्थान दिलें. मध्यमवर्गाने धार्मिक व व्यवहारनिष्ठ वागणुकीसाठी स्वर्गाचीं आमिषें दाखविलीं, तर या कवींनी तळजीवनाच्या नरकपुरीला जवळ केलें. निष्फळ नीरस बुद्धिवादाविरुद्ध यांनी आपापल्या प्रवृत्तीनुसार भिन्न, परंतु बुद्धिविरोधी (anti-rational) अशी समान भूमिका ठामपणे घेतली. खोटा प्रतिष्ठितपणा व आत्मप्रतारणेची प्रतिक्रिया म्हणून जें जें वर्ज्य मानलें गेलें होतें त्या त्या अनुभवांकडे हे कवि ओढले गेले व शारीर-मानस अनुभूतींना वर्जनारहित (inhibitionless) असें मध्यवर्ती स्थान त्यांनी दिलें. अशा रीतीने या कवींनी आपापल्या मोक्षाचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या अत्यंत विशिष्ट व पृथगात्म अनुभूतींतून जीवनसत्तेला (existence) स्पर्श करण्याचा जो प्रयत्न त्यांनी केला त्याचा आविष्कार म्हणजेच प्रतीकवादी (symbolic) काव्य. या नव्या काव्यानुभूतीने एकीकडे वास्तवाला स्पर्श केलाच व दुसरीकडे काव्याच्या क्षेत्रांतून वैचारिकतेला (ती खोटी ठरली होती) हद्दपार केलें व अगडबंब शब्दांच्या फापटपसाऱ्याची हकालपट्टी केली. स्वसंवेदनेंतून जीवनाच्या सारसत्याचा (essence) प्रत्यक्षानुभव देणारें तेंच खरें काव्य अशी गूढवादी भूमिका या कवींनी सामान्यतः घेतली.

रिंबो (१८५४–१८९०) या विलक्षण कवीचें काव्य फ्रान्समध्ये वर्लेनपेक्षाहि अधिक प्रभावी ठरलें. जीवनाच्या सर्व बऱ्यावाईट संकेतांना पार धुडकावून देऊन त्याने वामाचारी गूढवादाचा मार्ग पत्करला. शारीर-

मानस अशा तीव्र आत्मपीडेंतून, व आत्यंतिक स्वरूपाच्या यातनां मधून अंतिम रहस्याचा प्रत्यक्षानुभव घेण्याचा त्याचा प्रयत्न होता. हा अनिर्वचनीय अनुभव मूर्त करण्यासाठी नेहमीच्या तर्काधिष्ठित भाषेचा उपयोग करून भागणार नव्हतें. म्हणून शब्दांच्या संवेदक व उद्दीपक व्यापारांतून तो विलक्षण रहस्यात्मक अनुभव साकार करण्याचा त्याने प्रयत्न केला. त्याकरिता संवेदनांचें जाणीवपूर्वक अन्योन्यीकरण करणें ('इंद्रिया लागे कळंभा। एकमेका') त्याला आवश्यक वाटलें. वर्णमालेंतील प्रत्येक स्वराशीं संलग्न असलेल्या रंगाचें एक कोष्टकच त्याने तयार केलें होतें. ('दिसती नादींचे रंग थोडे') शब्दांच्या संवेदक शक्तींच्या द्वारा व त्यांच्या अन्योन्यीकरणाच्या द्वारा जो प्रतीकरूप विलक्षण प्रतिमाबंध साकार व्हावयाचा तेंच काव्य, असें रिंबोचें मत होतें.

रिंबोच्या विरुद्धचें टोक म्हणजे मेलार्मे कवि. रिंबोप्रमाणे त्याचें व्यक्तित्व संवेदनाधिष्ठित नव्हतें व तो वामाचारी गूढमार्गीहि नव्हता. रिंबोच्या अगदी उलट त्याचें जीवन होतें. मध्यमवर्गीय शाळामास्तराचें जिणें तो अगदी अलिप्तपणें बिनतक्रार जगला व अवेळींच सेवानिवृत्त होऊन स्वतंत्र झाला. आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र झाल्याबरोबर तो सौंदर्यचिंतनांत निमग्न राहूं लागला. मध्यमवर्गीय समाजाच्या जीवनापासून तो मनाने अगदी अलिप्त राहिला व म्हणून अगदी सामान्य साचेबंद जिणें पत्करूनहि त्याने चिंतनाच्या क्षेत्रांत एवढी आघाडी मारली होती की त्याचें घर म्हणजे तत्कालीन श्रेष्ठ विचारवंतांचें व कलावंतांचें एक तीर्थस्थानच होऊन बसलें होतें. गद्य हें तार्किक सुसंगतीवर अधिष्ठित असल्यामुळे काव्याची भाषा ही गद्य भाषेपेक्षा पूर्णपणें भिन्न असली पाहिजे असें त्याचें मत होतें. काव्यामधून कसलाहि तार्किक किंवा व्यावहारिक आशय प्रकट करावयाचा नसतो, म्हणून काव्यभाषा भिन्न असावी. काव्यभाषा म्हणजे एक स्वतंत्र भाषा-स्वर्गच (paradise of language). तर्कातीत व विचाररहित, अशा प्रत्यक्षापलीकडील सौंदर्यसत्याचें वस्तुनिष्ठ रूप साकार करावयाचें म्हणजे शब्दांना तर्कक्रमाने जवळ न ठेवतां, नादरंगात्मक ताळमेळांतून त्यांना परस्परांच्या जवळ ठेवावें व अशा रीतीने निर्माण झालेल्या 'विशुद्ध'

शब्दसंबोधामधून विश्वरहस्य आपोआपच प्रतीतिगम्य होऊं शकेल, अशी त्याची धारणा होती. शब्दांचा प्रभाव अधिक वाढविण्यासाठी त्याने आणखी एक युक्ति शोधून काढली. पानावरील मोकळी जागा व लिहिलेला शब्द यांचा कांही एक संबंध असतो हें त्याने ओळखलें. मोकळ्या जागेंत एका पद्धतीने लिहिलेला शब्द जेवढा प्रभावी ठरेल तितका तो अनेक शब्दांबरोबर नेहमीसारखा लिहिला असतां ठरावयाचा नाही हें त्याने जाणलें. म्हणून काव्याचें लेखनदेखील रूढ पद्धतीने न करतां तें विशिष्ट पद्धतीने तोडून लिहिणेंच अधिक प्रभावी कसें ठरतें हें त्याने सप्रयोग सिद्ध करून दाखविलें. म्हणजेच मोकळ्या जागेचा सृजनात्मक उपयोग त्याने करून घेतला. काव्य जेवढें संदिग्ध राहील तेवढेंच अधिक प्रभावी ठरेल असेंहि त्याचें निस्संदिग्ध मत होतें. मेलार्मेचें अबुद्धिवादी काव्यगत तत्त्वज्ञान तत्कालीन श्रेष्ठांनी आदराने ऐकलें. पांढरपेशा कवींचा हा बादशहा कमावलेल्या विशिष्ट अभिरुचीच्या लोकांमध्ये तर अत्यंत प्रिय ठरला.

इतर कवींचा विचार करण्याचें येथे कारण नाही. हे विचार आजच्या मराठी काव्यांत प्रचलित आहेत. ते मूलतः कोणत्या जीवनप्रक्रियेंतून जन्माला आले हें अगदी स्थूलपणें दर्शविण्यासाठी वरील माहिती दिली आहे. या कवींचें श्रेष्ठत्व हें त्यांनी केलेल्या निषेधांतून व घेतलेल्या शोधामधून (quest) जन्माला आलेलें आहे. आपल्या तीव्र निषेधामधून त्यांनी एका भिन्न पातळीवरील जीवनाचा शोध घेतला. त्यांचें काव्य श्रेष्ठतेच्या पदवीला जाऊन पोचतें तें केवळ त्यांच्या काव्यविषयक प्रयोगांमुळे नव्हे. एका सखोल मानसिक असमाधानांतून व शोधाच्या प्रवृत्तींतून, एका मोठ्या असंतुलनामधून अपरिहार्यपणें उद्‌भवलेलें प्रतिमाविश्व म्हणजेच त्यांचें काव्य. त्यांच्या काव्यरूपाची चर्चा त्यांच्या आध्यात्मिक संघर्षांच्या चर्चेशिवाय अशक्यच होय. त्या संघर्षामधून अपरिहार्यपणें उमललेलें रूप म्हणजेच त्यांचें काव्य होय. काव्याचें रूप म्हणजे आकृति नव्हे. आकृतीचा न्याय हा भूमितीय रचनेचा (design) न्याय. गणिती पद्धतीने तालतोलमेळाचा विचार केला तर तो सृजनशील कलेला लागू शकत नाही. या कवींच्या काव्यविचारांची व काव्याची अपरिहार्यता पाहावयाची तर

वेगळ्या मार्गाने प्रवास करावा लागतो व फार दूरवर जावें लागतें. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील मराठी कवींनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांतील फ्रेंच कवींच्या विचारांना आत्मसात् करण्याच्या मार्गाला लागावें याचें कारण काय असावें हा प्रश्न विचार करण्यासारखा आहे. केवळ अनुकरणवृत्ति हें कारण सांगणें अनुदारपणाचें तर खरेंच, पण त्याहूनहि तें खरें कारण ठरणार नाही. त्यापेक्षा समान जीवनपरिस्थिति असें मी म्हटल्यास तें चुकीचें ठरूं नये. आजच्या मराठी कवींचें बंड जेवढें वाङ्मयीन आहे तेवढें मानसिक आहे की नाही, हा प्रश्न मात्र विचार करण्यासारखा आहे.

.४.

केशवसुतांच्या व्यक्तिस्वातंत्र्याधिष्ठित मानवतावादाची क्रांतिकारकता ओसरून मर्ढेकरांच्या व्यक्तिवादी मानवतावादाची कविता पुढे आली. ज्या मध्यमवर्गाने सरंजमशाहीच्या गर्भांतून वर येऊन भारतीय सामाजिक, राजकीय क्रांतीचें अग्रेसरत्व केलें त्या क्रांतीचे अग्रदूत कवि केशवसुत. या विचारसरणींतून जन्माला आलेल्या व प्रतिष्ठित झालेल्या भांडवलशाहीनें व साम्राज्यवादानें पुढे स्वतःचें विध्वंसक रूप प्रकट केलें. या सर्व प्रकाराकडे अगतिक परंतु अंतर्भेदी दृष्टीने पाहणारे, मानवी सामर्थ्याबद्दल निराश झालेले कवि मर्ढेकर. मराठी मध्यमवर्गाच्या एका ऐतिहासिक अवस्थेंतील काणिवेंतून मानवी जीवनाच्या एका बाजूचा तलस्पर्शी वेध घेणारें काव्य म्हणजे मर्ढेकरांचें काव्य. मध्यमवर्गीय मनाला हें विसंगतिदर्शक काव्य एकदम पटलें. विशेषतः काळोखाची घोंगडी पांघरून येणाऱ्या अनंतालाहि त्याच्या नेणिवेनें एकदम मान्यता दिली. 'घडल्या गोष्टी विसरुन जा अन् नडल्या आशा चुलींत फेका' व 'अज्ञानाच्या गळफासांतच जरा जगा अन् जरा जगूं द्या'च्या तत्त्वज्ञानाचें तर त्याने समाधानानें स्वागत केलें. कारण 'खरें सत्य', रोज अनुभवाला येणारें सत्य, तें हेंच. स्वतःच्या अनुभवाला येत नाही तें सत्य कसलें? पुन्हा मर्ढेकरांच्या काव्याचें स्वागत मोठ्या शहरांतील अत्याधुनिक बुद्धिवादी

मनानें जसें केलें तसें इतर ठिकाणीं होऊं शकलें नाही. (कामूच्या absurdity वगैरेसारख्या कल्पना आजकाल स्वतःसिद्ध सत्यासारख्या या क्षेत्रांत मानल्या जातात.) मर्ढेकरांच्या निराश, परंतु उत्कट माणुसकीचा संबंध एकीकडे जसा केशवसुतांपर्यंत जाऊन पोचतो तसेंच काव्यांतील अबुद्धिवादामुळे व अभिव्यक्तिविलक्षणतेमुळे त्यांचें काव्य आजकालच्या प्रयोगवादी, सौंदर्यवादी काव्याच्या उगमस्थानीं आहे. केशवसुतांच्या मानवतावादाची, व्यक्तिस्वातंत्र्यवादाची ऐतिहासिक परिणति म्हणजे आजचा पराभूत मानवतावाद, काळोखाशीं आपलें नातें असल्याची सखोल प्रतीति. सरंजामशाहीविरोधी मध्यमवर्गाच्या उत्कर्षातून वैश्विक स्वातंत्र्याचें चैतन्य अनुभवणारे केशवसुत, मध्यमवर्गाच्या अगतिक अवस्थेंतून सर्व स्वप्नांचा चुराडा झाल्याची वैश्विक जाणीव असलेले व गुंतागुंतीच्या जगाकडे उदासतेच्या जहरी पण कांचेच्या डोळ्यांनी पाहणारे मर्ढेकर. मर्ढेकरांनंतर त्यांचा मानवतावाद टिकणें शक्यच नव्हतें. त्यांनी पुढे आणलेल्या आकृतिवादांतून व यांत्रिक सौंदर्यविचारामधून जी परंपरा पुढे आली ती मर्ढेकरांच्या ' उदंड मानवते 'ला विसरली यांत नवल नाही. फ्रेंच कवींप्रमाणे प्रत्यक्ष बंडखोरी करून नव्हे, तर सांगण्यासारखें विशेष कांहीच न उरल्यामुळे नव्या कवींनीं वेगळ्या दिशेनें चालावयास सुरवात केली, व आजचें वैशिष्ट्यपूर्ण काव्य निर्माण झालें. फ्रेंच कवि व या शतकांतील रिल्के व काफ्कासारखे कलावंत आपल्या निराशेमधून जीवनसत्याच्या एका अंगांत जसा खोलवर प्रवेश करतात, तसें आपल्या प्रयोगवादी–सौंदर्यवादी कवींच्या बाबतींत म्हणतां येईल की नाही याबद्दल मला संशय वाटतो. एकोणिसाव्या शतकांतील फ्रेंच जीवनांत जी ऐतिहासिक प्रक्रिया चालू होती, संवेदनशील मनांच्या पदरीं जी तीव्र निराशा आलेली होती, तशीच परिस्थिति भारतीय जीवनांत, निदान मध्यमवर्गाच्या बाबतींत तरी, आज आहे. ' नडल्या आशा चुलींत ' फेकल्यानंतर आता मराठी कवि साहजिकच प्रयोगवादी व सौंदर्य-वादी बनलेला आहे. त्याच्यामध्ये फ्रेंच कवीची ती सर्वांतःकरणपूर्वक एकाग्र साधना, ती अन्वेषक वृत्ति नसेल, (तसें स्वतःच्या वर्गाशींहि त्याचें फारसें बिनसलेलें नाहीच) परंतु बाह्य परिस्थिति मात्र दोहोंच्या बाबतींत समानच

आहे, व कवीची मानसिक अवस्थादेखील तितकीशी उत्कट नसली तरी, सारखीच आहे. आजच्या मराठी कवीला उक्त फ्रेंच कवींच्या काव्यांत स्वतःला अनुकूल असें अभिव्यक्तिवादाचें तत्त्वज्ञान तयारच मिळालें व त्याचा त्याने आपोआपच स्वीकार केला असें म्हटलें पाहिजे.

.५.

व्यक्ति-परिस्थितीच्या तीव्र व जागरूक द्वंद्वाच्या अभावीं अत्याधुनिक काव्यांत अत्याधुनिक जाणिवा वस्तुनिष्ठपणें प्रगट होत आहेत, असें म्हणतां येत नाही. आजच्या मानवाची, मानवी मनःस्थितीची, ज्ञानात्मक प्रचीति (realization) हा या काव्याचा विषयच नव्हे. व या काव्याला ही कसोटी कोणी लावीतहि नाही. कारण तसें करणें अन्यायाचेंच ठरेल. परंतु रेगे मधूनच 'सार्त्रे विश्वासाने' पाऊल उचलूं पाहतात, तें मात्र बरोबर नव्हे. कारण 'सार्त्रे विश्वासाने' पाऊल टाकूं पाहणें, 'We are condemned to choose' हें अनुभवणें, हें कांही एका क्षणाचें काम नव्हे व हा कांही नुसताच साधा संवेदक शब्दहि नव्हे. अस्तित्ववादामागे मानवी अनुभवाचा अभेद्य अंधार आहे व त्यांत कोणीं तरी सतत ठिणग्या झाडायचा प्रयत्न केलेला आहे. सार्त्रेसारख्या कलावंताला गवसलेला—त्याने अधिक अर्थपूर्ण केलेला—अस्तित्ववाद म्हणजे एक कविधर्म आहे. प्रस्थापित व आकर्षक विचार म्हणून एखादा विचार उचलणें वेगळें व स्वतःच्या अनुभवांतून तो प्रत्ययाला येणें हें वेगळें. करंदीकरांच्या काव्यालाहि आपलें संवेदनाधिष्ठित अनुभवविश्व सोडून मधूनच 'सामाजिक' दंभस्फोट करावासा वाटतो, तेव्हा ते संन्याशालाच सुळीं देतांना बहुशः दिसतात; कारण तोच तेवढा समोर दिसतो. त्यांचें अशा स्वरूपाचें काव्य म्हणजे प्रतिमेच्या भाषेंतील सत्कारात्मक व धिक्कारात्मक असा एकेरी उद्गारच असतो. चित्रे-कोलटकरांचा काव्यानुभव अधिक वास्तविक, अंतर्गत दाबांतून निर्माण झालेला दिसतो. ते स्वतःच्या अनुभवाच्या डोहांत खोलवर उतरूं पाहतात व त्यामुळे ते स्वभावतःच प्रतीकवादी युरोपीय कवींच्या जवळपास जाऊं शकतात. त्यांचें काव्य प्रतीकवादाच्या जवळपास जाऊं शकतें, असें

मला तरी वाटतें. संक्रमणावस्थेंत, विशेषतः ज्या काळांत मागील-पुढील श्रद्धा नष्ट झालेल्या असतात त्या काळांत, कलावंताला कलावंत या नात्यानेच विचारवंत व्हावें लागतें, व त्याचे अनुभवात्मक विचार जीवनसत्याला उजळणाऱ्या प्रकाशरेखाच ठरतात. तसेंच या कवींचें आहे की नाही हें सध्या सांगणें फार कठीण आहे. मला तसें वाटत नाही एवढें मात्र खरें. प्रयोगशीलतेवर त्यांचा फार भर आहे असें वाटतें. अशा प्रयोगवादी किंवा सौंदर्यवादी कवींच्या अभिव्यक्तिनिष्ठ वृत्तीची दुसरी सामाजिक बाजूहि असतेच. ती कधी प्रकट तर कधी अप्रकट असते. पॅस्टरनॅकच्या काव्यांत या दोन्ही बाजू अगदी स्पष्टपणें दिसतात. पॅस्टरनॅकची काव्याबद्दलची कल्पना अशी :

*It is a jet of vibrant sound,*
*It is the crackle of crushed ice,*
*It is the night that nips the leaves,*
*It is a duel of two nightingales*

या कलात्मक वृत्तीचा संबंध पुढील स्वरूपाच्या वृत्तीशीं सरळ जोडलेला दिसतो :

*In muffler wrapt I peep through the pane,*
*With palm outstreched my eyes to screen .*
*"Say, Youngsters, playing there in the rain*
*What century are we living in ?*

*Who wore that path to the wicketgate,*
*To the slop-hole where nettles grow,*
*While I with Byron smoking sat,*
*And drank with Edgar Allan Poe ?"*

पॅस्टरनॅकशीं आजच्या कवींची तुलना करण्यांत अर्थ नाही. सौंदर्यवादी दृष्टीबरोबरच त्याच्या काव्यांत इतर अनेक घटक आहेत. तो लहान चणीचा कवि नाही व त्याचें काव्यहि निव्वळ अभिव्यक्तिवादी नाही. परंतु सौंदर्य-वादी दृष्टि व समाजविन्मुख वृत्ति यांचा अंगांगी (organic) संबंध नेहमीच कोणत्या स्वरूपाचा असतो याचें हें एक उदाहरण होय.

आजच्या मराठी काव्याचें स्वरूपहि असेंच आहे. सूक्ष्मता, सूचकता व अभिव्यक्तीच्या अंगाचे अनेक गुण या दृष्टीने मराठी काव्य विकसित झालें

असें निःसंशय म्हणतां येईल, परंतु त्यातील जाणिवेचें विश्व हळूहळू संकुचित होत गेलें आहे व आता केवळ प्रतिमाविश्वच शिल्लक उरलें आहे. कोलटकर–चित्रे यांच्या जाणिवा वैश्विक आहेत असें एका अर्थी म्हणतां आलें तरी त्यांच्याहि वृत्तींत प्रयोगशीलतेला सर्वाधिक महत्त्व आहे असें वाटतें.

. ६ .

बाह्य विश्वांतील अराजक, विध्वंस व अधःपाताचें निर्वचन व्यक्तिवादी पद्धतीने न करतां दुसऱ्या एका पद्धतीनेहि करतां येतें. व्यक्तिमूल्याधिष्ठित मानवतावादाच्या व्यावहारिक जीवनांतील पराभवामुळे व्यक्तिस्वातंत्र्यवादी मूल्यांचा पुनर्विचार करणें अटळ ठरतें. व्यक्तिवादामधून जन्माला आलेला व विज्ञानाचा प्रत्यक्ष फायदा प्राप्त झालेला भांडवलशाहीसमाज व्यक्तीवर जन्माधिष्ठित बंधनें आणीत नाही हें खरें आहे, पण द्रव्याधिष्ठित बंधनें मात्र तो अवश्य आणतो. या समाजरचनेची प्रकृतीच अशी की एका वर्गाच्या भरभराटीबरोबर दुसऱ्या वर्गाचें जीवन कष्टमय बनावें व त्याला मानवानुकूल परिस्थितींत जगणेंच अशक्य व्हावें. अशा परिस्थितींत द्रव्यार्जनासाठी व्यक्तिव्यक्तींत स्पर्धा तर लागतेच, पण त्या स्पर्धेतून व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हावयाच्या ऐवजी स्वार्थपर अशा प्रवृत्तींनाच खतपाणी मिळत राहतें. प्रत्यक्ष जीवनांत व्यक्ति स्वतःच एक वस्तू (object-commodity) बनते; स्वतःची स्वतःलाच पारखी होते. भांडवलशाहीच्या भरभराटीबरोबरच मार्क्सवादाप्रमाणेंच अस्तित्व-वादाचेंहि तत्त्वज्ञान जोरांत पुढे आलें. त्याच्या अनेक शाखोपशाखा असल्या तरी भांडवलशाहीच्या (यंत्रयुगाच्या) आक्रमणापासून, तिला जन्म देणाऱ्या बुद्धिवादापासून व्यक्तीच्या 'अस्तित्वप्रत्ययाचें' संरक्षण करणें (व अंतिम सत्तेशीं नातें जोडणें) ही या तत्त्वज्ञानामागील महत्त्वाची प्रेरणा होय. तेव्हापासून आजच्या सात्रपर्यंत हीच जाणीव सर्वाधिक महत्त्वाची आहे. खरें तर मर्ढेकरांच्या अनुभूतीची प्रकृति मूलतः अस्तित्ववादाची होय. कांही आध्यात्मिक दृष्टीच्या लोकांना मर्ढेकर जवळचे वाटतात याचें

कारण त्यांची ही अस्तित्ववादी प्रकृतीच होय. उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालकी व साधनांचें सामाजिक रूप यांतील विसंगति वर्गीय संघर्षाला सतत कायम ठेवते. तो निकराला येऊं नये म्हणून तात्पुरते उपाय क्षणभर यशस्वी ठरले तरी ते कायमचे यशस्वी ठरूं शकत नाहीत. या समाजरचनेंतून साम्राज्यवादाची निर्मिति होते व युद्धें-महायुद्धें होत राहतात. ही विसंगति आहे तोवर मानवी जीवनांतील भौतिक व नैतिक अराजक सतत कायम राहणार, धुमसतें राहणार व मध्यमवर्गीय व्यक्ति सतत एकाकी राहणार यांत संशय नाही. महायुद्धांची जबाबदारी माणसावर, त्याच्या पिंडगत क्षुद्रतेवर नसून ती समाजव्यवस्थेवर आहे यांत संशयच नाही. मार्क्स-वादाला अनेकांनी निकालांत काढलें आहे व तो जुना झाल्याचें वारंवार सांगण्यांत येतें. मार्क्सचा तपशील चुकला म्हणून तत्त्व चुकलें असें कसें म्हणतां येईल? व मार्क्स चुकला असें घटकाभर गृहीत धरलें तरी त्यामुळे ती समस्याच नष्ट झाली असें समजून लोक आपापल्या मार्गाला लागतात याचा अर्थ काय? मार्क्सवाद हें एक संपूर्ण जीवनदर्शन आहे. त्याला मर्यादा असतील तर अधिक मूलभूत चिंतन समोर यावयास हवें होतें. स्वतंत्र विचार करणें म्हणजे पाप आहे, असें मार्क्सवाद मानीत नाही. लेनिनच्या पुढील ओळी विचार करण्यासारख्या आहेत : 'Clowns! They chase after words. Don't think how devilishly complicated and tricky life is, *which provides altogether new forms...*' कलेपुरता विचार केला तर लेखक-कलावंतांनी मार्क्सवादाचा किंवा एखाद्या प्रणालीचा त्याग केला या गोष्टीला विशेष महत्त्व नाही. महत्त्व त्यांनी ज्या प्रेरणेमुळे एका प्रणालीचा स्वीकार केला तिने त्यांना जीवनाचा नवा शोध घेण्यास भाग पाडलें किंवा नाही या गोष्टीला आहे. या शतकाच्या तिशींतील मराठी कलावंत-लेखकांचा रशियन साम्यवादावरील विश्वास साफ उडाला हें आपण एक वेळ समजूं शकतों; पण ज्या मानवी समस्येमुळे ते मार्क्सवादाकडे—साम्यवादाकडे—वळले होते ती समस्याहि उडाली की काय? तिचा विसर एकदम कसा काय पडला? त्यांच्या व्यक्तित्वाची प्रेरणाच मुख्यतः मानवतावादी

नसावी हें त्याचें उत्तर आहे. मानवजातीला आनंदाने राहण्यासाठी, व्यक्तित्वाच्या गुणांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी, भांडवलशाही नष्ट होणें आवश्यकच आहे, हें काय खोटें आहे? मानवतावादाचें क्रांतिकारी अध्यात्म आज समाजवादाच्या मागेच उभें आहे, यांत संशय नाही. खडान्खडा बरोबर भविष्य सांगायला मार्क्स काय ज्योतिषी होता? त्याच्या मीमांसेतील कालसापेक्ष भाग वजा केला तर (मार्क्सचाहि विचार मार्क्सवादी पद्धतीनेच केला पाहिजे) मानवी समाजाच्या उत्थानपतनाचे नियम व मानवी नियतीची त्याने केलेली मीमांसा मार्क्सला कल्पनाहि नसेल इतकी सर्वत्र व सर्व कालखंडांत तत्त्वतः खरी ठरते हें गॉर्डन चाइल्ड यांचें मत कांही खोटें नाही. मानवाची नियती (necessity) व स्वातंत्र्य (freedom) यांचा त्याने दाखवून दिलेला परस्पर संबंध व घालून दिलेला मेळ वास्तव व केवळ अपूर्व होय. मार्क्सवादाची चर्चा करण्याचें हें स्थळ नव्हे. भांडवलशाहीच्या प्रगतीबरोबर वर आलेला व स्वतःच्या अस्तित्वानेच व गरजांनीच समाजाला पुढे नेणारा मध्यमवर्ग आजच्या कालखंडांत भांडवलशाहीचा वळी ठरलेला आहे हें निश्चित आहे. त्याच्या आर्थिक जीवनाच्या मर्यादाच त्याचीं सुखदुःखें निश्चित करीत आहेत. संस्कृतीच्या दृष्टीने तो भांडवलशहांच्या जवळ आणि परिस्थितीच्या दृष्टीने तो श्रमिक वर्गाच्या जवळपास जाऊन पोचला आहे. प्रचंड वादळांत सापडलेल्या एका लहानशा बेटावरील माणसासारखें त्याचें जीवन झालें आहे. स्पर्धाळू वृत्ति व चाकरमानें जीवन यांच्या पलीकडे जाऊं न शकणारी व दडपली गेलेली अहंता त्याला अधिकाधिक आत्मकेंद्री करीत आहे. त्याचा हर्षशोक, उदारपणा, उमदेपणा जो काय प्रकट व्हावयाचा तो या जाणिवांबाहेर न पडतां. मराठी पांढरपेशा मध्यमवर्गाला प्राप्त झालेल्या मर्यादित भूमींत त्याने पूर्वी ज्या लहान लहान सद्गुणांची लागवड केली होती, ती कांही खोटी नव्हती. पण अशा परिस्थितींत दुखावलेला माणूस जें (वैयक्तिक स्वरूपाचें) बंड करतो तें स्वतःच निर्माण केलेल्या व परंपरेने प्राप्त झालेल्या सुंदर सुंदर भावनांचा व तत्त्वांचा धिक्कार करून, त्यांना वाकुल्या दाखवून, त्यांना भ्रष्ट करून. (चौकटीबाहेर न पडण्याची दक्षता

बाळगीत), जागच्या जागीं राहून तो स्वतःबरोबर मानवाचें तोंड काळें करूं इच्छितो, व हें बंडखोरीच्या नांवावर व त्याच्या हातांत कला आहे म्हणून. अर्थात् हा बंडखोरीचा केवळ आभास असतो. ती वास्तविक बंडखोरी नसते.

याच कालखंडांत कधी नव्हे तो बहुजनसमाज जागा झालेला दिसतो. अर्थात् त्याचें स्वरुप विराट असतें. न्यायासाठी झगडणाऱ्या एकाकी राजपुत्रा-सारखा तो सौजन्यशील, मोहक असा दिसूं शकणार नाही. त्या प्रचंड शक्तीला स्वतःच्या डोळस मानवतेची जोड न दिली तरती आपल्या परीने सॅमसनप्रमाणे दोन्ही हातांनी समाजस्तंभांना गदगदा हालवीत राहील यांत मुळीच संशय नाही. बहुजनसमाजाच्या स्वातंत्र्यामधूनच संपूर्ण मानवतेचें व व्यक्तीचेंहि स्वातंत्र्य जवळ येणार आहे व उच्चतर जीवनाकडे वाटचाल होणार आहे. आजच्या युगाची ही नैतिक समस्या, मानवतेच्या अध्यात्मावर निष्ठा असणाऱ्या कलावंताला जाणवल्याशिवाय कशी राहील ? तो स्वतःच्या दुःखाचें खरें स्वरूप ओळखून, स्वतःच्या मध्यमवर्गीय जाणिवांच्या कोंडींतून बाहेर पडूं पाहील, भोवतालच्या मध्यमवर्गीय जाणि वांशीं व वृत्तींशीं त्याचा संबंध येईल व संघर्ष निर्माण होईल. बहुजनसमा-जाच्या या वैश्विक मोक्षकारी संघर्षाशीं समरस होण्याचा तो सतत प्रयत्न करील. 'हें विश्वचि माझें घर' ही जाणीव व्यवहारांत उतरविण्यासाठी चाललेल्या प्रकट-अप्रकट सर्वच प्रयत्नांसंबंधी त्याला जवळीक वाटेल. संपूर्ण मानवी समाजाला मुक्त करण्याचें कार्य आता आपणाकडे, आपल्या वर्गाकडे राहिलेलें नाही हें तो ओळखील. हा प्रयत्न त्याच्या वैय्यक्तिक जीवनांत बाह्य संघर्ष व अंतःसंघर्ष निर्माण करील. कलावंत या नात्याने त्याच्या वैयक्तिक प्रामाणिकपणाची व कुवतीची कठोर परीक्षा होत राहील. व त्यामुळे त्याचें स्वतःचें जीवन नष्टदेखील होऊं शकेल. स्वतःचा स्वतःशीच वाद घालीत तो पुन्हा या 'जययात्रे'च्या जवळपास जावयाचा प्रयत्न करील. अन्वेषक वृत्तीच्या या कलावंताला अंतर्विश्व व बाह्य-विश्वांतील संघर्षाचा खरा ऐतिहासिक आशय कळूं शकेल. अनंत पदांच्या जयिष्णु यात्रेशीं समरस होण्याचा त्याचा प्रयत्न राहील. मानवी

स्वातंत्र्यावरील डोळस विश्वासामुळे, मध्यमवर्गीय जीवनाच्या चौकटींतच तो राहिल्यास, वैयक्तिक विषण्णता व सामाजिक प्रसन्नता त्याच्या काव्यामधून सतत प्रकट होत राहील. सामाजिक व राजकीय पातळीवर तो अधूनमधून निराश झाल्यास मानवी जीवनांत अधिक सखोल अशा समस्यांकडे त्याला आपोआपच जावें लागेल. परंतु मानवी जीवनाच्या समस्या त्याच्या दृष्टीसमोरून कधींहि हलणार नाहीत.

- ७ -

संस्थानी वातावरण व धार्मिक संस्कार; तशीच मनोभूमिका परिपुष्ट होईल अशी भोवतालची रमणीय सृष्टि. व्यवहाराच्या धकाधकीचा संबंधच येऊं नये अशी परिस्थिति. महाविद्यालयीन जीवनांत अभ्यास सोडून सापडेल त्या विषयावर (न समजतां) केलेलें मनसोक्त वाचन. रोमँटिक इंग्रजी कवि व रवींद्र-नाथ यांच्या काव्याचे संस्कार. वाचनांतून रोलांचें, व प्रत्यक्ष वातावरणांतून गांधींचें अनुभवलेलें अस्तित्व, इत्यादि—या सर्वांचा विभिन्न परिणाम होण्या-ऐवजी मानवतावादाचा एकच उत्कट प्रत्यय. राहतें शहर—मजूर चळवळीचें केंद्र. सर्वत्र दिसणारें जीवनवैषम्य. मार्क्सवादानें एक ऐतिहासिक वस्तुनिष्ठ दृष्टि दिली. हा मानवतावाद व्यवहारांत आणावयाचा तर त्यासाठी निव्वळ वैयक्तिक श्रेष्ठत्व, निव्वळ त्याग, निव्वळ धार्मिकता हें अखेरीस उपयोगी पडणारें नाही किंवा मानवतेवर नुसतें प्रेम करूनहि ती अखेरीस सुखी होऊं शकणार नाही. इतिहासाची साक्ष तशीच आहे. चालू युगांतील अलौकिक पुरुषांनी केलेले व चालविलेले प्रयोगहि हेंच सांगतात. वर सांगितलेल्या सर्व गोष्टी हव्या, पण त्यांच्या जोडीला जीवनपरिवर्तनाचें शास्त्रहि हवें. जीवनपरिवर्तनाचें शास्त्र म्हणजे समाजवाद. 'जो जें वांछील तो तें लाहो'च्या मार्गावर नेणारें शास्त्र म्हणजे समाजवाद. असामान्य व्यक्ति फार तर कांही काळ प्रभावी ठरतील. संतांनी चारशे वर्षे स्वतःच्या आचरणानें व काव्यद्वारें महाराष्ट्रावरच नव्हे तर संपूर्ण भारतावर मानवधर्माची अमृतवर्षा केली व सारें बदलल्यासारखें झालें. पण समाजाचा मूळ साचा तोच होता, म्हणून मानवसंबंधहि तेच राहिले. वातावरण

बदललें पण समस्या नष्ट होऊं शकली नाही. व्यक्ति बदलणें निराळें, समाज बदलणें निराळें. व्यक्तीचा कायदा वेगळा, समाजाचा वेगळा. समाज बदलायचा तर तो ज्या पायावर उभा आहे तो पायाच बदलला पाहिजे, त्यासाठी जनतेच्या भौतिक जीवनाचाच विचार केला पाहिजे व त्याच्या परिवर्तनाचा प्रयत्न केला पाहिजे. हाच श्रेष्ठ मानवधर्म होय. मात्र हें परिवर्तन घडवून आणतांना मानवी मूल्यांचा विसर पडला तर जें संचित निर्माण होईल तेंहि समाजाचा पाया बदलूनसुद्धा, समाजाला बराच काळ भोगावें लागेल. या प्रक्रियेंतूनच बाह्यतः दीनदरिद्री दिसणाऱ्या समाजाचें अंतःसौंदर्य प्रकट होऊं शकेल व मानवी सुखाची स्वप्नें साकार होतील. ‘नवी मळवाट’च्या काव्यामागे हीच दृष्टि आहे. सृष्टि व मानव, मानव व मानव यांच्यांतील खंडित झालेलें ‘मैत्र’ प्रत्यक्षांत एका उच्चतर पातळीवर समूहतः साकार करण्याच्या दिशेनेच मानवी इतिहासाची प्रगति होत आहे व होत राहील. ही निष्ठा तेव्हा १९४९ सालीं जशी होती तशी, अधिक व्यापक व सखोल अर्थानें आजहि माझ्या मनांत कायम आहे. मात्र, या संदर्भांत एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. जीवनपरिवर्तनाचें शास्त्र कळणें म्हणजे जीवन कळणें नव्हे. समस्येचें स्वरूप कळणें म्हणजे माणूस कळणें नव्हे. मानवी जीवन हें चिर गतिशील व नित्यनूतन रूपें धारण करणारें आहे. मानवी जीवनाचे व अनुभूतीचे अनेक प्रकार व अनेक पातळ्या असूं शकतात. कलावंताचा संबंध मानवी जीवनाच्या सुखदुःखांशीं असतो. तो जसा संकुचित जाणीवांचा असूं शकणार नाही, तसाच तो प्रणालिपीडित वा प्रणालिसीमितहि असूं शकणार नाही. उलट, कलावंताची साक्ष विचार-प्रणालींनाहि मोलाची व महत्त्वाची मानावी लागेल.

शालेय जीवनापासूनच केशवसुतादि कवींचा परिचय झालेला होता. हिंदींतील पंत, प्रसाद, निराला यांच्याहि काव्याचा व त्यांतील स्वप्नात्मक गूढ आदर्शवादाचा मनावर परिणाम होताच. पण हें सर्व भोवतालचें वातावरण होतें. त्या काळचा जीवनानंद मात्र हिंदींतून लिहिल्या गेलेल्या निसर्गकाव्यांतूनच प्रकट झाला.

कोठे एखाद्या स्टेशनावर गाडी थांबते तर खालील ओळी आपोआप जुळून येतात :

मैं जामुन लाया मोल
अरी, पलाश के दौने में मैं जामुन लाया मोल
यह देहाती स्टेशन जाती गाडी तनिक ठहर
दूर दूर के जामुन बन पर घटा बोलती घहर
बनसे एकाएक निकलती मालविनों की लहर
रंग गेहुंआ, पीत ओढनी, लचकीलीसी कमर
हांफ हांफ कर कहती जाती लोगे जामुन मोल ?
मै लूंगा जामुन मोल
आई डिब्बेपास दौडती छोरी नयी उमर
हरे हरे दौने में जामुन गहरे नीले धर
कजरारे जामुन का काजर अंखियन में भरभर
चितवन फैला जहरी नीली बोली लोगे मोल ?
मै लूंगा जामुन मोल

वाटेवरील किसानकन्यकेकडे पाहून—

पीत नीले फूल—
खेतपर की मेंडपर ये मुस्कुराते झूल
इस घटावाले सवेरे गांवपथ से दूर
कौन आतीं कृषककन्ये, ले उषा का नूर ?
ये हिमानी लाल पीले लाख जंगलफूल
खिलखिलाकर हंस पडे री आज सुधबुध भूल

अशा अनेक कविता. कांही प्रसिद्ध झाल्या, कांही वाऱ्यावर विरून गेल्या. त्यांतल्या कांही कांही ओळीच आता आठवतात. या काळांतील वृत्तीचे सादपडसाद ह्या काळच्या माझ्या मराठी काव्यांतहि ऐकूं येतात. निसर्ग व निसर्गवत् मानवाच्या सौंदर्याने मन भारलें गेलेलं होतें. 'नवी मळवाट'-मधील त्याच काळांतील पुढील ओळी—

किती मधुर जादु ही एकलेपणाची
एकलीं शिरें उभीं तुंग हिमनगाचीं
मस्त पिती नीलिमा उंच त्या नभाची...

(' किती मधुर जादु ही ')

' फिरून आले ' यासारख्या कवितांमधून त्याच पूर्वानुभवांची खंत (nostalgia) प्रकट झाली आहे तर ' वर्षागम ', ' उडालें पाखरू ', ' अंधारलेली निवांत खोली ', ' सांज ये हळूहळू ', या व अशा गीतांमधून त्याच उत्कट आनंदाच्या कांहीशा सुखद मंद व उदास छटा प्रकट झालेल्या आहेत. निसर्गाशीं बोधपूर्व पातळीवर झालेली एकतानता खंडित होणें अटळ होतें. सर्वसंवादित्वाची अनुभूति नष्ट होऊन जीवनाच्या विविध वैषम्यांचा प्रत्यय येऊं लागला, निसर्गाच्या सहवासांतहि मन खिन्न राहूं लागलें तेव्हा—

कशाने सौंदर्यं निसर्गाच्या मला असें धिःकारलें

(' त्रिशंकूचें स्वप्न ')

असा प्रश्न पडतो. निसर्गाशीं एके काळीं असलेली गाढ समरसता ' बबूल ' (बाभूळ) या हिंदी कवितेंत प्रकट झाली आहे :

आज सावनका अमी[१] पी
यह कुरूपा विरलपल्लव
शुष्क कालीसी बबूली
खूब यौवनसे भरी है
हरे गुच्छोंसे लदी है
और पीले फूल की हल्दी रमाये
चुप खडी है
इस नदी के तीरपर
हैं प्राण मन इसपर निछावर !

१. अमृत

निसर्गाशीं असलेले हे भावबंध नष्ट झाल्यावर, द्वैताचा अंतर्बाह्य प्रत्यय तितकाच दारुण व दुःखकारक ठरावा यांत काय नवल?

तेंच हो रक्त
ज्याचिया कारणें आरक्त पानें तीं फोडून उहाळ्या
बाहेरी येतात
आणीक जंगलें होती लालीलाल ज्वानीच्या ज्वालेंत
तेंच तेंच रक्त, काळें काळें झालें
थिजूनिया गेलें माझिया तनूंत...

*('त्रिशंकूचें स्वप्न')*

'रक्त' या शब्दाचा उपयोग मीं सर्वत्र केलेला आहे. तो निसर्ग आणि मानवी जीवन यांमधून वाहणाऱ्या चैतन्यरसासाठीच. ('लाल' हा शब्द राजकीय अर्थानें मीं वापरलेला आहेच, पण तो क्वचित्.) फिरून तोच आंतर्बाह्य सुसंवाद अनुभविणें आता केवळ अशक्य होय ही जाणीव वारंवार प्रकट होऊं लागली.

तुझेंही चारुत्व
निसर्गप्रेयसी झालेली जखम भरूं ना शके

*('त्रिशंकूचें स्वप्न')*

हीच भावना पुढील ओळींमधून प्रकट झालेली दिसेल:—

आज वाटेना खगांच्या नेत्रीं
न्याहाळावेत दिशांचे देश
घ्यावा वाटेना तुझ्या संगतीं
रेशमी सैल वसंतवेश

वाटेना लाल कर्दळीवनीं
फिक्या दुपारीं स्वैर हिंडावें
आणि वाटेना स्वप्नांनी जड
कळ्यांचे डोळे उमलावे

*('माझ्या पीडेला अर्थ येईल')*

आरंभीं आरंभीं हें मराठी काव्य रोमँटिक व व्यक्तिस्वातंत्र्यप्रधानच होतें. स्वतःच्या प्रीतीचा कृतज्ञ (किंचित् जाणीवपूर्वक) उल्लेख करून कवि म्हणतो,

रूपाच्या या वनांतून, मायेच्या या मायेंतून
माझी पायवाट जाई उंच टेकडी चढून
इतक्या आसवांचा निधी, प्रीतीची पुण्याई
मी पिऊन चाल्लों घनकल्लोळ बनून

*('जिवाची प्रचंड फेक')*

अज्ञानाचे आणि वैषम्याचे पटावरील पट फाडून टाकल्यावर सौंदर्यपूर्ण मानवी जीवनाची ज्योत—'विश्वसुंदरीची ज्योत'—प्रकट होईल व त्यांत जीवनाची आहुती पडेल ही भावना. लोक दर्शनाला बेभान सैराट बनून धावतील, पण हें विसरतील की :

जन जातील दर्शना बेभान सैराट
तुडवीत खाली अमुच्या रक्ताचेच पाट !

त्या काळच्या आदर्शोन्मुख वृत्तीचा हा आविष्कार होय. बंगालच्या दुष्काळाचें वृत्त ऐकून-वाचून कविमन एकदम वेगळ्या तऱ्हेने विचार करूं लागतें :

मानवा, मानवा, काय ही स्थिती
किड्यांचें मरण, जिण्याची भीति

*('भविष्याच्या गर्भांतल्या—')*

असे उद्‌गार स्वाभाविकपणेंच बाहेर पडतात. या दुष्ट शक्तीबद्दलची द्वेषभावना प्रबल होऊं लागते.

आता झालें ज्ञान करूं जीवास कुर्बान
उद्याच्या सौंदर्यास्तव भयंकर ध्यान
उद्याच्या त्या दिव्य आणि ऊष्ण प्रीतीसाठी
आज सोडूं द्वेषाचिये जळजळीत बाण.

*('भविष्याच्या गर्भांतल्या—')*

द्वेष ही भावना मला स्वभावतः फार जवळची आहे. असत्याचा, दुष्ट शक्तींचा द्वेष करावयाचा नाही तर कशाचा ? संतांची भूमिका, गांधीजींची

भूमिका श्रेष्ठ होती, हें बरोबर आहे; परंतु सर्वसामान्यांचें जीवन या प्रेमाधिष्ठित परंतु तीव्र प्रतिकाराच्या भावनेंतूनच पुढे जाऊं शकेल असें मला वाटतें. "मायबापाहुनी बहु मायावंत। करूं घातपात शत्रूहूनि।" या तुकारामोक्तीचें वेगळें रहस्य काय आहे? किंवा या भावनेला आपण जाज्ज्वल्य प्रेम म्हणूं या. ही घृणा वा द्वेष म्हणजे हिंसेचा पुरस्कारच ठरला पाहिजे व त्याने मानवी व्यक्तीबद्दलचा द्वेष वाढलाच पाहिजे हें खरें नव्हे. कारण हा द्वेष मानवाबद्दल नसून व्यवस्थेबद्दल असतो हें लक्षांत घेतलें पाहिजे.

पार्था जयाचिया ठायीं। वैषम्याची वार्ता नाहीं
रिपुमित्रां दोन्ही। सरिसा पाड.

ही भूमिका व्यक्तिसंबंधांत ठीक आहे, पण त्याचें सामाजिक भूमिकेंत परिवर्तन अन्यायाचें व अनैतिक आहे असें मला वाटतें.

'रुधिराच्या लाल सड्यांतच' या कवितेंत शोषित मानवाने केलेलें नव्या जीवनाचें स्तवन आहे. अश्रूंतूनहि हसण्याचा प्रयत्न करीत, रुद्ध कंठांतूनहि जयजय शब्दाद्वारें तो नव्या युगाचें स्वागत करीत आहे. आपले हजारों हजार वर्षांचे ऐतिहासिक अनुभव सांगतांना तो म्हणतो :

ये नाशांतुन, मृत्यूंतुन, पीडेंतुन ये—स्वागत
ये अश्रूंतुन, अपमानांतुन, दैन्यांतुन ये—स्वागत.
ये तडफडत्या हृदयांच्या टपटपत्या रुधिरामधुनी
विश्वभक्षि रोषानलज्वालांमधुनी ये तूं स्वागत!

यांतून प्रकट होते आहे ती विध्वंसांतूनहि प्रकट होणाऱ्या नव्या जीवनावरील निष्ठा. दोन महायुद्धांच्या दुःखामधूनहि 'वसंतबहारासम' येणाऱ्या नव्या दिवसाबद्दलची प्रतीति, 'भविष्याच्या गर्भांतून' नव्या दिवसाच्या बाळाचें रुदन व रक्ताच्या सड्यांत रडणारें बाळ—यांमधून मरणाची व सृजनाची ही अपरिहार्यताच प्रकट होत आहे.

या निष्ठेंतूनच स्वतःच्या वैयक्तिक जीवनाची आहुति द्यावी लागणार आहे, व आपलें घरटें सोडून दूर जावें लागणार आहे, अशी जाणीव वारंवार होते आणि वैयक्तिक प्रीतीच्या पातळीवर एक द्वंद्व निर्माण होतें.

सतत-प्रवासी उठेन मी मग हाक ऐकुनी दूर कुणाची
अनावर मला ओढिल माया दूरदूरच्या गे रस्त्यांची
जनःसागरीं मिळेन तेव्हा सापडेन ना कधी निराळा
मला बोलविल दूरदूरच्या राजपथांचा गरम धुराळा

किंवा

नाहीं ग तुझे उजळ डोळे
(प्रेमळ शांत तारक दोन)
कमनीय ते तन्मय भात्र
(काळ्या छायेंत दीपक मौन)

नाहीं ग तुझी आर्त काळजी
वक्षाखालचें तीव्र स्पंदन
नाहीं ग तुझें गंभीर बोल
परंतु भोळें आर्जवी मन

देणार धीर......

ही भावना पदोपदीं मनाला त्रस्त करीत असते. वैयक्तिक प्रीतींतून वैश्विक प्रीतीचा प्रत्यय अनेक थोर कवींना आलेला आहे. प्रस्तुत लेखकाचा तो अनुभव नाहीं. प्रत्यक्ष व्यवहारांत, वैयक्तिक प्रीति ही मानवी प्रीतीच्या आड येऊं शकते, असें त्याला वाटतें. परंतु पुढे कविमन याहि आवर्ताबाहेर पडतें.

जगाचें बाह्य ऐतिहासिक गतिशील स्वरूप व त्यामधील आपलें कार्य यासंबंधी पूर्णपणें निःशंक बनलेल्या मनांतून समोर सूर्योदय पाहिल्याबरोबर आत्मविश्वासाने परिपूर्ण असे आनंदोद्‌गार बाहेर पडतात :

उसळला वरती तेजोगोल
निमालें भान, कळालें मोल

विरालें दिवास्वप्न तें पार
गवसला चैतन्याचा हार
...   ...   ...

जगाचे धो-धो रजतप्रपात
दृष्टीच्या सहजीं आटोक्यांत
... ... ...
मनाचा दुरदूर फैलाव
जगाचा अंत-आंतुनी ठाव
... ... ...
गाढ़ं ये जल्दी मधली धार
सोड नौकेचं शीड फरार

मृत्यूचें जन्मोत्सवी रूप मानवाच्या जययात्रेंत कवीला नेहमीच गवसलें आहे. हजारों हजार वर्षें चाललेल्या मानवी संघर्षाचें व प्रगतीचें चित्र त्याच्या डोळ्यासमोर उभें राहतें :

मस्तकाभवती स्वप्नांचीं विराट
प्रकाश-धूमिल आवर्तें नाचती
कोटिशः दुखऱ्या भेगांच्या पायांत
झंझेची झिंगली मस्तानी गती
प्रत्येक निःश्वास अनलोर्मिपूर्ण
नयनामधून विजेचे प्रपात
क्षणांत दीनांची भुकेली सेना—की,
क्षणांत जाज्वल्य मानव विराट !

मानवी जीवनाचें हें ऐतिहासिक भव्य दृश्य—ही निष्ठा सर्वत्र प्रकट झालेली आहे. 'नवी मळवाट'मधील कविता जीवनाच्या ऐतिहासिक गति-शील अनुभूतींतूनच लिहिली गेलेली आहे.

ढासळणार विजयस्तंभ
... ... ...
जीवनाची जय बोला—उंचवा निशाण.

असे व अशासारखे निःशंक उद्‌गार कवीला सहज काढतां येतात, याचं कारण ही ऐतिहासिक निष्ठा. कवीची स्वतःची भूमिका या अंतिम संघर्षाशीं

समरस होण्याची, जययात्रेतील एक सामान्य शिपाई बनून राहण्याचीच आहे. कवीची जाणीव अशी आहे :

कुणाच्या वेदना साठून साठून
उरांत माझिया दाटून राहती ?
कुणाचीं आसवें वाहून वाहून
कपोलीं माझिया सांडून वाळती ?

या अनुभूतींतून या मानवतेच्या महासागराकडे करावयाची वाटचाल सोपी नव्हे. हा ऐतिहासिक विस्फोट व्यक्तीचा नसून जीवनाचा आहे. तो अत्यंत तेजस्वी, कठोर, रौद्र, निर्मम, विराट व दुस्सह असा आहे. तें पाहण्याची, तो अनुभव पुरेपुर पेलण्याची शक्ति कवीजवळ कोठे आहे?...

अग्नीची धुराची विराट घोंगडी
लेऊन रौद्रसें अस्तित्व हेंच तें
ज्वालांच्या पदांनी येतसे चालून
ज्याचीं तूं गाइलीं मधुगोड गीतें
... ... ...
रात्रीच्या उरांत खंजिर घुसून
रक्ताचा कोसळे प्रचंड प्रपात
रक्तस्रावांतून जन्मास येतसे
अरुण, कोमल, महान् पहाट...

हें दुस्सह दृश्य, त्याचा प्रत्यक्ष विश्वव्यापी आविष्कार पाहतांना डोळे जातात—मन भयग्रस्त बनतें. ज्याच्या ध्यासाने संपूर्ण अस्तित्व 'धगधगितो ज्वाळ वन्ही'सारखें बनलें होतें :

किर्र अरण्य जळावें जसें सोनज्वालांनी
शाखाशाखांनी, पानापानांनी, कणाकणांनी
तेवीच माझें पूर्ण अस्तित्व जळूं लागलें महाप्रखर तीव्र ज्वालांनी—

त्या सत्याच्या नैतिक सौंदर्यरूपाने असें भारावलेलें व्यक्तिमत्त्व—त्याच्या प्रत्यक्ष आविष्काराकडे पाहतांच—

क्षणांत माझ्या डोळियांतली ज्योति ती मेली

आणि पडलों पंख जळके घेऊन खाली

स्वतःच्या व्यक्तिगत मर्यादेची जाणीव कधी कधी तीव्र बनते व कवीला स्वतःचें खरें खुरें स्वरूप स्पष्ट दिसूं लागतें.

केवळ पुस्तकी क्रांतीचे आम्ही
यांत्रिक गीतांचे कागदी कवी
त्रयस्थ राहून दुरून तोपूं
रचून कविता महाविप्लवी !

कवीची स्वतःसंबंधीची धारणा अशी आहे. अधिकाधिक सूक्ष्म असें आत्मविश्लेषण करण्याचा त्याचा प्रयत्न 'त्रिशंकूचें स्वप्न', 'आज कशानेशी', 'माझ्या पीडेला अर्थ येईल' इत्यादि प्रदीर्घ कवितांतून झालेला आहे. अंतःकरणांतील तीव्र असमाधान काव्यात्म पातळीवर आणल्यावरच कविमनाला व्यापक जीवनादर्शन घडूं शकलें आहे. 'त्रिशंकु' हा व्यक्तिमनाचा, तसाच अधांतरी लोंबणाऱ्या मध्यमवर्गाचा व मानवी मनाचाहि प्रतिनिधि आहे. निसर्गापासून तुटलेला 'एकाच जिवंत नागाचीं खांडोळीं तळमळते जशी' अशा मनोवस्थेंत तो आहे. निसर्गासमोर, अपूर्ण मानवतेची प्रचीति त्याला तीव्रतेने होते.

पूर्णत्वासमोर, पूर्णत्व शोभतें
अपूर्ण टाकतें मानेस खालीं...

हें अपूर्णत्व त्याने प्राचीन विच्छिन्न शिवमूर्तींच्या साहाय्याने प्रकट केलें आहे. अधांत्रीपणामुळे कधी कधी त्याला एकदम ही श्रद्धाच नाहीशी झाल्यासारखी वाटते :

एकहि अर्थ
माझिया मनांत अजस्र श्रद्धेस ओतूं ना शके
...        ...        ...
एकही छंद
मनाचा निर्बंध प्रवाह बोलका करूं ना शके

या पूर्णत्वाच्या प्रत्ययासाठी जीवनाच्या—पृथ्वीच्या—निसर्गाच्या गर्भातूनच वर यावें लागेल आणि मगच—

पूर्णत्व अविगें कोठ्यावधी फुलें
डहाळ्या लपून फुलांच्याच ओळी
माझिया गीतांचीं रक्तिम फुलें तीं...

हा आदर्श कवीसमोर आहे. तो त्याला वास्तवासारखाच अनुभवतां येतो. म्हणून तें 'स्वप्नस्थ वास्तव' होय. या सर्वच कवितांमधून आत्म-निरीक्षणामधून सत्यदर्शनाचाच प्रयत्न दिसून येईल. स्वतःच्या (व मध्यम-वर्गाच्या) अंतःकलहामधून वर येतांना लागणाऱ्या भिन्न भिन्न कुद्ध्या कुबट अनुभूतींच्या प्रदेशाचें चित्रण 'आज कशानेशी' या प्रदीर्घ कवितेंत झालेलें आढळेल. हे भिन्न अनुभवांचे प्रदेश केवळ आत्मपर नसून वस्तुपरहि आहेत. त्यांत कुजणाऱ्या जाणीवनेणिवांचें चित्र आहे. वर्तमानाकडे पाठ फिरवून भूतकाळांतच रमणाऱ्या मनाला उद्देशून पुढील उद्गार उमटतात :

जुनाट थडग्यावरी नको गाऊं विलापिका
नको टाकूं आसू ऊन मेल्या जगावरी फुका

फोडून थडगें येई, बाहेर डहाळ नवी
मांसल पल्लव लाल गोंडसशी टवटवी
... ... ...
जंगलाच्या डहाळ्यांत लाल रक्त सळसळे
शाखांना फोडून येती लाख लाख लाल फुलें

समष्टीचें रक्त तुझ्या धमन्यांत प्रवाहित
समष्टीच्या चैतन्याने तुझे प्राण प्रकाशित...।

आणि म्हणून—

नष्ट करा बंधनें जीं जखडती जीवनाला
व्यक्तींतील चैतन्याच्या सागराचा काठ आला
... ... ...

पेटवा, पेटवा सारी उरांतली अडगळ
चेतवा, चेतवा उरीं जीवनाची तळमळ...

अंतर्विश्वांतील भेसूर वृत्तींचीं अहंकारद्वेषनिंदेचीं पडळें बाजूला सारून व्यष्टिसमष्टीच्या अभिन्नत्वाची जाणीवच त्याला जययात्रेचें पुन्हा सुंदर दर्शन घडवूं शकते...

दिगंत व्यापीत सारें उडाली गुलाबी धूळ
... ... ...
गर्गर फिराया लागे लखलख जळतें असें
रथाचें सुवर्णचक्र...

या प्रदीर्घ कवितांमधून जीवनाच्या चिरंतन गतिशीलतेवरील निष्ठा व 'आनंदवनभुवना'कडे जाणाऱ्या प्रवाहाची प्रचीति प्रकट झालेली आहे; व त्या दृष्टींतून स्वतःच्या वर्गीय एकाकीपणावर व तदंगभूत अनुभवसत्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न झालेला आहे. खालील ओळींत या ऐतिहासिक दृष्टीचाच उल्लेख आहे.

जगाचे धो-धो रजतप्रपात
दृष्टिच्या सहजीं आटोक्यांत
... ... ...
...उंचीवरून बघतों स्पष्ट
जगाचे नाना बळी प्रवाह...

जीवनविध्वंसाच्या या भेसूर वातावरणांतहि पुढील उद्गार निघूं शकतात :

येत्या युगायुगांतुनि दिसलीं बाळपाउलें हलतीं
कोटि तरंगांच्या हातांना जुळवुनि केलें पुढतीं...

या प्रदीर्घ कविता आत्मनिष्ठच आहेत. कारण यांत माझ्या अंतर्द्वंद्वाला मी वस्तुरूपानें ओळखण्याचा प्रयत्न केला आहे व त्याच्या सर्वसामान्य रूपाचा शोध घेतला आहे.

'शिशिरांतील पौर्णिमा', 'लाल कंदील', 'अंत आहे तसा आरंभ आहे' या सर्वच कवितांमध्ये विषण्ण, खुरटलेल्या वा पिचणाऱ्या जीवनाच्या

प्रतिमा आहेत. परंतु यातनेच्या पोटींच प्रेरणेचा प्रत्यय कवीला सतत लाभतो असें दिसतें. लाल कंदीलवाल्या गल्लींतलें कुबट व विषण्ण मध्यवर्गीय जीवन—

सर्व ओढती एक जोखड येईतो घेरी
आणि एक भीषण छाया प्रत्येक जीवा करी घाबरी

परंतु या भीषण जगांतच 'अनंत मुखें, अनंत डोळे, अनंत ज्वाला' हीच प्रचीति अखेर प्रभावी ठरते, या सर्वच ('आज कशानेशी', 'शिशिरांतली पौर्णिमा', 'असेंच आहे कांही', 'सूर्ययुग', 'लाल कंदील' इत्यादि) कवितांमधून काफ्काच्या (Kafka) जातीची अद्भुत-भीषण प्रतिमासृष्टि, तिच्यांतील भीषण परस्परविरोधी रंग, व मृत्यूचीं विविध छायरूपें आहेत. यांमधून आजच्या विश्वाचें भावनात्मक व नैतिक स्वरूप प्रकट होत आहे.

...अस्ताव्यस्त पसरले केस खाली सांडलेले,
अजूनहि चाचपतें बाळमूठ छिन्न स्तन...

किंवा

स्थूलकाय नारी-नर
बैसलेले विवसन
लालिमा जळते ओठीं...
वासनाकमळें लाल घेतलीं हातांत त्यांनी
आत्ममुग्ध बैसलेले सावळ्या दर्पणापुढे
उत्सुकसे न्याहाळीत कसें त्यांचें दिसे प्रेम

*('आज कशानेशी..')*

किंवा

...लोपे अंतिम अंगार आणि
फोडून दिशाकोट उसळे तमोदधीचा कल्लोळ मूक
बोळींच्या भिंतीवरून गळे अंधारजळ
अंधकारास मिळे केवळ अंधार...

*('लाल कंदील')*

किंवा टोलेजंग कचेरींतील अंधुक प्रकाशामधून फाइली इकडून तिकडे नेणारांचे—

> ...शंदरी पट्टे हालती येथून तेथे
> आणि लखाखून जातो मधेच पितळी डोळा...

किंवा कचेरींतील—

> ...लाल बल्बांच्या एकाक्ष खोल्या
> पिंगट अंधार तेथे सदा राही सांडलेला
> पिवळ्याशा फाइलींचा प्रवाह वाहतो संथ
> कोठून निघाला आणि कोठे नित्य चाललेला ...?

*( असेंच आहे कांही )*

आदर्शलक्षी उद्गारात्मक प्रवृत्ति ओसरल्यानंतर आशयगर्भ प्रतिमांचें हें तंत्र मीं आपोआपच वापरूं लागलों होतों. 'अंत आहे तसा आरंभ आहे' या काव्यांत हें वास्तववादी तंत्र कायम राहिलें, पण त्यांतल्या अद्‌भुततेचा भाग (fantasyचा) मीं बराच कमी केला. ही तऱ्हा मला डोस्टॉव्हस्कीच्या कादंबऱ्यांमधून मुख्यतः आढळली व काफ्काच्या कादंबऱ्यांत तर हें तंत्र सर्वत्र वापरलेलें मला दिसलें होतें. या प्रतिमातंत्राचा माझ्या काव्यावर बराच परिणाम झालेला आहे. काळ्या लाल गडद रंगांच्या नाट्यपूर्ण मेळामधून जी भीषण सृष्टि 'लाल कंदील', 'असेंच आहे काही', इत्यादि कवितांमधून (व 'नवी मळवाट' नंतरच्या प्रदीर्घ काव्यांमधून) मीं उभी केली आहे त्यामागील दृष्टि पहिल्या प्रथम मला याच लेखकांकडून मिळाली. हे गडद रंग शक्य तितके कमी करण्याचाहि मीं प्रयत्न केला. मात्र आजच्या जीवनाची आंतर्बाह्य भीषणता अशा स्वरूपाच्या प्रतिमा समर्थपणे व्यक्त करतात असें मला वाटतें. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या संदर्भात लिहिली गेलेली 'अंत आहे तसा आरंभ आहे' ही प्रदीर्घ कविता, व्यक्तिगत दुःखपूर्ण वास्तव आणि वैश्विक संघर्षशील जाणीव हे दोन धागे एकत्र जोडून लिहिली गेलेली आहे

व त्यांतील आशावादाचा आधार ‘अंत आहे तसा आरंभ आहे’ या सनातन सत्याचा प्रत्ययच होय.

बाह्य जीवनांतील या वर्धिष्णु व जयिष्णु शक्तींची ओळख केव्हा केव्हा पटेनाशी होते, मनांत अंधारच अंधार भरून राहतो, तेव्हा स्वतःच्या अंतःकरणाची साक्षच कवि पुढे पुढे प्रमाण मानूं लागतो.

> ...हृदयाच्या अंधारीं
> विझ्‌ विझ्‌ करणारी
> परि झगडत फुलणारी
> एकच एक चिमुकली ठिणगी
> तीच असे माझी जिनगी

(‘*ठिणगी*’—यात्रिक)

ज्या जययात्रेंत सामील व्हावयाचें तिचा प्रत्यक्ष जीवनांत कधी कधी मागमूसहि दिसेनासा होतो. तेव्हा माणूस जेथे उभा आहे तेथेच तो आपलें कार्य करीत राहूं शकेल या जाणिवेचा हळुहळू उदय होऊं लागतो. कारण, जीवनचैतन्य तर सर्वत्रच आहे.

> सारें धुकें सरलें आहे
> माझ्या थरथरत्या हाताला चैतन्याने स्पर्श केला,
> आणि म्हटलें-सरूं दे व्यथा तुझी वाटचालीची
> आता तूं जेथे असशील तोच मुक्काम आहे
> आता तूं जें जें करशील तेंच काम आहे.

(‘यात्रिक’)

मानवकुळाचें आनंदमय स्वप्न साकार होणार, कारण तोच मानवी जीवनाचा स्वभाव आहे. पण कधीकधी या विरुद्ध सारें जीवन साक्ष देऊं लागतें, अंधाराचे वारे वाहूं लागतात तेव्हा कवि स्वतःच्या भावसत्यालाच प्रमाण मानतो.

> प्रकाशतत्त्वाचा मीच पुरावा जर
> अंधाराच्या मायुनि, प्राण बहिश्चर
> माझे सहचर

असतिल काय तिमिरहर
सूर्य मनोहर ?
...आणि नव्हे तर
मरतांनाही माझा
आंत आंतुनी चैतन्याचा प्रत्यय
असा अनावर
कसा ?

*(कविमृत्युसंवाद)*

जन्ममृत्यूंची, स्थितिगतींची, अंधारप्रकाशाची, प्रगतिपरागतिची, सुष्टदुष्टपणाची, अहंकेंद्रित व विश्वकेंद्रित वृत्तींची, अगतिकतेची व विद्रोहाची अशी जाणीव व तीमधून अधिकाधिक व्यापक व सखोल पातळीवर जीवनसत्याशी समरस होण्याची चाललेली कवि-मनाची धडपड; व्यक्ति, मानव व निसर्ग यांत सुसंवाद पाहण्याची व अखेरीस त्या सुसंवादाकडे नेणाऱ्या पीडित क्रांतिकारी मानवतेच्या संघर्षाशी एकरूप होण्याची तीव्र अभिलाषा 'नवी मळवाट'-मध्ये व 'यात्रिक'मध्ये प्रकट झालेली आहे.

मृत्यूचा जन्मोत्सव
करणारी
पहाटशीला ही कल्याणी नवमानवता

*('कविमृत्युसंवाद')*

## .८.

माझ्या काव्याची स्थूल भूमिका मीं थोडक्यांत मांडली. ही मांडतांना 'यात्रिक'मधल्या कवितांचा व कालपरवा प्रसिद्ध झालेल्या एका कवितेचा ('कविमृत्युसंवाद') मीं आधार घेतला आहे. माझ्या पुढील जाणिवांची केवळ थोडीशी कल्पना येण्याच्या दृष्टीनें उक्त कवितांचा मीं उल्लेख केला. मात्र, या काव्यामागील दृष्टि ही मार्क्सवादी असली तरी केवळ या शब्दानेंच तिचें वर्णन होऊं शकत नाही. कारण, जीवनांतील या द्वंद्वाच्या मुळाशी

असणाऱ्या सनातन जीवनसत्तेची जाणीवदेखील येथें आहे व हेंच या कवितांचें अध्यात्म होय. मात्र मला कोणी मार्क्सवादी म्हटलें तर तें खरेंच आहे असें मी म्हणेन. मार्क्सनें जीवनाचें जें गतिशील द्वंद्वात्मक दर्शन घडविलें तें मला आजहि पटतें व तोच माझ्या मनाचा प्रत्यय आहे. मार्क्सदर्शनाला आत्मसात् करूनच पुढें जातां येईल, नाकारून नव्हे. 'मार्क्सवाद' या शब्दाच्या उच्चारानेंच ज्यांच्या डोक्यांत तिडीक उठते त्यांनी हें पुस्तक न वाचलें तरी चालेल. ज्यांना तसें वाटत नाही तेच या कवितांचा सखोलपणा किंवा उथळपणा, प्रामाणिकपणा किंवा अप्रामाणिकपणा ओळखूं शकतील. मात्र, कलावंतावर दडपण आणून कला निर्माण करतां येईल, असें मी समजत नाही. तसा प्रयत्न कांही पुढाऱ्यांनी केला व तो फसला यांत आश्चर्य कसलें? कलानिर्मितीची प्रक्रियाच नाकारून कलानिर्मितीचा अट्टाहास धरणें व्यर्थ होय, हें अगदी उघड आहे.

केशवसुतांच्या व्यक्तिमूल्याधिष्ठित मानवतावादाचें काव्य जसें आशयनिष्ठ होतें तसेंच हें समष्टिमूल्याधिष्ठित मानवतावादाचें काव्यहि आशयनिष्ठ आहे. मानवतेचें अध्यात्म या दोन्ही प्रकारच्या काव्यांमागे आहे. केशवसुतांच्या काव्यांत त्यांच्या व्यक्तित्वाचा जसा आविष्कार झाला आहे, तसाच याहि काव्यांत लेखकाच्या व्यक्तित्वाचा (त्याच्या कलात्मक शक्तीच्या मानानें) आविष्कार झाला असण्याची शक्यता आहे. केशवसुतांच्या काव्याची प्रेरणा प्रयोगवादी नव्हती; तशीच या काव्याची प्रेरणाहि प्रयोगवादी नाही. रसिकमनाचा वेध घेणें हें केशवसुतांच्या व याहि काव्याचें लक्ष्य आहे. समाजाच्या प्रगतितत्त्वाशीं समरस होण्याच्या प्रेरणेंतून हे समान विशेष जन्माला आलेले आहेत, एवढें दाखविण्यापुरतीच ही तुलना आहे, बरोबरी करण्याच्या दृष्टीनें नव्हे. कारण काव्यगत प्रतवारी अनेक घटकांवर अवलंबून असते व ती ठरविण्याचें काम रसिकांचें आहे, माझें असूं शकत नाही.

आजच्या प्रयोगवादी, सौंदर्यवादी कवींच्या काव्याची 'नवी मळवाट'शीं काव्य-स्वरूपदृष्ट्या तुलना केली तर तेंहि उपयुक्त ठरेल. वस्तुपर आकृतिबंध निर्माण करणें ही प्रयोगवादी सौंदर्यवादी काव्याची प्रेरणा, तर रसिकमनावर

परिणाम करणें ही ‘नवी मळवाट’ची वृत्ति. अभिव्यक्तिविलक्षणता हें पहिल्या प्रकारच्या काव्याचें वैशिष्ट्य, तर आशयनिष्ठा हें दुसऱ्या प्रकारच्या काव्याचें वैशिष्ट्य. अभिव्यक्तीच्या अंगानें प्रकट होणारी बौद्धिक सूक्ष्मता व अन्वेषक वृत्ति ही पहिल्या प्रकारच्या काव्याची रीत तर आत्मवस्तु-अन्वेषक वृत्ति ही दुसऱ्या काव्याची प्रवृत्ति. समाजनिरपेक्षता हा पहिला प्रकारच्या काव्याचा विशेष, तर जीवनाच्या ऐतिहासिक व्यापारांची सम्यक् प्रतीति हा ‘नवी मळवाट’मधील अनुभूतीचा आधार. एक ऱ्हासशील मध्यमवर्गाचें प्रयोगवादी सौंदर्यवादी काव्य, तर दुसरें जीवनसंघर्षाशीं समरस होऊं पाहणारें, मध्यमवर्गाचेंच, व मध्यमवर्गीय जीवनाचा व मनाचा ठसा असलेलें, परंतु युगसमस्येच्या बाबतींत कवीनें धारण केलेल्या नैतिक वृत्तींतून निर्माण झालेलें काव्य. एक स्थितिप्रेरित काव्य तर दुसरें गतिप्रेरित काव्य.

.९.

या काव्यसंग्रहातील प्रदीर्घ कवितांच्या बाबतींत दोन शब्द लिहिणें अनुचित ठरणार नाही. ‘त्रिशंकूचें स्वप्न’, ‘आज कशानेशी मला’, ‘अंत आहे तसा आरंभ आहे’ या व आजपर्यंतच्या अशा सर्वच कवितांमधून अनुभवाचा एकच एक उद्‌गार आढळणार नाही. या कवितांमधून कवि-मनानें भिन्न भिन्न अनुभवावस्थांमधून केलेल्या प्रवासाचा आविष्कार झालेला आढळेल. कविमनानें स्वतःशींच चालविलेला संवाद व त्यामधून व्यापकतर पातळीवर त्याला झालेलें जीवनाचें दर्शन या कवितांमधून रेखाटण्याचा प्रयत्न केलेला आहे. ‘त्रिशंकूचें स्वप्न’ ही कविता उदाहरणादाखल घेतां येऊं शकेल.

कवितेच्या पहिल्या टप्प्यांत कवि चिरपरिचित निसर्गाच्या सौम्यसुंदर सान्निध्यांत बसला असतांना त्याला स्वतःच्या वृत्तींत व निसर्गाच्या सुप्रसन्न वृत्तींत पूर्ण विसंगति असल्याचें प्रत्ययास येतें. ‘माझेंच मन–माझ्याच मैत्रिणी’ अशी जाणीव असतांना, किंबहुना ‘माझाच सौंदर्यविस्तार’ समोर पसरला असतांना परदेशी नवखेपणाची (exile ची) ही जाणीव कां असावी? निसर्ग-मानवामधील वैषम्यानुभव पहिल्या टप्प्यांत जाणवतो.

दुसऱ्या टप्प्यांत व 'एकहि स्पर्श माझिया तनूंत' इत्यादि ओळींमधून त्याने आत्मस्थितीचें केलेलें निरीक्षण प्रकट होतें,

पुढील टप्प्यांत, या परिपूर्ण सुंदर निसर्गाच्या अपेक्षेने मानवी मनाच्या अपूर्णतेची जाणीव अधिक तीव्रतेने व व्यापकतर पातळीवर कवीला प्रतीत होते व ही अनुभूति, स्वतःच्या अर्ध-अभिव्यक्त व्यक्तित्वाची ही जाणीव, तो एका खंडित शिल्पमूर्तीच्या प्रतीकामधून स्पष्ट करतो. मागील अनुभवामधून या अनुभवापर्यंत तो आपोआपच येऊन पोचलेला आहे. निसर्गापासून परागंदा झालेलें व्यक्तिमन वस्तुतः दुसरीकडे जीवनाच्या समग्रतेला पारखें झालेलें आहे अशी जाणीव कवीला होते, निसर्गापासूनच नव्हे तर गतिशील चैतन्यसागरापासूनहि कविमन परागंदा झालेलें आहे, असा कवीचा प्रत्यय. कवि स्वतचः स्वतःपासून दुरावला आहे आणि असंतोषाच्या अग्नींत भस्मसात् होणाऱ्या त्रिशंकूची अवस्था सोडून धबधब्याच्या लगबगीने तो बहुजनाच्या जीवनचैतन्याशीं समरस होण्याकरिता धावून जाऊं पाहत आहे.

अखेरच्या टप्प्यांत त्याला पडलेले एक स्वप्न आहे. व्यष्टि, समष्टि व सृष्टि यांच्या एकतानतेमधून पृथ्वीच्या गर्भांत दूरवर मुळें पसरून बाहेर येणाऱ्या विराट वृक्षासारखा तो सर्वांगाने गीतफुलांनी बहरून येतो व गर्गर फिरता पृथ्वीचा गोलक त्या रक्तिम फुलांनी झाकला जातो. हेंच त्याचें स्वप्नस्थ वास्तव होय.

निसर्गाच्या सान्निध्यांतील खिन्न व परागंदा माणसाच्या मनःस्थितींतून व्यष्टि, समष्टी व सृष्टि यांच्या सुसंवादी अनुभवस्वप्नापर्यंत कविमनाने केलेला प्रवास, बुद्धिवादी त्रिशंकूने केलेली ही चिंतनपर मानसयात्रा म्हणजेच 'त्रिशंकूचें स्वप्न' ही कविता एकाच भावनात्मक समस्येंतून अनेकानेक अनुभवांचीं तीरें गाठीत, भिन्नभिन्न भावभावनांचे वळसे घेत, एका व्यापकतर सम्यक् जाणिवेचा प्रत्यय या प्रदीर्घ कवितेमध्ये कवीने मांडला आहे. मुक्तछंदाची खरी आवश्यकता या अशा स्वरूपाच्या काव्यासाठीच विशेष जाणवते. भावनात्मक अनुभवांची व चिंतनाची ही एखाद्या झऱ्यासारखी स्वैरता जाणवल्यामुळेच मुक्तछंद हें आजच्या काव्याचें स्वाभाविक अंग

आहे, असें मी म्हटलें होतें. पुन्हा या कविता संपूर्ण मुक्तछंदात्मक असतात असेंहि नाही. कित्येक ठिकाणीं आपोआपच अनुभवाच्या स्वाभाविक उत्कटतेंतून यमकानुप्रासयुक्त रचना झालेली दिसून येईल. आशयाने आपल्या काव्यरूपाची येथे निवड केली आहे असें म्हटल्यास तें खोटें ठरणार नाही. ह्या कवितांमधील जाणीव भावानुभवांच्या व भावात्म विचारांच्या अनेक अवस्थांना स्पर्श करते, कधी संथ व गूढ बनते, कधी उत्कट व गतिशील बनते, व सरतेशेवटीं एका ज्ञानात्मक वृत्तींत लीन होऊन अंतर्धान पावते. 'शिशिरांतील पौर्णिमा', 'लाल कंदील', 'असेंच आहे कांहीं', 'अंत आहे तसा आरंभ आहे' या कवितांचीं रूपें किंचित् वेगळीं असलीं तरी स्थूलमानाने व तत्त्वतः वरील विवेचन मी आजवर लिहिलेल्या सर्वच प्रदीर्घ कवितांना लागू करतां येईल असें वाटतें. मर्ढेकरांची विसंगतीवर बोट ठेवणारी कविता व ह्या कविता यांत मूलभूत फरक आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

. १० .

या काव्यामागील भूमिकेचें वर्णन संपलें. माझ्या काव्याचें स्वरूप समजण्यास त्यामुळे झाली तर मदत होईल इतकेंच. हिंदींत मुक्तछंद फार पूर्वीपासून रूढ होता व हिंदींतून मुक्तछंदात्मक काव्य मी लिहिलेंहि होतें. शिवाय माझ्या वडील बंधूंचें (हिंदीचे सुप्रसिद्ध कवि श्री. ग. मा. मुक्तिबोध यांचें) मुक्त छंदांतील काव्य समोर होतेंच. मराठींत मुक्तछंद नवा आहे, हें 'त्रिशंकूचें स्वप्न' वगैरे कविता छापून येऊं लागल्यावर मला समजलें. मुक्तछंदाबद्दल जाणीवपूर्वक विचार असा मीं कधीच केला नाही. हिंदी, बंगाली, इंग्रजी, इत्यादि काव्याचें वातावरण भोवताली होतेंच. मराठी काव्यदेखील अल्प प्रमाणांत, विशेषतः केशवसुतादींचें काव्य, मजसमोर होतें. त्यांपैकी केशवसुतांचें काव्य मला तेव्हाहि जवळचें वाटत असे. तें मीं शालेय जीवनांतच वाचलेलें होतें व आजहि वाचीत आहे. परंतु माझ्या काव्यावर खरा परिणाम झाला असें मी समजतों तो हा कोणताहि नव्हे. भोवतालचें वाङ्मयीन वातावरण तर कळत-

नकळत आपोआप आत्मसात् होत गेलें असेलच. माझी जीवनदृष्टि ज्यांनी घडविली त्या विचारवंतांचाच मी खरा ऋणी आहें. त्यांनीच मला एकप्रकारची निश्चयात्मकता दिली. व्यक्तिजीवनापेक्षा समाजजीवन व वैश्विक जीवन सत्य होय, ही निष्ठा मला प्राप्त झाली ती त्यांच्याकडूनच आणि म्हणूनच माझ्या वैय्यक्तिक जीवनांतील अनुभवापासून किंचित् दूरांतरावर उभा राहून मी जीवनाचा विचार करूं शकलों व माझी जीवनदृष्टि कायम राखूं शकलों.

वाङ्मयापुरताच असा विचार मीं कधींच केला नाही. वाङ्मयाच्याच कक्षेंत राहून ललित वाङ्मयाचें रहस्य व महत्त्व कळूं शकत नाही, असें माझें स्पष्ट मत आहे. अभिव्यक्तीचे महत्त्व नाकारून कसें चालेल? परंतु 'कलात्मक-कलात्मक' वृत्तीमुळे कला जिवंत राहूं शकत नाही असें मला वाटतें. वाङ्मयाच्या उपकारक व प्रेरक शक्तीवर माझी पूर्ण श्रद्धा आहे. विज्ञान व वाङ्मय यांच्याद्वारें मानवाचें वस्तुज्ञान व आत्मज्ञान वाढत जातें व मानवाची माणुसकी विकसित होत जाते असें मला मनापासून वाटतें. ललितवाङ्मय हें जीवनाचें एक अंग असल्यामुळे त्याचें जीवनविकासांत कांही तरी 'उपयुक्त' कार्य आहे हेंहि निश्चितपणे मला जाणवतें.

या प्रस्तावनेंत मीं माझ्या काव्याची भूमिकाच फक्त मांडलेली आहे: कोणाशीं बरोबरी केलेली नाही. तशी आवश्यकताहि मला कधी वाटलेली नाही. अशा शेकडो प्रस्तावना लिहून स्वतःच्या काव्याचें मोल वाढत नसते, हें मी जाणून आहें. समकालीन काव्याच्या वृत्तीप्रवृत्तीचें स्वरूप व माझ्या काव्याचें स्वरूप तेवढें माझ्या दृष्टिकोणांतून मीं स्पष्ट केलें आहे.

काव्याच्या अभिव्यक्तीचा वेगळा असा विचार मी स्वभावतःच करूं शकलों नाही. व तसा विचार आजहि मला करतां येत नाही. मोठा गुण म्हणून मी हें सांगत नसून केवळ वस्तुस्थिति सांगत आहें. अभिव्यक्तीचें महत्त्व मला मान्यच आहे. काव्यलेखन करतांकरतांच हा अभिव्यक्तीचा समज थोडाफार वाढत गेलेला आहे एवढेंच मी म्हणूं शकेन. 'नवी मळवाट'मधील कविता आज प्रसिद्ध करतांना मला अभिव्यक्तीच्या दृष्टीने बराच उणेपणा जाणवत आहे. त्या दृष्टीने या काव्यावर

संस्कार करावेत असेंहि मला वाटत होतें. परंतु अगदी आवश्यक वाटणाऱ्या, विशेषतः मुद्रणाच्या दुरुस्त्या सोडल्यास हें काव्य मुळाबरहुकम प्रसिद्ध होत आहे. त्यांत महत्त्वाचा असा कोणताहि बदल झालेला नाही. तसें करणें शक्य नाही हें थोडाबहुत फेरफार करण्याचा प्रयत्न करतांच मला जाणवलें, वे तो प्रयत्न मी सोडला.

.१०.

सरतेशेवटी आभारप्रदर्शनाचें काम तेवढें राहिलें आहे. या कवितांना अगदी प्रारंभी (१९४४ सालापासून) 'अभिरुचीं'तून जागा दिल्याबद्दल मी पु० आ० चित्रे यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्यांनी या काव्यसंग्रहांतील बऱ्याच कविता अगोदर प्रसिद्ध केल्या नसत्या तर कदाचित् त्या पडून राहिल्या असत्या. महाराष्ट्राबाहेर राहूनहि माझें काव्य पहिल्या-प्रथम लोकांच्या नजरेसमोर आलें तें केवळ 'अभिरुची'मुळेच. तसेंच, माझ्या काव्याबद्दल सतत आस्था कोणीं दाखविली असेल तर ती श्री० पु० भागवतांनी. त्याबद्दल व या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग आणल्याबद्दल, विशेषतः ही प्रस्तावना लिहून घेतल्याबद्दल, आभार मानण्याऐवजी त्यांच्या ऋणांत राहणेंच योग्य आहे असें मी समजतों.

१८–६–६४
नागपूर

शरच्चंद्र मुक्तिबोध

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ०
अनुक्रम ............... दि: ...............
क्रमांक ..
१८०७

# नवी मळवाट

नवी मळवाट
नवीनच घाट
नवीन क्षितिजें पहा अफाट

खोल दडपणें
पूर्ण उलगणें
नव्या निर्झरां फुटते वाट

मुळापासुनी
रस ये उठुनी
गुलाब वरती हसे क्षणांत

ही तव खूण
हृदयिं जपून
भरभर चढतों डोंगर-घाट

## पिऊनिया पोसली जी नवे तुषार

पिऊनिया पोसली जी नवे तुषार
अशी वनस्पती मी हो हिरवीगार.

आसुसलेली पृथ्वी जळधाराबाहूंनी
वेढूनिया नभ आलें खाली वाकूनी
पिऊनिया अपरंपार प्रीत नभाची
तारुण्याने बहरली काया सृष्टीची
बहराच्या उन्मेषाचें चिन्ह जोमदार
अशी वनस्पती मी हो हिरवीगार.

पृथ्वी आणी आकाशाचें महामीलन
सीमारेखा धुक्यामध्ये गेल्या लोपून
धरणीच्या वक्षावरी लोळे झंझावात
अंधुकले पहाड नी सागर ते सात
काळें काळें काजळलेलें झुके आकाश
छातीमध्ये अत्युद्दाम पेटला हुताश
कोसळलें तें कोट्यावधी जळधारांनी
पृथ्वी नग्न, समर्पित, स्नात तयांनी.
पृथ्वीच्या त्या आत्यंतिक समर्पणकाळी
माझ्या जीवनाचीं चिन्हें उदयाला आलीं.

प्रचंड तें धुकें सरे, थांबे झंझावात,
मेघ पांगले, नी झरे प्रकाशाचा झोत.
निळ्या आकाशाच्या खाली लाजेमध्ये चूर
हळूहळू प्रकटला हिरवा हा नूर.

पानपाचोळ्यांचा राड दूर सारुनी
काळ्या काळ्या फत्तरांना वेगें फोडूनी
मातीचा तो बुरखा मीं दूर सारला
सौंदर्याने माझ्या वनप्रांत भारला.

अहो ! आश्चर्य मी नवें जंगलांतलें
मृत्तिकेचें रक्त माझ्या पानोपानीं खेळे
नवतीच्या वेगें खदखदून हासलें
विषण्ण तें वन गालीं हासूं लागलें.

जीवनाचा नम्र असा नवा आरंभ
सौंदर्याच्या ओवीचा मी गोड प्रारंभ
वसुधेच्या हृदयाची पीडा सीमेपार
पीडेच्याच अमृताने हिरवी मी गार.

३७७१७
१६९५

## नवी कविता

नवी कविता
आज हृदयीं धगधग करी नवा सविता
जळाया लागे प्राणपिंडाचा सखोल गाभा
कसा रोखूं मी यातनांची ही प्रदीप्त आभा !
काळ्या रात्रीची पोलादी छाती फोडतो विद्युत्तेजाचा शूल
यातनांची ही काळीं डहाळ तीस लागलें ज्वालेचें फूल
क्रुद्ध प्रचंड नवा मार्तंड उराउरांत पेटला आहे
महाप्रखर त्याचा प्रकाश माझ्या उरांत कोंदला आहे
प्रकाशाचिया सागरावरी कोसळतात काळे पहाड
नभघुमट साठवीतसे ब्रह्मांडभेदी ध्वनि धडाड
त्याच ध्वनींनी प्रतिध्वनींनी प्रकाशगीत नावरे आता
उरीं जन्मते नवी कविता
आज हृदयीं धगधग करी नवा सविता

## जीवाची प्रचंड फेक

जीवाची प्रचंड फेक आवरेना, आवरेना
बहकलों पुरा, तोल सावरेना, सावरेना
जगड्व्याळ रूपासक्ती खेचतसे पदोपदीं
शरमती बंध, मन बावरेना, बावरेना !

उसळला प्राणदर्या आटोपेना, आटोपेना
बिथरला उसळून, नभाची तो करी दैना
दूर फेका मर्यादा अन् बंधनें तीं बापुडीं
सूटला हा तीर सूं-सूं: थांबवेना, थांबवेना

दूर उंच महालांत दोन डोळियांचा खेळ
अव्याहत गळे तिथे अश्रुसुमनांची माळ
चाफेगौर वक्षावरी कापे गुलाबाचें फूल
अश्रूंच्रिया लोटाने तें गळे झालें मलूल

माझ्यासाठी तेवतात नयनींच्या ज्योती
माझ्यासाठी गळतात मूल्यवान मोती
माझ्यावरी फुललेल्या कितीकांच्या आशा
कुणा तरी जीवा माझें अस्तित्व दिलासा

कुणी जीवनपथीं पुष्प बनून निजलें
पाठिशीं चालाया कुणी मायेचें सजलें
अरे ! कुणी दूर देशीं हासत, हासत
माझी वाग फुलविण्या निनांवी निवलें

माझी सर्वांवरी प्रीत माझा रूपांवरी लोभ
परी तो ना बांधूं शके अशा जीवनाचा क्षोभ
जीवनाचा क्षोभ ? करी धरित्री आक्रांत
पाषाणाशीं निर्झराची झुंज अविश्रांत

रूपाच्या या वनांतून, मायेच्या या मायेंतून
माझी पायवाट जाई उंच टेकडी चढून
इतक्या आसवांचा निधी, प्रीतीची पुण्याई
मी पिऊनि चाललों घनकल्लोळ बनून

भडके प्रीत आहुतीने मशाल मनगटीं
दारुण हिरीरी उरीं कोमल बंधनें काय तीं !
माझ्या केशसंभारांत घोंघावतो क्रुद्ध वात
माझी झिंगलेली चाल जणू शिव प्रळयांत

आक्रंदते मानवता तमभिंतीआड
ईश्वराच्या कृतीचा हा दुर्दैवी बिघाड
दोहो वेळ साधण्याची जेथ पडे भ्रांत
सांगा माझी जळती प्रीत कशी राही शांत !

सुकुमार मानवाचा झाला चोळामोळा
पोटासाठी विकतात पोटाचाच गोळा

नरक नी या जीवनीं कुठे तो फरक?
समाज नी साम्राज्याचा चालतो चरक

तींत निवे कोळपून व्यक्तीची प्रतिभा
बेफाटशा व्यक्तित्वाची लोपतसे आभा
आज व्यक्ती उठलीसे पुन्हा धडपडून
हिमालय जसा ताठ नभाला फाडून

मत्त अंधकार हाच नाचतो भयाण
देई वाटे क्षणोक्षणीं मलाच आव्हान
निष्ठूर मी, सोडी तुझा अंचळ छायाळ
दोहो मुठींत चिरडीन तमाचे ते व्याळ!

दूर सरा! दूर सरा! हें नृत्य फार भयाण
पदाघातांखाली भूचे कासावीस प्राण
माझे हात पसरले चारही दिशांत
माझे नेत्र गरगरती नभीं उल्कापात

फाडीन या तमाचे मी पटावरी पट
गिळीन या विषाचे मी घटावरी घट
या तमपटाआड विश्वसुंदरी उदास
तिच्या पदचुंबनेंच ज्वराचा निरास

तिच्या रक्त-ओष्ठीं नृत्य जाऊन विरेल
तेंच विश्वीं दिव्य गाणें बनून झरेल
अरे माझ्या जीविताचा समर्पित वेग
तिच्या गोड मुखीं स्मित बनून खुलेल

तोंवर चैन नसे चुके धडकी न तमाशीं
कोसळतील कधी तरी तमाचिया राशी
अंत प्रकटेल दिव्य सुंदरीची ज्योत
दाही दिशा कोंदतील प्रकाशाचे झोत

जन जातील दर्शना बेभान सैराट
तुडवीत खाली अमुच्या रक्ताचेच पाट

## भविष्याच्या गर्भांतल्या बाळाचें रुदन

मानवा, मानवा, काय ही स्थिती
किड्यांचें मरण, जिण्याची भीति
काय ही लाचारी ! अलोट हें दुःख
जाळते जीवन भूक ही किती !

माणसेंच का हीं कोळियांचीं जाळीं !
प्रेतेंच उठून चालाया लागलीं
लाचार नजर, खोलसा आवाज
हृदय ? स्मशान-दहन-भू काळी.

पोट-पाठ एक, भाकरीचें स्वप्न
पोटाचेच गोळे, फार मोठें विघ्न
विका त्यां बाजारीं, लोटा विहीरींत
परंतु पडूं द्या अन्न खळगींत

नारी ? माता! दिसे ध्येयांत शोभून
मूठ धान्य द्या अन् साडी घ्या फेडून
धिःकार संस्कृती ! धिःकार जगास !
घृणेचे भुजंग, जागा चवताळून

अणूच्या स्फोटाने विश्वाचा प्रळय
कांपतें काळीज, वाटतसे भय
दुःखाचे प्रचंड डोंगर फोडून
कोणती आग ही धगधगे अदय ?

मानवी दुःखाचा अतितीक्ष्ण फाळ
मनांची धरित्री भेदतो विशाळ
मानवी शोणितपर्जन्य पिऊन
कोणतें येणार पीक हो तेजाळ !

धरित्री भेदून अन्नपूर्णा आली
धान्याच्या मोत्यांची वरसात झाली
धावला मानव उत्साहें वेचण्या,
कुणी अकस्मात नाहीशीं तीं केलीं !

लक्ष हात पसरले राहिले हवेंत
खोल, काळे, भीषणसे दरे नजरेंत !
नसांचीं तीं दोरखंडें स्पष्ट तरारलीं
तुटलेले सताडसे कडे चर्येवर

अन्नपूर्णा ! दुःखपूर्णा, आणि अवमानित
(आईच्या समोर बाळ दुधाविना मृत)
नमित ती ! केस तिचे मलिन शेतांत
लज्जित ती ! लाज गेली सैतानी हातांत

अग्निलोळ ग्रासी काय पृथ्वी-गोळकाला !
दचकून साऱ्या दिशा दूर दूर झाल्या

धैर्य, आत्यंतिक जळे दुःखाची जाणीव
प्रसूतीच्या किंवा कळा गेल्या कळसाला

भुकेच्या निशेने गेले डोळे तांबारून
यातनांच्या ठिणग्यांचे प्रपात त्यांतून
तप्त धातुरस जळे शिरांशिरांतून
समुद्राचा दाह होई, हृद्द दे सांडून

काळाच्या कपोलीं वाहे शोषितांचें रक्त
सीमेंट हें घट्ट सांधी हृदयें विभक्त
कोट्यवधी वक्ष-धामणांचा तीव्र वारा
धडाडवी अग्नि, आग! महालांत

उलतात जखमा अन् वाहतसे रुधिर
गोठलेले डोळे झाले क्षणामध्ये अधीर
लाचारीच्या शिळा घणघावाने दुभंग
बधिरता नष्ट आता निर्झर उध्र्वेग

दुधाविना अन्नाविना मेलेल्या बाळांनो
खुल्या डोळां बघणाऱ्या कंगाल आयांनो
रस्तोरस्तीं मरणाऱ्या दुर्दैवी जीवांनो
खोल जखम हो केली प्राण देणाऱ्यांनो

प्राण तुम्हीं दिले, आम्ही चैतन्य पावलों
अश्रु तुम्हीं दिले, आम्ही आग्नेय जाहलों
आम्ही खोल-खोल तुमच्या प्राणांत बुडालों
अगाधता पाहूनीया स्तंभितसे झालों

आता झालें ज्ञान करूं जीवास कुर्बान
उद्याच्या सौंदर्यास्तव भयंकर ध्यान
उद्याच्या त्या दिव्य आणि ऊष्ण प्रीतीसाठी
आज सोडूं द्वेषाचिये जळजळीत बाण

निःस्वार्थ ही हिंसा, फोडूं प्रचंड धरण
खोळंबल्या दर्याचें हो बलाढ्य स्फुरण
तडे जाती खोल—नाश ! नाश हा निकट
दिशा कापतात वक्षीं झेलण्या जीवन

स्वातंत्र्य हें स्वप्न किंवा भोळ्यांचा विचार
म्हणा ! जीवनाचा नद नाही थांबणार
त्याच्या लाटा दाही दिशा पोटांत घेणार
आजचें जें स्वप्न उद्या वास्तव होणार

आक्रांत कां मांडतां हो माझे पंचप्राण
सशक्त व्हा, पाय रोवा, उद्याचीच आण
पालटतें कुणी विश्व-इतिहास-पान
जीवनाची जय बोला, उंचवा निशाण

हुश्शार रे ! जन्म घेतें कांहीसें नवीन
प्रचंडशी जनशक्ती जिंके यामधून
आयका ! या संघर्षाच्या गदारोळांतून
भविष्याच्या गर्भातल्या बाळाचें रुदन

## कुणाच्या वेदना

कुणाच्या वेदना साठून साठून
        उरांत माझिया दाटून राहती ?
कुणाचीं आसवें वाहून वाहून
        कपोलीं माझिया सांडून वाळती ?

कुणाच्या रक्ताची संतप्त धारा ती
        माझिया प्राणास फोडून वाहते ?
कुणाची दुर्दशा, तक्रार मूकशी
        रात्रींत वक्षास सारखी कापते ?

केवढें ओझें हें ? वाकलों खालती
        कांपती थरथर माझीं हीं पाउलें
कुणाचें पाप हें खदखद हासत
        माझिया मस्तकीं चढूनी राहीलें ?

कुणाचा आग्रह चालवीतो पुढे ?
        साक्षात निशेस घेतलीसे शिरीं
प्राणांत करील वेदना अत्यंत
        प्रेरणा अजस्र शक्तीचीच परी—

कोणत्या ? चालवी पुढेच पुढे जी
कशाने येतसे मृत्यूंतहि धीर !
निशेच्या मस्तकीं विराट उज्ज्वल
चरण ठेवीत कोण ये अधीर ?

## रुधिराच्या लाल सड्यांतच

अश्रूंतुन हासत हासत स्वागत तव करतों
दुःखाने रुद्ध कंठ तरि जयजय तव म्हणतों
मी प्राणशक्ति केंद्रित करुनी घोर दुःख जगतों
पीडेने झिंगुनिही नामस्मर तव करतों

रे घोर-दलित, अपमानित रौरववासी मी
मी शापित, असें उपेक्षित, नित्यप्रवासी मी
ठेंचाळत ठेंचाळत पथ चालत क्षतविक्षत मी
प्रखर ज्वरें मूर्च्छेतच तव स्वप्नें पाहत मी

हिल्लोलित पुलकित प्राणांनी मी म्हणतों 'स्वागत !'
थरथर तनु कापुन, उर दाटुन म्हणतों मी 'स्वागत !'
युगियुगिंच्या पीडेची शपथ तुला ! ये तूं ये
रक्ताचीं पुष्पें मार्गी पसरुन म्हणतों 'स्वागत !'

युगियुगिंच्या अपमानें दीप्त घृणा जागवुनी
युगियुगिंच्या पीडेला चेतवुनी चेतवुनी
मृत्यूच्या हिमकुहरीं उब्रवुन उब्रवुन जीवन
प्राणपणें जगलों मी तुजवरती विश्वासुन

नेत्र धुंद पीडेने दीप्तिहीन विझलेले
बर्फप्रदेशांतिल गार-गार मृत्यूसम थिजलेले
मम विराट वदनावर पर्वतरांगांसम शुष्क अशा
त्या विराट दुःखाचे क्रूर लेख लिहिलेले

मी अनंत-तिमिराचा मंत्र-शांत सागर निश्चल
तुडवुनि मज संस्कृतिचे ताज उभे स्फटिकधवल
मी विस्मृतपाप जसें शुभ्र वसनिं झाकुन मज
ज्योतिर्धर संस्कृतिचे बसले दिव्य प्रीतिने पुलकुन

त्या दिव्य-प्रीति-अपमानाची तडित्‌शिखा कोसळुनि
अतिव घोर पीडेने जडसागर गेलों मी हलुनी
कोटिकोटिं पर्वतलाटांनी अंबरिंच्या घुमटा भंगुनि,
मम प्रचंड रोषानल पेटुनि, भविष्यकुहर प्रकाशुनि—

येत्या युगायुगांतुनी दिसलीं बाळपाउलें हलतीं
कोटि तरंगांच्या हातांना जुळवुनि केलें पुढती
मी निद्रित सागरसम, हिमाचलासम उठुनी बसलों
नी दिसल्या रुधिरनद्या, भस्म भस्म मजभवती

नाश ! महानाश ! चिताभस्म जुन्या जगताचें
मी ललाटिं चर्चुनि करि ध्यान महत्‌ स्वप्नाचें
नैसर्गिक नाशाच्या अतिविराट औदास्यांतुन
मी पीडित मानव ! तव स्तव करतों प्राणवचें

ये नाशांतुन, मृत्यूंतुन पीडेंतुन ये—स्वागत !
ये अश्रूंतुन, अपमानांतुन, दैन्यांतुन ये—स्वागत !

ये तडफडत्या हृदयांच्या टपटपत्या रुधिरामधुनी
विश्वभक्षि रोषानल ज्वालांमधुनी ये तूं स्वागत !

ये वसंतबहरासम शिशिराच्या गार गारठ्यामधुनी
रात्रीच्या अनंत पीडेंतुन बाळ-उषेसम जन्मुनि
ये अनंत मृत्यूच्या काजळपंकामधुनी वर ये ये
शतदलसुवर्णकमळासम तूं तरळुन पूर्ण विकासुनि

उलते जणु अनंत पीडा ही घोर कळा क्षणभर लागुनि
धडपडतों हसण्यास्तव अश्रुधुकें भेदुनि भेदुनि
तें अनंत अंबर भारावुन अतिशय जड बनलें मम स्कंधीं
दाहि दिशा अत्युत्सुक बसल्या श्वासांना क्षणभर रोखुनि

मी चलहिमाचलासम वाकुनि हसलों, हसुनी रडलों
रुधिराच्या रक्तसड्यांतच बाळ नवें रडतें क्रंदुनि.

## कष्टाचें गीत

ओढा रे ओढा    जोखड बळें
खांद्याला पडले    डाग हे काळे
—डाग हे काळे

जीवाचे कोळसे    दाबा हो आंत
रक्ताचीं आसवें    रोखा डोळ्यांत
—हें कष्टाचें गीत

विस्तीर्ण वडाच्या    ढोलीमधून
पोकळ घों-घोंचें    कण्हत गाणें
—हें मृत्यूचें गाणें

मारा रे मारा    मारा कुदळ
फत्तर फोडून    उसळे जाळ
—हा प्रखर जाळ

खोदा रे खोदा    सोन्याची खाण
रक्ताच्या सड्यांत    झळके सुवर्ण
—हें दुष्ट सुवर्ण

कष्टाचें गीत    —मेलेल्या जीवांचें उदास गीत

वि:
नों दि

# गभीर झडते गगनदुंदुभि

गभीर झडते गगनदुंदुभि
क्षितिज-मैदान-सरहद्दीवरी
मेघांची प्रचंड सेना ती उभी
झडते भैरव गगनदुंदुभि

भरारा भरारा धावून मेघांनी
पुसल्या दिशांच्या धूसर रेषा
अत्यंत घोरशा उत्तापें तापून
जखमी धरेची व्याकूळ दशा
गगननगाऱ्यावरती प्रचंड
विजेच्या प्रहारें गभीर घोष
झडते गभीर गगनदुंदुभि

गभीर घोषानें जागृत झालें हो
दबलें, जखमी, कृपण हृदय
उथळ निराशा विराली विराली
जागला उद्दाम जीवनप्रणय
गीतांचे प्रचंड विशाल पंख
पसरून गरुड उड्डाणोधीर
दुर्धर्ष संगर बोलून आला रे

छंदांचा हुंदळे उद्दाम समीर
आल्या हो उदार हर्षांच्या लहरी
झडते गभीर गगनदुंदुभि

केवल पुस्तकी क्रांतीचे आम्ही
यांत्रिक गीतांचे कागदी कवी
त्रयस्थ राहून दुरून तोषूं
रचून कविता महाविप्लवी
वंचित जीवननदाच्या प्रचंड
गतीच्या जाणीवेपासून आम्ही
वंचित मानवी संघर्षांचिया त्या
महान् विश्वासापासून आम्ही

निर्झर घेतात अखंड झुंज
पहाड होतात विदीर्ण रोज
झुंजीची उद्दाम पिपासा लेश
स्पर्शेना, नैराश्य ग्रासतें रोज
बोथट दुबळ्या वाणींत आणा रे
अत्यंत तीक्ष्णशी कट्यारी धार
विराटगगननगाऱ्यावरी
विजेचा प्रखर आग्नेय वार

घायाळ पक्ष्याच्या उरांची तडफड
तळमळ उरांत जागली कधी का ?
अनंत दीनांच्या संथशा हत्येने
प्राणाग्नी कल्पांत पावला कधी का ?
माणुसकी झिजून झिजून मरते

क्षयाने झिजत्या दरिद्र्यासमान
सौंदर्य जळून कुरूप बनतें
देवींनी डागल्या चेहऱ्यासमान

प्रेताच्यासमान जळके सांगाडे
मातीचीं खापरें पुढ्यांत घेऊनी
"अन्न द्या! अन्न द्या!" करिती आक्रोश
डोळयांच्या खाचांत प्राणास कोंडूनी
दयाळू फेकती अन्नाचा दाणा नि
सांगाडे तुटती वेगाने वरी त्या
कर्कश भांडून रक्ताने नाहून
शापिती दुजांना ध्वनीने मरत्या

मागल्या रात्रीचें निस्तब्ध काळीज
कापीत रडती मांजरी जमून
दाण्याच्या स्वप्नाने दचकून जागून
सांगाडे करती भसाड रोदन

रात्रीच्या उरांत खंजीर घुसून
रक्ताचा कोसळे प्रचंड प्रपात
रक्तस्रावांतून जन्मास येतसे
अरुण, कोमल, महान पहाट

तुझ्याही उरांत जाणीव-खंजीर
घुसून रक्ताचीं आसवें गळालीं?
हृदयामधून शोणित झरून
महान् कविता अवतीर्ण झाली?

प्रचंड झंझेचे दिसती आसार
विराटगगननगाऱ्यावरी
विजेचा प्रखर आग्नेय वार

विजेचा प्रखर आग्नेय वार
जागवी प्रचंड भैरव घोष
ऐकून धरणी पावते तोष
अशक्य, अशक्य, अशक्य असे
निर्मूल करणें जीवनाकांक्षा
मानवतेची स्वातंत्र्याकांक्षा

काजळी तमाच्या युगांच्यामधून
निर्धारें चालला पीडला मानव
मस्तकाभवती स्वप्नांचीं विराट
प्रकाश-धूमिल आवर्तें नाचती
कोटिशः दुखऱ्या भेगांच्या पायांत
झंझेची झिंगली मस्तानी गती
प्रत्येक निःश्वास अनलोर्मीपूर्ण
नयनामधून विजेचे प्रपात
क्षणांत दीनांची भुकेली सेना—की
क्षणांत जाज्वल्य मानव विराट !

युगांच्या काजळीं तमाच्या ब्रह्मांडीं
शेंदरी किर्मिजी धगधगीत वाट
वरून चालली अनंत पदांची
विराट सेना ही, अलौकिक थाट !

पळभर उठून प्रचंड तुफानें
तमाच्या लोळांत लोपतें हें चित्र
कोमल कवीच्या आशेच्या पत्त्यांचे
बंगले उध्वस्त, मतीही विचित्र!

लाडक्या कवे! तूं बालिकेसमान
निराश जाहला अपेक्षाभंगाने,
धुराने, मृत्यूने, आग-पावसाने
अनंत प्रेतांच्या कुजक्या गंधाने!

अग्नीची धुराची विराट घोंगडी
लेउनी रौद्रसें अस्तित्व हेंच तें
ज्वालांच्या पदांनी येतसे चालून
ज्यांची तूं गाइलीं मधु-गोड-गीतें

गंभीर उराच्या प्रकाशचक्षूंनी
पहा रे जाण रे प्रगतियात्रा ही
शेंदरी जळत्या वाटेच्या वरूनी
अनंत पदांची जयिष्णु यात्रा ही!

अंधारावरती विजेच्या लिपीने
खोदला जातसे घोष हा गंभीर
जागला मानव! हुश्शार! हुश्शार
रक्तशा धरेला हिरवा शहार
विराट गगनगाऱ्यावरी
विजेच्या त्वेषाने प्रखर वार.

भविष्यकाळाचा अज्ञेय अनंत
कभिन्न काळोखी पठार पामीर
तयाला बांधलें युगानुयुगें जें
प्रचंड अस्तित्वपीडेने अधीर

भविष्य-अंधार-पामीरावरून
प्रचंड बळाने बंधनें तोडून
वर्तमानाच्या या प्रकाशप्रदेशीं
महान् अस्तित्व येतसे निघून

टाकीत विराट पाउलें ऐका,
येतच आहे तें येतच आहे
ऐकत आहें मी चाहूल त्याची
उराच्या कानांनी ऐकत आहें

पसरून आपले विशाळ हात
भविष्यामधून वर्तमानकाळीं
युगाधीश येई कवळावयाला
मानवता नवी जन्मास जी आली

युगाधीश येई ! युगाधीश येई
दिशांच्या विराट महिरापींखाली
विराट गगननगाऱ्यावरी
गभीर घोषांच्या उठती लहरी

चाललें प्रचंड महाघोर युद्ध !
धरेच्या अनंत लावण्यावरती

गुंजल मारून बसले जे भुजंग
धावले त्वेषाने मारून टाकाया
शिशुमानवाची महातेजोमूर्ती.

चालले प्रचंड महाघोर युद्ध !
लक्षावधी काळे नाग महाक्रुद्ध
वेढती बाळाच्या गुलाबी देहास
प्रचंड शक्तीने करावया बद्ध

झाकती तनूस, मारती फणांनी
चिरडून टाकाया नवजात शक्ती
विषाचे फूत्कार सोडती द्वेषाने
अनंत भुजंग बल एकवटती

बाळमुठींमध्ये परंतु बाळाच्या
कोणती विराट अजस्र शक्ती ती ?
सापडून ज्यांत दुर्दांत भुजंग
विषास भडभड सारखे ओकती !

घट्ट ते वेटोळे बालकावरचे
सारखे होतात सैल, अतिसैल
काळ्या-काळ्याभोर विषारी सर्पांचें
बल क्षीण होई, मृत्यूही होईल.

पृथ्वीच्या फिरत्या गोलकावरती
येतसे युद्धाची अंतिम घडी ती
लीलेने हासत तेजोमूर्ति बाळ

रक्ताने माखले महाशक्ति नाग
मारीत आहे हो चिरडून ठेचून
तनूंतून त्यांच्या झट्कीत प्राणास !

प्रचंड शक्तीच्या मुठी हालवीत
महान् तेज तें घेतसे अवतार
कवीच्या उरींही आशेचा संचार
विजेचा होतसे अनिवार मार
विराटगगननगाऱ्यावरी !

ठाणे: १५
वि: ..................
दि:

# माझ्या पीडेला अर्थ येईल

□ १

कललीं उन्हें सोनेरी खाली
हिरव्यागार मैदानावरी
सर्सर झरल्या सोनेरी सरी
जळाच्या निळ्या दर्पणावरी

उडाल्या धवल विहंगपंक्ती
सावळ्या दूरच्या डोंगरापार
जयाच्या मागे लाललालसा
विझे जळता सोन-मिनार

वातावरण फिकट निळें
सौम्य गुलाबी मृदु रेशमी
दूरदूरच्या कौलारांतून
धूम्ररेषा त्या आकाशगामी

गडद झाली उरींची व्यथा
यातना गेल्या सीमेच्या पार
अंतरीं खोल, खोल विवरीं
दाटला काळानिळा अंधार

नाही ग तुझे उजळ डोळे
(प्रेमळ शांत तारक दोन)
कमनीय ते तन्मय भाव
(काळ्या छायेंत दीपक मौन)

नाही ग तुझी आर्त काळजी
वक्षाखालचें तीव्र स्पंदन
नाही ग तुझें गंभीर खोल
परंतु भोळें आर्जवी मन—

देणार धीर, वालविणार
नाही मृत्यूची भेसूर छाया
जिच्या बाहूंत लांबच लांब
झुंजे मनाची थकती काया

■ २

नभाच्या मूक आशीर्वादाने
हिल्लोळत ना मनःसागर
प्राणप्रिय त्या पुष्पदऱ्यांनी
जीवा येईना आज बहार

आज वाटेना खगांच्या नेत्रीं
न्याहाळावेत दिशांचे देश
घ्यावा वाटेना तुझ्या संगतीं
रेशमी सैल वसंतवेश

वाटेना लाल कर्दळी-वनीं
फिक्या दुपारीं स्वैर हिंडावें
आणि वाटेना स्वप्नाने जड
कळ्यांचे डोळे उमलवावे

दुर्बलतेची लागून गोळी
दुभंग झाला माझा हा ऊर
नको ग प्रीती, गळे खालती
माझा हिलाल धुळींत दूर

धुळींत माझा खचे विश्वास
तम-अजगर गिळी ही ज्वाळा
एकवटून समस्त शक्ती
उभवूं कसा माझ्या हिलाला ?

■ ३

पाठीवरती जुन्या पापांच्या
समंधांचा तो अजस्र भार
चारी बाजूंस विद्रूप रडें
रडतें जग, स्तब्ध अंधार

हृदयीं चाले प्रचंड द्वंद्व
पाऊल गिळी धरणी खोल
महासायासें उपसतों मी
देऊन कधी जीवाचें मोल

माझ्या हृदयीं विराट ओढ
गती घोटाळे, उरीं आक्रांत
उन्मूलित हें जीवन माझें
रोजचें नवें घर नी प्रांत

एकाकी एक ग्रह हिंडावा
जळत आणी सोडीत धूर
स्वप्नांच्या तीव्र ओढीसरसा
जळत नित्य हिंडतों स्वैर

■ ४

फोडीन कधी तमाची छाती
कोसळतील प्रकाशधारा ?
करीन कधी बलाढ्य असा
माझा प्रज्ञेचा प्रचंड मारा ?

मारीन कधी गळा दाबून
जुन्या पापांचे क्रूर राक्षस ?
कधी करीन जिवंत रुद्ध
थिजलेलें हें जीवनगीत ?

अशा निबिड व्याकूळ वेळीं
विझे कांहीसें, आर्त हो मन
बालरवीचे धडधडतात
निशागर्भांत परंतु प्राण !

■ ५

मोडक्या धनूसमान माझी
भिवई आहे उंच झालेली
नयनीं माझ्या विलक्षणशी
जळजळीत ती घृणा पेटली

नसानसांत जळत जाई
एक दाहक लाट, तेजाब
आज प्यालों मी कालकूट तें
घृणेची काळीं तीक्ष्ण शराब

कपाळाच्या मधोमधच
गोळा उंचसा सळ, तिटकारा !
हृदयकुंडीं धगधग करी
दीर्घद्वेषाचा लाल निखारा

अनावर या माझ्या प्रीतीने
लाल घृणेचा झोत तेजाळ
युगरुद्राच्या भव्य कपाळीं
याच तृतीय नेत्राचा जाळ

■ ६

वरकांती हा वाटे आवेश
अव्यक्तच ते खोल उद्गार
कोणासाठी ही अशी तळमळ
फसवा किंवा सारा प्रकार ?

कुंठित आणी खंडित असें
व्यक्तित्व भग्न मूर्तीसमान
खिन्न उराने जाणूं कसा मी
दिव्यकांत ती घृणा महान ?

पुरेशी नाही झाली ओळख
जीवना तुझ्या बृहत् उराची
नाहीच कधी संघर्षांतून
नव्या प्रीतीची प्रतीती झाली !

कोणतें सत्य ? तीव्र घृणा, की
खिन्नसें माझें आर्त अंतर ?
जीवन सदा जागें ठेवी जी
सत्य वेदना अतिदुर्धर

आकाश खाली भारावे आणी
धरणीवरी माथा टेकतें
तेवींच धूलीमध्ये अस्तित्व
समग्र माझें तन्मय होतें

खचित ! माझी पीडा धरेल
तिच्या वक्षांत मूळ खोलांत
माझ्या पीडेला अर्थ येईल
लक्ष लक्ष त्या गीतफुलांत

# छंदांच्या लहरींवर लहरी

छंदांच्या लहरींवर लहरी
माझी प्रज्ञा झाली गहिरी

लक्षावधि स्वप्नांच्या ज्वाळा
रोखुं कसा मी अनलउमाळा

दिशादिशांच्या लाख कमानी
त्यांतुन झिंगे मत्त जवानी

गोल धरेचा मधून फुटला
ज्वालामुखिकल्लोळ उसळला
दुःखाचा आकांत पेटला
मूल्यांचा आक्रोश उसळला

असली दाहक शराब पिउनी
डुले नि झिंगे मत्त जवानी

अवकाशांतुनि घोर काजळी
धरणी गिरक्या घेत चालली
ज्वाळांची फडफडती कफनी
घालुनि तीवर उभी जवानी

लखलख जळता तीर निघाला
हृदयाचा अणु पूर्ण भेदला
लाहि लाहि हा जीव जाहला
दाह पोचला पराकोटिला

कळा लागुनी आळा सुटला
मृत्यूंतुन नवजन्म लाधला

दिशा फोडुनी पक्षि निघाले
वक्ष भेदुनी छंद निघाले
कोट फोडुनी उदधि पसरला
स्वतंत्र झाला महाउमाळा

## उसळला वरती तेजोगोल

उसळला वरती तेजोगोल
निमाले भान, कळाले मोल

विराले दिवास्वप्न तें पार
गवसला चैतन्याचा हार

मनाच्या कुहरीं अपरंपार
सांडली मधु तेजाची धार

मनाला नवीन साक्षात्कार
वाणीला नवीन भलती धार

जगाचे धो-धो रजतप्रपात
दृष्टीच्या सहजीं आटोक्यांत

नव्या छंदें हेलावति प्राण
जिवाचा पक्षि घेई उड्डाण

मनाचा दुरंदूर फैलाव
जगाचा आंत-आंतुनी ठाव

कळे कोठे रुपतें तें खोल
बोलही बनती अधिक सखोल

गाठुं ये जलदी मधली धार
सोड नौकेचें शीड फरार.

# नको मनाला हळहळ असली

नको मनाला हळहळ असली
तुला सोडुनी दूर जायचें ! दुजा कुणाला कळकळ कसली ?

होइन तन्मय तुझ्यासवे मी दूर सारुनी मोह पथाचा
आलिंगिन, वाटेल तुला तो, गडे, निवारा युगायुगांचा
तव डोळ्यांची हसरी माया चुंबुनि घेइन आवेगाने
जिवा ! तुझ्या मांडीवर डोकें ठेउनि झोपिन पूर्ण सुखाने
व्यथासघन डोळ्यांत नाचतिल गोड खरोखर भाव निराळे
विसरुनि सारें सारें जाइन, परंतु हसविन तुलाच बाळे
तुझ्यासारखा झिंगिन पाहुनि आंबेराई ती रसरसली
—नको मागुनी हळहळ असली

घरधंदा ग तुला सुचेना—नव्या अषाढीं गहिरी छाया
दूर वनांवर, उंच डोंगरीं, उजळ-सावलीची ती माया
तुझ्या जिवाला घोर लागुनी सारं अळणी गमेल तुजला
मागुनि येउनि चोरपाउलीं, हळूच स्पर्शिन तव स्कंधाला
तुझ्या जगांतच तन्मय होइन ऊब तुझी लाधली जयाला
तुझ्या गळां गुंफीन गळा मी कृष्ण बनूनी जंगलांतला

उत्कटतेने धावुनि आणिन ज्या ज्यावर तव दृष्टी खिळली
—नको मागुनी हळहळ असली !

सांगुनि ताटातूट उद्याची उणें न आणिन मीलनासि या
गडे! उद्याची आर्त काळजी म्लान करो ना तव वदनाला
आज तुला मी, मला तूंच गे, मान तुझी माझ्या स्कंधावर
नयनपाकळ्या मिटल्या असुं दे, निवांत श्वसुं दे तव उर मंथर
तुझ्या सानुल्या जिवा काळजी आज तरी लागो ना कसली
—नको मागुनी हळहळ असली !

मध्यरात्र! तव हात गळ्यावर माझ्या विश्वासें पडलेला !
शांत झोपल्या वदनीं भोळा भाव मधुरसा तो रमलेला
वारा वाही संथ, नभीं त्या चंद्र फिकटसा अन् थकलेला
तुझा निरागस जीव स्वप्निं त्या स्वर्गसुखामधि मोहरलेला
सतत-प्रवासी उठेन मी मग हाक ऐकुनी दूर कुणाची
अनावर मला ओढिल माया दूरदूरच्या गे रस्त्यांची
जनःसागरीं मिळेन तेव्हा सापडेन ना कधी निराळा
मला बोलविल दूरदूरच्या राजपथांचा गरम धुराळा
विसरुन सारें तें गाऊं ये घेउनिया गिरकी असली
—नको मागुनी हळहळ असली !

तुला सोडुनी दूर जायचें !—दुजा कुणाला कळकळ कसली ?

# मळकें उदास

मळकें उदास ओंगळ आभाळ
झिरपे संतत सांज नी सकाळ
गडद धुक्यांत दिवस झाकले
जग हें सारेंच शोकांत बुडालें

पहाट-दुपार-सांजेचे सुरंग
विराले, उरला काळोख अभंग
पडून बर्फ तें शरीरावरती
जायाच इंद्रियें व्हावींत क्षणीं तीं
बधीर ! थांबवावें चलनवलन
उराचें थिजावें क्षणैक स्पंदन
तेवींच मळक्या रडक्या नि सुंद
दिसानें करून सर्व क्रिया बंद
पांगळें करून डांबलें जिवाला
एकटा भेटलों एकटा स्वतःला
नित टाळलेल्या हृदयदेशांत
अंतर्देशांतल्या महाएकांतांत
कित्येक युगांच्या थडग्याखालती
प्रीतीच्या प्रेताची निजलेली मूर्ती

तेथेंच नेऊन सोडलें जिवाला
अनंत दुःखाचा लोटला उमाळा

ठिकऱ्या ठिकऱ्या मृत्तिकापात्राच्या
व्हाव्यात, अथवा सुगंधें धूपाच्या
क्षणैक जळून राखच उरावी
कशी हो प्रीतीची माधुरी सरावी!

शरीरें दोन कीं, प्राण तो एकच
हृदयें दोन नि धड्धड एकच
अत्यंत उत्कट प्रीतीच्या गंधानें
नितळ पौर्णिमा दर्वळे वासानें

अजून अस्थिर प्राण हे होतात
उरली प्रीती ती स्मृतीच्या रूपांत—

आतडीं उरींचीं पिळवटावयाला
तनूंच्या अणूंना क्रंदवावयाला
एकाकी भेटतां ऊर हें दुबळें
अंतर्हृदयांत कधी हो एकलें
विंधून विंधून स्मृती ती शरांनी
दुःखातिरेकानें टाकते गांजूनी!

पुष्टशा कोळ्याच्या जाळ्याच्या गुंत्यांत
तडफडे माशी ती, गुरफटे तयांत
जीव कासावीस उरीं लागे जाळ
मळकें उदास ओंगळ आभाळ!

# हिवाळ्याचा परिचित गूढ गार अंधकार

हिवाळ्याचा परिचित गूढ गार अंधकार
आहे एक मैदान नी पिंपळाचा एक पार

शहराचे दिवे दूर मागे टाकूनिया आलों
विस्मृतीचीं वस्त्रें दूर सारुनिया नग्न झालों

खिन्न झालों, कमालीचा आर्त गेलों होऊनिया
हेंच स्थळ! अंधाराच्या गूढ बोलावत्या खुणा

झाले पुढे गार वाऱ्याचे ते छोटे मऊ हात
सहानुभूतीने माझ्या कपोलांस गोंजारीत

प्रत्येक स्पर्शात गार ऊष्ण श्वासांचे हुंदके
प्रत्येक प्रसंग मूर्त...ओठांचे ते कंप मुके

भारून गेलों मी माझ्या भवतीच्या आभासांनी
हलकेच ओळख दिली, वरी टाळ्या वाजवूनी—

पिंपळपानांनी! आणि चर्र जाहलें मनांत
शुभ्र अश्रू तुटे तोच! की ती काजव्याची ज्योत!

सहसा दिसे तें भोळें भाबडेंसें गोड मुख
अपार दुःखांत माझ्या व्याकूळलें जुनें सुख

भासलें की मुसमुसत रेशमाची मिठी पडे
अंधारांत शरीराची शिराशिरा वेगें उडे

झुलतोसे रेशमाचा कचपाश वाटूनिया
फुका अवकाशांत जाई माझा हात फिरूनिया

काजव्यांची माळ दूर दूर लखाखत जाई
पिंपळ पानांच्या टाळ्या फुका वाजवीत राही

हाय ! हेंच मैदान तें, पिंपळाचा हाच पार
हिवाळ्याचा परिचित गूढ गार अंधकार

# सांज ये हळूहळू

सांज ये हळूहळू नि गाढ गर्दलें धुकें
क्लांतशा मुखावरी हसें पुसटसें फिकें

तम चढे परोपरी नि मन रडे क्षणोक्षणीं
मशिदिंतून ये 'अजान' काय कंपवी उरीं ?

भिरंगती नभांतरीं विकल पाखरें वरी
ओढ लावते तयांस नील कोठली दरी ?

सनइची विषण्ण तान सांज-पदर ओलवी
सुन्या मनीं घुमोनिया विकलताच वाढवी

गौर सांज स्फुंदली नि दूर पार उतरली
तारकाटिपें किती हाय गे निखळलीं

या निबिडशा तमीं खिन्नशी तुझी छबी—
तरळली आणि नयनिं अश्रुधार लोटली

## विसर क्षणाचें मृदु नातें

मी परदेशी पांथ
संध्या वेळा, अंग टेकलें, पाहुनि एकांत
परतत होतीं गाइवासरें, पसरत होतें ध्वांत
पाणवठ्यावर बसली होतिस शून्य मनें तूं क्लांत
कलश रिकामा, दृष्टि शून्य तव, ऊर कशास अशांत ?
वेणिफुलें ग झरझर गळलीं कसली पडली भ्रांत ?
मी परदेशी पांथ.

पाहुनि मजला तृषित, पाजुनी जल केलें तूं शांत
अंजुली करुनी तें जल पीतां नीर उभें डोळ्यांत !
तुझ्या दृष्टिसी दृष्टि लावली झाला तदा दिनांत
पाठ फिरवुनी साश्रू गेलिस विषादमयी नितांत
कसली मर्मवेदना साहत गेली ? झुरें मनांत
मी परदेशी पांथ.

तमाच्छन्न जग, उन्मन येथे बसलिस कशा वनांत ?
गहन तमीं तव काय हरपलें ? अनिमिष पाहसि त्यांत ?
नीलम नयनीं तरल तरळुनी तारे कशा चमकतात ?
शिथिल करांतुन कमल गळे जें दिलें तुझ्या हातांत

निरोप ! मृदुले, पूस लोचनें, परदेशी मी पांथ !
मी परदेशी पांथ.

पाठिशिं सुखदुःखाचें ओझें
पंथा क्रमितों आतुर, गवसे कधि मजला माझें
स्वतःशींच मी असंतुष्ट सखि, अभावमय जग हें गमतें
व्याकुळ या उरिं जळे कांहि तरि दृष्टि ध्रुवावरती स्थिरते
दुर्गम अतिशय पंथ, सुनिश्चित पुढेच पाउल नित पडतें
सरल किशोरी जीव लावि ना, विसर क्षणाचें मृदु नातें
पाठिशिं सुखदुःखाचें ओझें !

## युगांच्या नंतर

अंधारलेली निवांत खोली
दवारलेलीं बाहेर वनें
शहारलेलीं आपुलीं गात्रें
फुलारलेलीं आपुलीं मनें

मेघांची सुर्मई दाटशी छाया
दूरच्या हिरव्या जंगलावरी
मऊशी पिंगट तिमिरशाल
हळूच वेढते वसुधा सारी !

रिकामा पाणोठा झालासे आता
जंगली कण्हेर ढाळिते फुलें
सरसर सोडून वापींत दोर
कुणीशी ओढते लगबगीमुळे

झटका देऊन कळशी वरी
खेचून, गुडघा देऊन शिरीं
ठेवून, चालली घाईंत पोर
श्वासाने उरोज उभार धरी

रोजचे थांबले व्यवहार आज
थांबलें बुद्धीचें क्षणैक यंत्र
उत्कट अंधारीं विरून जग
उरलें तुझ्या नि माझ्यांत मात्र

आत्म्यांचे आपुल्या मिळाले नेत्र
युगांच्या नंतर आजच सये,
वोळून आले गे रसाचे मेघ
शून्यशा डोळ्यांत आजच सये

वोळून आलेले रसाचे मेघ
मेघांत लखाखे विजेची धार
पांगुळे प्राण हा जेथच्या तेथ
गळाली ग्रंथीही यंत्राची पार !

वर्षानुवर्षें सहवास जरी
प्राणांचा प्राणास साक्षात्कार
आजच जाहला, एरवी दोघें
यंत्रेंच निमूट करूं व्यिगार.

आजच्या क्षणींच भेटून फक्त
किशोरी किशोर आपण आहों
वनींच्या हिरव्या मर्मांत दाट
फोडतो मयूर उत्कट टाहो !

## वर्षागम

सये, पहा ढगावरी ढग आले ओथंबून
बाहेर ये, निळें-निळें आलें गडे अंधारून
सुटलासे उन्मादक उद्दामसा शीत वारा
झरणाऱ्या कुसुमांनी वापी गेली झाकळून

यौवनाचा बहार हा सुगंधित धरणीचा
वेळूवनीं छायामर्मी तीक्ष्ण टाहो मयूराचा
उतरून चुंबी जळ करी मेघ मंद्र घोष
लाख लाख तरंगांनी मत्त प्राण सरितेचा

तुझ्या विशाळशा नेत्रीं डवरले नील घन
कोणत्या ग, आर्द्र स्मृति पुसटती डोकावून
फार खुपे द्वैत, प्रिये, हेलावतो पंचप्राण
असीम या सौंदर्यास केवी घेऊं आलिंगून?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ...................... वि: ......................
क्रमांक ...................... नों दि: ......................

# विस्मय

उडालें पाखरू निळ्या विस्तीर्ण आकाशीं
माझ्या मनाच्या बेडीने खाली ओढूं का तयासी !

काळसागर वाहतो जाती लाटा त्या प्रचंड
माझ्या छंदांत बांधूं का एका लहरीचा खंड ?

सृष्टिसुषमा अनंत तिचा स्वर्गीय विस्तार
माझ्या रेखांत आणूं का एका छटेची बहार !

अणु-अणूंत थरके दिव्य-विराट नर्तन
भाव-भंगींत आणूं का त्याचें चंचल दर्शन ?

तूं साधीच बालिका भोळी हसरी-माधुरी
न जमे तुझ्यावरी का ग साधेसेंच गीत ?

## किती मधुर जादु ही

किती मधुर जादु ही एकलेपणाची

एकलीं शिरें उभीं तुंग हिमनगाचीं
मस्त पिती नीलिमा उंच त्या नभाची
खालच्या खोल दरिंत छावणी धुक्याची
नाजुकशी धुंदि जशी कविहृदयाची
रानिंवनीं डोंगरीं जादु मधुरशी
सांडली इथे तिथे एकलेपणाची

सरसरतो पाचोळा भंगल्या देउळीं
सळसळतो लाल पदर परत ना दिसे मुळी
गहनता गर्द करी मोर दुहुकुनी
दूर थरथरे तिथे लाल कर्दळी
जंगली फिक्या दुपारिं पसरली जादु गडे
कुण्या देखणीच्या मधुर आर्जवाची

चाहुल नच करतां मी स्तब्ध वनीं हिंडतसें
एकच पडछाया जळिं पाहुनि दचकतसें
स्तब्ध वनीं एकांतीं मंजुळशी हास्यलहर
ऐकुनिया कुणि मजसह ऐसें मज भासतसे

एकाकी जीवनिं या कुणिं बोळलि मधु वारुणि ?
ओळख मी विस्मरलों क्षणभर या दुनियेची !

किती मधुर जादु ही एकलेपणाची

दा. क्र. २०७८

## म्हातारे शब्द

म्हातारे शब्द !
झिजल्या नाण्याच्या समान झिजून व्यर्थ झालेले
अवचेतनाच्या पुराण स्मृतींच्या समान विचित्र आकृतिवाले
जुनाट पोथीच्या पिवळ्या खिळखिळ्या पानांच्या समान
अत्यंत जीर्ण
वृद्ध हे शब्द.

धुक्यांत किंचित् उजळ उठावा चंद्राचा डाग
तशाच हिरव्या अंधुक धुकट प्राचीन तयांच्या नयनांवरून
तरंगतात
जुनाट मेलेल्या जगांचीं स्वप्नं
प्राचीन फिकट भुतांचें चालतें उभट गाणें...

उत्तुंग पर्वतशिखरें लपावीं धुक्याच्या लांब्रट लाटांच्या आंत
तेवींच प्राचीन जगांच्या छायेच्या लाटांत—
प्राण ते धडधडतात वृद्ध शब्दांचे...

वाळलें कधीच नसांत रक्त
जीवही कधीच झालेला मुक्त
अवशेष अस्थी या उध्वस्त जगाच्या

कष्टाने चढती छंदांची चढण
मरण मिरवी जीवन म्हणून

निःसत्व शब्द
म्हातारे शब्द

३८७१७
१५२९

## त्रिशंकूचें स्वप्न

श्यामल मेघांनी आकाश व्याप्त
हळू ये बाहेर चंद्राच्या मोत्याचें तेज
पिवळें फिकट !
आणीक खाली
पिवळ्या-हिरव्या पट्ट्यांचा विस्तीर्ण समुद्र
झुळझुळे सारखा, हिल्लोले सारखा
मागेच याच्या, बाभूळवनांत
पिवळ्यापिवळ्या फुलांचा चूर
सांडला असे दूरच दूर.
त्याच्याही मागे
शेकडो वर्षांच्या छायेंत गाढ
निजला प्रगाढ निद्रेंत एक
म्हातारा मिनार

पांढरी-पिवळी फसवी प्रभा
इथे मी एकला एकाकी उभा
झुलतो गवतसंभार आणि
सारेंच बन हें उन्मादें झुले
चंदनी वायूच्या बाहूंत डुले

परंतु मन! निस्पंद अधीर कशानें झालें
माझें हें मन
नवख्यासारखें सुंदरासमोर अस्थिर कशानें?
कां हो मी विसरें माझीच जात?
माझेंच वन!
माझ्याच मैत्रिणी!
हिरवा शालू आणीक फुलांचे पिवळे हात
बसल्या हासत मधुर गात...

तसाच विस्तीर्ण माळवी माळ
गवत चिक्कार रसरसे तेजाळ
बसून याचिया हिंदोळ्यावरी
आकाश-नीलम-चषकांतून
रोजच यथेच्छ माधवीपान
करतों मी

आणीक म्हातारा मिनार खडा
काळाच्या प्रहारें पडून तडा
कलता उभा हा शांतसा मित्र
प्रखर-वासना धवल ज्वाला
त्यांतच जणू की विवेकमंत्र

कशानें सगळें निराळें आणि
ओळखीपल्याड गेलेंसें झालें
माझ्या या मनाला
माझ्याच सौंदर्यविस्ताराआंत दूरत्व आलें!

पळाल्या वेदना आणि संवेदना
शरीर जणू की टफॅल एक
गळाला गाभा
निसर्गापासून भयच वाटे निःसत्त्व झालेल्या माझिया प्राणा!

गवता! तुझिया पात्यांत एका
सळसळ करतो भुईचा रस
कारण तुझीं तीं मुळेंच खोल
गेलींत दूर, आंत भुईत
म्हणून टवटवी अशी अमोल
अशी ही टवटवी
मला ही रे हवी
परंतु माझी ही अधांत्री स्थिति
एकाच वर्तुळीं सीमित गति
म्हणून दुजवा माझिया मनाला सारखा पोखरी

* *

एकहि स्पर्श
माझिया तनूंत स्मृतींचा रोमांच आणूं ना शके
एकहि अर्थ
माझिया मनांत अजस्र श्रद्धेस ओतूं ना शके
मनाचा हिलाल
सारखा जळतो, ज्वलनपिपासा थांबूं ना शके
एकहि छंद
मनाचा निर्बंध प्रवाह-बोलका करूं ना शके

तुझेंहि चारुत्व
निसर्गप्रेयसी झालेली जखम भरूं ना शके

* *

पूर्णत्वासमोर पूर्णत्व शोभतें
अपूर्ण टाकतें मानेस खाली

सत्याच्या समोर सत्यच झळझळे
असत्य लोपवी स्वतःची कांति

तुझियासमोर तुझीच विकृति
असा मी रुसलों माझ्याच वरी

एकाच जिवंत नागाचीं खांडोळीं
तळतळे तशी मनाची स्थिति

* *

एक कोणी मूर्ति छिन्नावयव
अपूर्ण अशीच राहिली असावी
एकाच डोळ्याची खाचशी असावी
सैलसे ओठ ते अर्धवट भग्न
आणिक भग्नच असावी नासेची बाकदार रेखा
ऐन टोकाशींच !
आणीक अशाने एका डोळ्यांतून प्रकटे जी ज्वाळा
कोंडलीच जावी दुज्या खाचेमुळे
तशीच ओठांची सैलशी पाकळी
स्मितास दावी जी, विकृति ठरावी आता ती केवळ
तेवीच—

माझें हें छिन्नांग व्यक्तित्व
अर्धअभिव्यक्त राहिलेलें आहे
म्हणून सारखा धडपडतों जेवी
रात्रींत धडपडे, पहाटेचा जाळ

*  *

तेंच हो रक्त !
ज्याचिया कारणें आरक्त पानें तीं फोडून डहाळ्या
बाहेरी येतात
आणीक जंगलें होती लालीलाल ज्वानीच्या ज्वालेंत
तेंच तेंच रक्त, काळें काळें झालें
थिजूनिया गेलें माझिया तनूंत
काळींच स्वप्नें तीं, दुश्चिंता काळीच्च
कुणीं माझीं मुळें तोडून टाकलीं साध्या भुईतून ?
म्हणून सुजकी अहंता एकली गातसे कण्हून
कशाने सौंदर्यें निसर्गाच्या मला असें धिःकारलें ?
मुखावरी माझ्या फिरविला हात
आणीक लागलें खडबडीत तोंड माझिया हातास

कुठे मी ? कुठे मी ?

आणि घाबरून पाहतों खालती
भूमि पायाखाली मुळांतच्च नसे...
खाली हेलावतो महोदधि एक
जनतासागर !
त्याचिया लाटांत भयानक जोश
अतिशय ओढ

त्यांतच सोडून गेलेला उत्साह, अदम्य प्रवाह जोराने उसळे
त्यावर महान् उदात्त आशय दिव्य आकारांचे सूक्ष्म
आणि भव्य
अव्याख्य फिरती लहरींच्यावर
अरे ! समुद्राचा प्रत्येक कण तो
बारा सूर्यांसम अतीव झळझळे
कारण प्रत्येक कण तें काळीज
तडफडतें ज्यांत स्वप्नस्थ-वास्तव !!

काळाच्या अफाट अवकाशाआंत
काठोकाठ वाहे जीवन-उदधि
आणीक वरी मी लोंबतों हा असा
एकला आकाशीं अग्निग्रह जेवीं
ओकीत आगीस
सोडीत धुरास
सारखा धावतों व्याकूळ होऊन.
स्वतःच्या ज्वालेंत भस्मसात होत

कोण मी ? कोण मी ?
अभागी त्रिशंकु !

* *

आलों मी, आलों मी
धबधब्यासारखा लगबग आलों
विजेसारखा तळपत आलों
वाऱ्यासारखा तुटून आलों
मेघासारखा वोळून आलों

महान् क्रुद्ध त्या सागराआंत
ल्हान तुच्छसा बिंदूच झालों...

* *

पाहतां महान् भव्य त्या स्वप्नास
रोवतां पायांस
भूमिगर्भाआंत, प्रत्येक अणूंत—
थरथर करी जो अंतर्विजेमुळे—
त्यांतच जातील सूक्ष्म सूक्ष्म मुळें
पृथ्वीच्या आंतील लक्षावधि दिशा व्यापल्या तयांनी
आणीक निघेन प्रचंड बळाने पृथ्वीच्या बाहेर
वृक्ष मी महान्
प्रत्येक डहाळी महान्, विशाल, जेवि हो व्यक्तित्व !

आणीक आंतून उसळे चैतन्य
समुद्र बंदिस्त माझिया तनूंत
पृथ्वीचा आकांत माझिया अणूंत
पूर्णत्व-आवेगें कोट्यावधी फुलें
डहाळ्या लपून फुलांच्याच ओळी
माझिया गीतांचीं रक्तिम फुलें तीं
झरझर गळून झाकती खालच्या
गर्गर फिरता पृथ्वीचा गोलक

## स्वप्नसाक्षात्कार

माझ्या प्राणाच्या अतिदुःखाच्या जाणीवेंतून
प्रतिविवश दुःखक्षणाच्या तडफडींतून
जन्मलेल्या नी प्रकाशलेल्या
माझ्या प्राणांच्या दिव्य स्वप्ना रे!

कारा माझी ही मोठी भीषण काळ्या शिळांची
तयांच्या वरी शेंदूरचिन्हासमान माझ्या रक्ताची खूण
तेथे बसून
फुटणारी ही छाती दाबून
केलें होतें मीं नित्य चिंतन
तुझ्या अमूर्त रूपाने माझें झिंगलें होतें स्वप्नस्थ असें
पीडा-जीवन !

करूं पाहिला
तुझ्याचसाठी अति घोगरा, दुःखें दाटला, गळा मोकळा !
गाऊं पाहिले
झरझर झऱ्यासमान माझे बेबंद छंद !
कित्येक वेळा
लघु तनूने दिल्या धडक्या
उध्वस्तावया कारागाराच्या तिमिरभिंती
ज्यांत दाटल्या जीव घेणाऱ्या अनंत खंती

आणि होऊनी असा घायाळ
पडलों होतों थारळ्यांत मी रक्ताच्या लाल
केवळ तुझ्या दर्शनासाठी
जिवींच्या जीवा दिव्य स्वप्ना रे !

कोटि रवींचा एकत्र भास
अकस्मात तूं प्रकटलास
काळ्या शिळांस चूर करून
दुःखगिरीस ध्वस्त करून
तेजाचे श्वेत लोट ओतून
दिशांचे कोट पूर्ण फोडून
कारेच्या भिंती गेल्या द्रवून
प्रखर तुझ्या तेजाने, माझ्या—
जिवींच्या जीवा, दिव्य स्वप्ना रे !

दिगंतव्यापी विराट श्वेत प्रकट झाली निष्कंप ज्वाला
एकच क्षण नयनांतल्या पुतळ्या झाल्या अतिउज्वला
पाहिलें डोळे भरून तुझें प्रकाशरूप, जळतें रूप
युगयुगांची तीव्र पिपासा मोकळी झाली जळे अमूप

मागल्या रात्रीं
किर्र अरण्य जळावें जसें सोनज्वालांनी
शाखाशाखांनी, पानापानांनी, कणाकणांनी
तेवींच माझें पूर्ण अस्तित्व जळूं लागलें महाप्रखर तीव्र ज्वालांनी !
महाप्रखर देदीप्यमान तेजस्वी स्वप्ना !
गेलों झाकाया तुला माझिया बृहत्पंखांनी
गेलों आणाया माझ्या जगांत तुला खेचून माझ्या करांनी
क्षणांत माझ्या डोळियांतली ज्योति ती मेली

आणि पडलों पंख जळके घेऊन खाली
रक्ताने स्नात लोळागोळा ही तनू झालेली
सहारांतल्या मासळीसम तळमळता मी
स्मरत आहें तुझें तें रूप, क्षण देखलें
विकल आहें आणावयाला माझ्या गरीब धरेवरती
तुझें महान् जाज्वल्य रूप

माझ्या रक्ताने लाल झालेल्या
जिवींच्या जीवा, माझ्या स्वप्ना रे !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...... .............. वि: ...................
क्रमांक ........................ नोंद दि: .... ........

# आज कशानेशी मला येईनाशी झाली झोप

आज कशानेशी मला येईनाशी झाली झोप

मध्यरजनी नितांत शांत झाली
हळूहळू नदीमधे बुडल्या कलशासम
पावल्या विराम मधु गुजगोष्टी प्रेमिकांच्या
झोपूनिया गेले सारे भुजबंधनांत सैल
एकमेकांचिया स्वस्थ
अस्वस्थशा ओल्या उशा तळमळत्या स्तब्ध झाल्या
दुभंगले वेदनेने प्राण तेही जराजरा
पिऊनिया स्वप्नसुरा जड झाले, पेंगुळले...
गस्तवाल्याची ती साद
उमटीत पडसाद
घेत निरनिराळीं रूपें एकेकाच्या स्वप्नजगीं
तुडवल्या, दुखावल्या सत्यवचासम झाली लुप्त
गाढ अंधारांत
आता तिनाचा सुमार
आक्रमून रातोरात आकाशविस्तार भव्य
फिकट नी थकलेला प्रवासी उदास चंद्र
हळूहळू रेंगाळतो पहाडउतारावर
लांब-लांब झाल्या छाया

बिल्गली मला क्षीण चंद्रिकेची कृश काया
आर्त टिटवीची साद
टीऽऽअ टीऽऽअ कण्हणारी
मूक तक्रारीसमान मंद झाली आपोआप
येत नाही मला झोप...

जागें झालें हृदयींचें उध्वस्त नगर आज
भंगल्या कमानीखाली झाल्या गोळा
श्वेत छाया वासनांच्या
गुदमरून मेलेल्या त्या गोजिरवाण्या आकांक्षांच्या
कपाळांत पडूनिया नियतीची खोल खोक
कधीकाळीं वारलेल्या निर्दोषशा बालिकांच्या
श्वेत छाया भिंतींतून पुढे आल्या
हरपलें शोधीतशा
धुंडाळीत कायसेंसें
चाचपत जणू कांही कोन्याकोपन्यामधून
रिक्त कोनाड्यामधून
सभोवती माझ्या सर्व गोळा झाल्या
उशापाश्थ्याशीं उभ्या
दोनही बाजूंस उभ्या
थिजल्या उदास किंवा कोपल्या नजरा त्यांच्या
जणू काय तापलेल्या सळ्याच लाल-लाल
कापीत-कापीत ऊर खोल आरपार गेल्या
मृतमूर्ती कवळाया हृदयांत खोल-खोल आक्रंदन अनिवार
उसळलें, लाचारसें अधीरसें रडें झालें दुर्निवार...
दूर-दूर जाणान्या त्या प्रवाशासमान चंद्र

गेला नजरेच्या पार
शांतकाय, स्निग्ध निशा मंद श्वसे गार-गार

वेढलें बाजूंनी चारी अनंत स्वप्नांनी मला
दिवसाच्या मृत्युक्षणीं नगर घेरावें जसें
गिरणींतून निघणाऱ्या धूम-अजगरांनी तसें
घेरलें, घेरलें मला स्वप्न-अजगरांनी तसें...

...पुष्टसें कोळ्याचें जाळें पसरलें विशाळसें,
तयांत लोंबती माशा तडफडून, गुरफटून शेवटीं ज्या मृत झाल्या
जाळ्याच्या मागे तें काय ?
रोड, उंच, क्षीणकाय
कंकाल हासतें कोणी, कवटीचे विचकीत दात
घोगरें विद्रूप गात—
" पेरा रे मुंडकीं, पेरा पेरा रेऽ
रक्ताच्या पर्जन्यधारा सांडा रे...
नवीन हंगाम आला, आला रेऽऽ..."

विरालें दृश्य तें सारें.
—तुटक्या कड्यासम सताड भकास तोंडें
अंधाऱ्या काजळी अशा नयनगुहेंत त्यांच्या,
रोखून पाहतें कोणी छिन्नभिन्न झालें प्रेत
तुटून लोंबतो ओट, त्वेषाने रुपून दात
द्वेषाने रागीट किंवा साहुनिया मुका मार
आत्म्याचा आकार हाच विकृत विद्रूप फार !
विरालें दृश्य तें पार...
दिसतें मृदुल वक्ष जननीचें धवलसें,

सोमकांत स्तन तिचे जखमांनी नाहलेले
वक्ष विदीर्ण अन् खाली गळे काळें घट्ट रक्त
बाहेर आलेले डोळे, तुटून लोंबनी मान
अस्ताव्यस्त पसरले केस खाली सांडलेले
अजूनहि चाचरतें बाळमूठ छिन्न स्तन

छिन्न स्तन ?
की त्या कंदिलाच्या नळ्या लाल-लाल
तडा गेल्या
गोंदाने चिकटविलेल्या
पसरती तांबडी नी मलीन फिकट आभा
भयाण अंधुक अशा अंधारामधेंच दिसे
गोंडस भरती शोभा सौभाग्यवतीची कुण्या
गुडघ्यांत घालून मान, विलापमूर्ति तो कुणी बैसला प्रस्तरवत्

हास्याचा कुठेसा पूर अकस्मात् फेसाळत ?
...फेसाळे डोंगरलाट
काजळशिळांचें मोठें अफाट धरण
त्याच्या कड्यांचीं मोडीत हाडें
आपटे, खणते तळ
कापूस पर्वतराशी पिंजून उडाव्या जशा
आकाशीं उसळे फेन
झुंजार पागल दर्या !
कोठे तें धरण ? दिसे विशाल काजळगड
बुरुजावरती काय फड्फड् करतें बरें ?
फडफडे नारंगी आणि धवल हिरवा ध्वज

गर्गर फिरतें संथ नील अशोकाचें चक्र...
...आश्चर्ये कोंदतो जीव
व्यापून आकाश सारें
प्रकट जाहली एक विराट बलिष्ठ छाया
टेकून क्षितिजाचिया वर्तुल सज्जाच्यावरी
विराट बलिष्ठ असे दोनही आपले बाहू
भव्यशा चेहऱ्यावरी निकोप मोकळें असें
श्रमिकपुत्राचें साधं मोकळें जिवंत हासें
गगनागगनांतून दुमदुमे तयाचा ध्वनि
मूर्च्छना-पाताळांतून प्राण येती उसळूनी...

क्षितिजाखालती निंच बुजट श्यामल सूर्य
कोंदट अंधुक अशा खुजट महालाआंत
स्थूलकाय नारी नर
बैसलेले दिदसन
लालिमा जळते ओठीं...
वासनाकमळें लाल घेतलीं हातांत त्यांनी
आत्ममुग्ध बैसलेले सावळ्या दर्पणापुढे
उत्सुकसे न्याहाळीत कसें त्यांचें दिसे 'प्रेम'

कुबट दमट श्याम वायु श्वसे जराजरा
अवचेतनपाताळांत चाले कारभार सारा
अहंकार-द्वेष-निंदा-नागिणी फिरती स्वैर
डसतात खुपसून आपले विपारी दात
नितळ गुलाबी अशा जीवनाच्या कपोलांत
पाताळदेशाच्या त्याच पुरातन माझ्या छाया
गोंडस विकृती आल्या, मांडती हळवी माया

साहिले अनंत मृत्यू
घेतले तितके जन्म
परंतु राहिलों सदा विकासमार्गाच्यावर
अहंता सोडून सदा, जीवन विशालतर
आकरूं शकलें मला...

* *

जुनाट थडग्यावरी नको गाऊं विलापिका
नको ढाळूं आसू ऊन मेल्या जगावरी फुका

फोडून थडगें येई बाहेर डहाळ नवी
मांसल पल्लव लाल गोंडसशी टवटवी

ग्रहणाच्या चांदण्यांत नको रमूं भेसूरशा
नको जोडूं स्नेह अरे क्षयी भावनांशीं अशा

जंगलाच्या डहाळ्यांत लाल रक्त सळसळे
शाखांना फोडून येती लाखलाख लाल फुलें

समष्टीचें रक्त तुझ्या धमन्यांत प्रवाहित
समष्टीच्या चैतन्याने तुझे प्राण प्रकाशित

उन्मत्त उद्दाम वेगें वेगवती नदीसम
चैतन्यसागराकडे धाव द्याया आलिंगन

असत्य मेलें जें जग, असत्य त्या श्वेत छाया
पुरून टाक त्या सर्व जीवन पोखरणाऱ्या

पसरा, पसरा वरी सिमेंटाचे नवे थर
भक्कम बसवा पाया, बांधायाचें नवें घर

नष्ट करा आता तरी हळव्या विकृती गोड
ठार करा आत्ममुग्धतेची कटु तीव्र ओढ

नष्ट करा बंधनें जीं जखडती जीवनाला
व्यक्तींतील चैतन्याच्या सागराचा काढा आळा

फोडा ते घुमट निळे निंच खुज्या क्षितिजाचे
राख करा श्याम सूर्य गेल्या जुन्या जमान्याचे

पेटवा, पेटवा सारी उरांतील अडगळ
चेतवा, चेतवा उरीं जीवनाची तळमळ...

हळूहळू विरला तो उरींचा विखार सारा
नांदे भव्य शांतीमध्ये प्राणाचा प्रसार सारा
उघडलें वातायन
बिलगला परिचित दिगंतींचा उल्लसित
उन्मद पहाटवारा.
फुलून निघाला माझ्या तनूचा कणन्कण
पहाटशांतींत भव्य तन्मय जाहले प्राण

समोर—
विराट अशा प्राचीच्या मैदानावरी
दिगंत व्यापीत सारें उडाली गुलाबी धूळ
प्रदीप्त आदित्याचा बाहेर उसळे रथ

महान् देदीप्यमान
गर्गर फिराया लागे लखलख जळतें असें
रथाचें सुवर्णचक्र
आक्रमूं लागलें वेगें दिशांचा प्रदीर्घ मार्ग

—आरंभ जाहला आहे विजययात्रेचा आता...

## फिरून आले

फिरून आले
युगेंयुगें जे प्राणांचे प्रिय
बाळपणींच्या गूढ स्मृतींनी गाढ झालेले...
यौवनाचिया उद्दाम उदधीवरी सर्वदा ओथंबलेले...
मनस्तत्त्वाच्या
अंधारवाड्यामधील केंद्रकक्षाच्या आंत
सदा झोपल्या आदिस्मृतींच्या गूढ-बालिका
तयांना हळू जागविणारे
गूढ संकेत आलेत निळे
मेघराज हे डवरलेले !

सुप्त होतें जें कित्येक वर्षें
सारें जीवन डोळे उघडून
जागें जाहलें
कापूं लागलें
स्मृतींच्या मत्त झंझावातांत
नेणीव-तमःसागरांतले
जुन्या स्मृतींचे प्राचीन मासे
तळमळतच येती वर...वर...

जाणीवदीत पृष्ठभागाच्या प्रकाशाकडे
लागून ओढ...

झंझेमधल्या वृक्षासारखें
खाऊं लागलें झोके आजचें माझें जीवन
तेच संकेत
तें जादूने भारलेलेंसें वातावरण
वारे सुटती
विजा तुटती
प्राणही माझे अति उत्कट विव्हल होती
भूतकाळाच्या धुंद धुक्यांत
फिकट आणी पुसट असे
प्रेमळ भोळे किती चेहरे
मंद हासत विलीन होती
जगूं लागलीं त्यांचीं हृदयें माझ्या उरांत
माझें अस्तित्व सर्वांचें पुन्हा झालें क्षणांत

सुटे जुनाच विस्मृत गंध
जांभळे धुंद
मेघराज हे आले वोळून
क्षिप्रेच्या नील प्रवाहामध्ये
जाहले मग्न...

माझें जीवन संघर्षरत
संघर्षांतच पूर्ण जिवंत
माझ्यासमोर उभें जाहलें आज साक्षात
आणि हृदयीं, कणाकणांत वाटे दाटलें त्याचें अमृत

हृदयाच्या उंच गगनीं
आशयमेघ तरंगतात
कसा बांधूं हो त्यांना छंदांत
वाटूं कसा मी अनावर हा मृदु हिल्लोल जनाजनांत ?

सुटे मातीचा मादक गंध
शेजारीं उंच तरुण निंब
रेशमी सळसळ करितो मंद
आणि सहसा पसरून बाहू
गाऊं लागलें गंभीर छंद...

## शिशिरांतील पौर्णिमा

शिशिरांतल्या पौर्णिमेंतली पांढरीफेक संपूर्ण नग्न निर्लज्जा निशा
व्यापी ती दिशा, टेकून आपलें चंपक अंग
करी उघडा दीनहीन हा संसार भग्न!

भिंती त्या जुन्या, म्हाताऱ्या काळ्या
सिनेमांतल्या जाहिरातींच्या लोंबत्या चिंध्या अंगीं त्या ल्याल्या
डोईवरती रुक्ष गवती जटा घेऊन
काळोखाचिया घोंगडीखाली सदा दडून
देत त्या होत्या आम्हांस ऊन
फेडून त्यांचें तिमिरवस्त्र
उघडें की हो केलें तयांचें कंगाल रूप

शिशिरांतल्या पौर्णिमेंतली निष्ठुरा निशा
स्पष्टवीतसे कोनाकोपरा
छायांचीं धुडें, उंच भिंताडें
पिंपळाच्या त्या अत्यंत उंच फांद्यांवरती मोठीं गिधाडें

पांढऱ्या अशा नागव्या रात्रीं
कोठून तरी किंकाळी एक
सर्वस्व जणू लुटलें गेलें

कुणाच्या गळां नख लागलें
अतिविव्हल अनंतपीडायुक्त एकाकी किंकाळी एक
ऐकून ताठ झाडांचे रोम
गारठलीं तीं उदार उरें महावृक्षांचीं
ताठरलीं हो सारींच गात्रें दाही दिशांना राखणाऱ्या त्या
महामत्तशा गजराजांचीं!

वाटेच्या काठीं, कचऱ्यासम विखुरलेल्या
डिवचलेल्या आळींसारख्या गोळा झालेल्या
गुडघे दोन्ही पोटीं घेऊन
निजले देह पेटवूनिया
शिशिररात्रीं
शिशूंच्या त्यांच्या अवयवांसम
काळीं काटकीं, पानें वाळकीं
अंगार त्यांत लाल फुलले
पांढरे हिमहात निशेचे पोचले तेथे
आणी तयांनी मुरगाळले ते अंगारबाल
मरताती ते सोडूनी धुराचें काळेंसें जाल

विस्तीर्ण वड आणि पिंपळ
पोटाशीं घेती उध्वस्त अशीं जुनीं खिंडारें
खिंडारांतील थंडींत तीव्र काकडणारें जीवन सारें
परंतु दाट वृक्षांतूनही
झगझगीतशी प्रकाशधारा टाकते निशा
कुत्सितपणें
अतिघाबऱ्या, कोपऱ्यांत त्या दडून उभ्या नागव्या अशा,
थरथरणाऱ्या जीवन-नारी-देहावरती

घाबरूनीया, पीडेने डोळे विस्फारूनीया
एका हातास करून लांब
थोपवीते ती प्रकाशधारा
दुज्या हाताने धडपडे अती झाकावयाला तिचें गुतांग !

आली हो आली सागरीं श्वेत बर्फाची लाट, निर्दय लाट
झाकले गेले दिशांचे त्यांत विराट हत्ती
थिजून गेला
मृत्युंजय तो हृदयांतल्या हृदयांतला अत्युष्ण पिंड
झाकलें गेलें पांढऱ्या हिमलाटांच्या आंत सारें ब्रह्मांड

केवळ उंच उंच थिजल्या पांढऱ्या लाटा
केवळ उंच, उंचच उंच, श्वेत थडगीं
शिशिरांतल्या निर्दय श्वेत पौर्णिमेतळीं !

अनुक्रम .................... वि: ..............
क्रमांक .................... नों. दि:

## लाल कंदील

अंधाऱ्या बोळी
भूगत ड्रेनेजपाण्याच्या समान तिमिराच्छन्न
खळाळहीन अंधाऱ्या स्तब्धशा
सुतकी घराच्या समान खिन्नशा
अपमानिताच्या जखमी उराच्या सम भग्नशा
अशांत बोळी

बाजूंस दोन्ही, जुनाट उध्वस्त म्हाताऱ्या भिंती
तयांच्यामधून जिवास घेऊन वाटा पळती
प्रत्येक स्थानीं अंगास चोरून वळणें घेती !

मेलेल्या जुन्या वाड्याच्या उंच ढिगाऱ्यावरी
उभ्या ज्या तरूंच्या वाळक्या हारी
पिकल्या पानांच्या गाळती खाली
सरींवर सरी...

भुतेंच किंवा चोरट्या पाउलीं गस्त घालती
पाडीत लांबच लांब साउली

फिकट भकास शून्य दुपारीं
शांतता गुदमरे होई घाबरी

मंदिराच्या त्या भिंतीवरती
अभद्र शिव्या लिहिल्या असती
हातांचे छाप
फाटक्या अशा सिनेमांतल्या जाहिरातींच्या लोंबत्या चिंध्या
आणिक एका कोपऱ्यावरी
तैलाने दीस शेंदरी असे भैरवराज
श्वान करिती अभिषेकास जयांच्यावरी नेमाने रोज!

अशा जगांत छाया हालती...
चुर्गाळलेल्या देशी कागदासम मुखांचे पुरुष किती
आणि पिकल्या मिर्चीसमान वाळून कोळ नारी भवती
आणिक फिक्या रुग्ण मुखांच्या...
वयःसंधीच्या संदिग्ध अशा ओढींनी अतिशय गांजल्या
जळक्या मोहरासम झाडल्या आणि त्रासल्या
निर्दोष पोरी

सर्व ओढती एक जोखड येईतो घेरी
आणि एक भीषण छाया प्रत्येक जीवा करी घाबरी

कणाकणाने ढासळतात जुनाट भिंती
रोज मरती डांबल्या अशा सहजवृत्ती
सायंकालीन रक्तप्रकाश पेटवीतसे भिताडांच्या त्या
जगा गवती!

बोळीमधल्या छाया अधिक गर्दशा होती
आळवी आर्त कंठ कुणाचा जाणे कुणासी
"धाव रे रामराया, तूं किती अंत पाहसी ?"

पश्चिमातीरीं धडधडणारी मृत दिसाची लालशी चिता
विझते आता
लोपे अंतिम अंगार आणि
फोडून दिशाकोट उसळे तमोदधीचा कल्लोळ मूक
बोळींच्या भिंतीवरून गळे अंधारजळ
अंधकारास मिळे केवळ अंधार आणि
झोपीं जातात गांजल्या अशा मानवी छाया
पाहत चिंताजनक अशा स्वप्नांची माया
होती मूर्च्छित विद्रूप वाटा
साहत जुन्या स्मृतींचा कुणी दुःखद असा सलता काटा

जागे एकला जख्ख म्हातारा कंदील एक
वळणावरी उभा राहून अंधुक अशा दृष्टीने पाही
दृश्यें अनेक

तंद्रेमधून मधल्या रात्रीं दचकून पाही खालती आणि
अंधारांतून युवक कांही प्रकट होती
(विस्मृतींतून जशा प्रकट व्हाव्यात कांही मधुर स्मृती)
तयाच्या पायाशेजारी कधी खेळलेले ते मित्र जिवाचे
खोल डोळ्यांचे
कृश तनूंचे
आणि निश्चयी अशा वृत्तीचे
घालीत वाद

करीत खल
तयाशेजारी उभे राहती

कधी त्वेषाने दात रुपून तयांचे ओठ रक्ताळ होती
तयांच्या खोल नयनांतून प्रकटतात तेजस्वी ज्योती
तयांच्या कृश मुखांवरती गूढ सौंदर्य प्रकट होती

म्हातारा लाल कंदील पाही एक भव्यसें दृश्य आणखी
मृत्यूच्या क्रूर कभिन्नकाळ्या विराट वक्षामध्ये पडून
खिंडार एक
प्रखर आणि विलक्षणशी सौंदर्यज्वाला तरळे एक
आव्हान जी देई समस्त क्रूर तमाला

अनंत मुखें, अनंत डोळे, अनंत ज्वाला

गंभीर त्याच्या पोक्त चेहऱ्यावरी येतसे नवीन दीप्ति
तयाच्या पायीं मगळलेली पिंगट छाया
किंचित तीव्र होई जागती !

ठाणे.
...... .. वि:
क्रमांक ........ नों: दि:

# असेंच आहे कांही

असेंच आहे कांही
मरणार आम्ही नाही !

मृत्यू लाल लाल डोळे वटारून उभा आहे
जीवनाचा थरकाप नित्य चाललेला आहे
आहे कांही असेंच की तयाच्या डोळ्यास डोळा
भिडवाया हृदयाच्या आकांताने सज्ज आहे

कबूल! की कणा ढिला पाठीचा या जाहलेला
कपोलांच्या विवरांत आनंदही वाळलेला
खचलेल्या भिंतीसम छाती धसलेली आंत
दोन काटक्यांच्या वरी पेलूनिया डोलाऱ्यास
चालतसों डगमगत...

कमानीखालून उंच मुंग्यांसम आंत जातों
(सूर्यकिरणांचा सोनपिसारा जळून जातो
रक्षेचा वर्षाव होतो
पाठीवरी आमच्या तो दिवस अस्तास जातो)
आणि आम्ही अंधाराच्या विवरांत लीन होतों

वरचीं तीं उंच छतें अंधारीं, दिसत नाही
भुरकट प्रकाशरेखा तमास आकार देई

तकाकते भिंतीची ती थंड दगडाची छाती
तकाकती उच्चभ्रूंचीं गोल दळदार तोंडें
आणि नासिकेच्या रेपा
अंधारांत ब्रांझ-मूर्ति

शेंदूर फासावा कुणीं अंधाराच्या कपाळास
तसेच शेंदरी पट्टे हालती येथून तेथ
आणि लखाखून जातो मधेच पितळी डोळा
कवडीच्या एक डोळ्यासारखा फिरून कधी

भुऱ्या प्रकाशाच्या रेषा टेकवून उभ्या केल्या
त्यांच्यांतून शेंदराच्या जिभा लाल तरंगत्या
अडकलीं दिसतात मानवांचीं तोंडें त्यांत
अजबशीं विदूषकी
सहज मानवी अशा निपटून गौरवास
मुद्दाम बीभत्स केलीं...

रक्तथेंबांसम लाल बल्बांच्या एकाक्ष खोल्या
पिंगट अंधार तेथे सदा राही सांडलेला
पिवळ्याशा फाइलींचा प्रवाह वाहतो संथ
कोठून निघाला आणि कोठे नित्य चाललेला
कोठे त्याचा आदि-अंत ?

मृत्यूची पसरलेली आहे येथे दाट छाया
क्रूर नि भयाण अशा शक्तीची विद्रूप माया
दुःखाचे पिवळे डोळे मृत्यूचे तोंडास पोचे
अदृश्यशा जोखडाने खाली वाकलेली काया
आहे असें जरी सारें...

प्रत्येकाचा 'मी' हा आता 'आम्ही' जाहलेला आहे
यातनांच्या भुईमध्ये विश्वास पेरला आहे
आणि आहे कशाचीशी वाट सगळ्यांना आता
घृणेचिया धगधगत्या भाल्यावरी आता सारें
गुंडाळून टाकलेलें दुःखपूर्ण जिणें आम्ही...

असेंच आहे कांही
पिचूनिया रौरवांत
आम्ही मरणार नाही !

## अंत आहे तसा आरंभ आहे

अंत आहे आणी आरंभ आहे
अंतिम आचके थंड शरीर
चैतन्यचंचल गुलाबी पिंड
अंत आहे तसा आरंभ आहे

धुकट पिंगट सांज उदास
सिगारेटच्या थोटकासम उरला धूर ओकता दीस
कौलारें फेकती बाहेर धूर
पेंगत, संदिग्ध, बसकण घेता
फाटून जाऊन विस्कळलेला
पोरका, एकाकी उदासवाणा निळासा धूर
मळक्या वस्त्रांच्या ढिगाऱ्यासम दाटले ढगांचे ठिबकते ढीग
दुःखद स्मृतींच्या सारखें गळे
चावरें गार पाणी सावळें
हुडहुडी भरून हाडें वाजती
चिखल मंदावी उदास गती...

गंजल्या वशीट हॉटेलामध्ये गंजला लाल बल्ब जळतो
भुरकट अंधारांतून ओघळ, पिंगट गढूळ खाली गळतो

तांबडा चहा नि अखबार हातीं
जिवाच्या मातींत स्मृती हालती

आणि समोर
पोरसवदा, डोळ्यांत फूल
ज्वानीची कांती नि झोळींत मूल
चढत्या नौतीने नाडलेल्याशा भिकारणीच्या कटोऱ्यामध्ये
आणेलीचा तो खळ्ळकन् नाद
आणि हाताने बीभत्स अशी केलेली खूण...

भंगी ओढीत नेतसे श्वान
जीभ लोळते चिखलांतून

दूर...एकाकी गगनभेदी
छायामयशा उंच मशीदमिनारावरी उभा राहून देई 'अजान'
कुणी अजाण
ऐकेल काय जन्मबहिरा ?

भिवयांवरी, पापण्यांवरी, हृदयावरी
दाटली आहे काजळी माती
फाटते छाती...

अंत आहे आणी आरंभ आहे
अंतिम आचके, थंड शरीर
चैतन्यचंचल गुलाबी पिंड
अंत आहे तसा आरंभ आहे

शरीरामध्ये काळ्या रात्रीच्या
जखमा खोल लाल दिव्यांच्या
ओसाड वाट
थेंबगोबऱ्या दिव्यांच्या खाली
टाकून खाली मान आपली
उभा गर्दभ विचारमग्न
भार वाहून झालेला भग्न
टिपें गाळीत, स्तब्ध, एकाकी...

गस्तवाल्याचे बूट वाजती
ध्वनि तयाचे दूर लोपती

खेळ दुसरा सुटे सहसा
थियेटरांचें फुटतें पोट
उसळतात लोकांचे लोट
मखमाली स्वेटरवालें कुणीसें
नाजूक गोरटे हात खिशांत
कानींचे ईयरिंग्ज हलवीत
मोटारीमधे पाय टाकतां
झर्कन मागे हसून पाहून
मोटारींतून जाई निघून
सर्व मोटारी, सर्व वाहनें लखलखाटांत जाती निघून
—आणि त्या दृष्टिपाताने पूर्ण 'हाय' खाऊन
उरीं तृषेचा डोंब उसळून
उरली भिडी दीर्घ ओढून
थंडीमध्ये अन् भुरभुरीमध्ये कुडकुडणारे

गल्लीमधून घेती वळण
अश्लील अशी अतृप्त तान मोटारीमागे देती धाडून

अंध शांतीच्या काळ्या पुरांत दुनिया सारी बुडून गेली
थिजला गर्दभ तसाच उभा टाकून खाली मान आपली

हिवाळ्यांतला पाऊस आज करी संहार
गार संहार !
माहेरचा तूं ओव्हरकोट तो घेई घालून
म्हणजे राहील थंडी जराशी
माझ्यापाशीच आज नीज ना
झोपूं नको पण थांब जराशी
तासभरांत संपेल माझें सारें लेखन
विनासायासें देईन आठ स्तंभ लिहून
द्यायास हवे उद्या पहाटे...
मींहि घातला आहे ना लाल स्वेटर विणला तूंच परवा
घातला तसा शर्ट जाडसा रफू केलेला तूंच खादीचा...
भयाण आहे आजची रात
गळा काढून रड मांडती मांजरी दूर...
जिवा ना चैन—
कासावीसले आहेत प्राण
झोपूं नको ना गडे, आधी तूं
कामाकाजाने गेली आहेस फार थकून
आहें जाणून
माझ्या जिवाच्या जिवा परंतू एकच तास जागी रहा ना
बोलावयास मिळतें काय दोघां दिवसा तूंच पहा ना
तुझ्याशीं...

—तुझ्या भोळ्या जिवाशीं जर का रोज नाही बोललों
साचलें दुःख, साचला द्वेष, साचलें प्रेम नाही बोललों
नाही पाहिलें मंद सौंदर्य, भोळे हे डोळे एकही क्षण
मरेन खास
खचित ! नाही ओढणें शक्य उद्याचा दीस
अगे थकल्याभागल्या माझ्या प्राणज्योती तूं
जागी रहा ना एकच तास
खात्रीने उद्या 'चल' म्हणून तुला नेईन बोलपटास
थोडी शिल्लक फळीवरच्या डब्यामधे ग असेल खास
आज तूं नीज माझ्यापाशीच
झोपूंही नको थांब जराशी
जरी वाजवी ठण ठण दोन घरमालकाचें घड्याळ पोक्त.

अंत आहे आणि आरंभ आहे
अंतिम आचके, थंड शरीर
चैतन्यचंचल गुलाबी पिंड
अंत आहे तसा आरंभ आहे

गज लोखंडी जाड भक्कम
गारठलेले बर्फासमान
उंचनिंचशा दगडी भिंती
थंडगारशी फर्शी खालती
उभें बाहेर अंगणीं झाड
अष्टावक्रसें चाफ्याचें झाड
झिर्झिरीतशा पावसामधे
उभें वाकून भुतासारखें
तारेवरती झुलता बल्ब फाशीं गेलेला

ओकतो खाली लाललालशी रक्ताची धारा
मृत्यूहि उंच खाली वाकून
काळ्या वस्त्रांत तनू झाकून
घालतो फेऱ्या खोल्याखोल्यांच्या दारावरून
आंत झोपले आजचे संत
मनुजभक्षी व्यवस्थांचे ते कर्दनकाळ
दीर्घद्वेषी हे संत, अनंत
कुडकुडत ते आंत झोपले गारठ्यामधें
पेटवूनिया स्वप्नांची लाल लाल शेकोटी
व्हावें न त्यांनी स्वप्नांत दंग
म्हणून मृत्यु गजांमधून हात टाकून
आपल्या मांसहीन पंजांनी रोमहर्षक स्पर्श करून
ठेवी जागते, वेडे पीर ते
त्याचे दुस्मान
अशा अनंत गजांच्या मागे असे आजचे संत आहेत
यातना दिल्या मृत्यूच्या क्रूर मिठीमध्येही सदा हासत
स्फोटक शक्तीकेंद्रें अशींच इंचाइंचांनी पुरलीं आंत
वरी निर्धास्त देई जांभई वर्दीमधला साधा खेडूत
जागे पेंगत...

रेल्वेचे लांब लांब रूळ ते
अंधारामधें लुप्त झालेले
दाट अंधार
केबिनपासून बरीच दूर लाल हिरव्या दिव्यांची माळ
लाल दिव्यांच्या लेवलक्रासिंगाशेजारीं एक झोपडी नम्र
दाट धुक्यांत गुंडाळलेला अंधारपोटीं तेजस्वी गर्भ
उमटे ध्वनी तेथे कुणाचा

पाहुणा अनाहूत येतसे आंत रात्रीचा
उमटे ध्वनी—तुझे पाहुणे, राहतील हे कांही महिने
जप हो यांना जिवापेक्षाही, लपवूनिया ठेव यांजला
फिरून माजे गाढ स्तब्धता
झाकला जाई व्रण ध्वनीचा
पांगला अंधार पुन्हा जुळतो
झोपडीमध्ये अग्नि दडतो...अणूंत जेवीं विराट शक्ती
बाहेर पेटे लाल आगटी
ठिबके वरून रात्र जागती

अनंत अशा नम्र झोपड्या अशा अनंत लपल्या शक्ती
जागताहेत मृत्युराज्याच्या अशा काजळी भीषण रातीं

अंत आहे आणि आरंभ आहे
अंतिम आचके थंड शरीर
चैतन्यचंचल गुलाबी पिंड
अंत आहे तसा आरंभ आहे

भिजला गार वारा ठोठावे खिडक्या वाजती
आज विराट विषादें खोल प्राण उलती
झालीस तूंही झोपेंत चूर
नाही उघडे राहूं शकले तासभरही तुझे नयन ?
अत्यंत क्लांत फिक्या चंद्राच्या समान तुझें क्लांत वदन
स्वप्नामध्येही भरे हुडहुडी म्हणून अशी कापतेस का ?
झिर्झिरीतशा रजईमध्ये थंडीचा कसा राही कडाका ?
माझ्या प्रेमाची ऊष्ण दुलई कशी देणार ऊब गे तुला ?
थंडीने तुझी तनू थिजली, हसें भिजलें, जीव थिजला !

करशील का क्षमा तूं मला
यंत्र आहें मी, प्राण यांत्रिक, अगतिक बळी परिस्थितीचा
चोवीस तास गुलाम आहें मानवनिर्मित महायंत्राचा
तुझ्यापासून, फुलांपासून, प्रीतीपासून निर्वासित मी
हृदयीं धूळ, केवळ धूळ ! शुष्क जळून जाहलेलों मी

आत्म्याआत्म्याचें नेत्रमीलन होतच नाही
जिवाजिवांचीं गाढालिंगनें होतच नाही
गळ्यांत गळा, नेत्राशीं नेत्र, वक्षाशीं वक्ष भेटत नाही
तासभरही बोलावयाची फुर्सद कधी होतच नाही !

करशील ना क्षमा तूं मला
माझ्या उत्कट आतुर जिवाचिये साजणी !
उलटे आता मागली रात
मनुजभक्षी, असीम काळी, मृत्यूची रात
जग निजलें, जागतों आहें एकलाच मी
यातनांचिया तीव्र दाहानें चिरजागृत
मनुजवैरी व्यवस्थांचिया तीव्र घृणेनें
यातना माझ्या झाल्या डोळस
अथांग शांतीच्या उंचीवरून बघतों स्पष्ट
जगाचे नाना बळी प्रवाह

दिसती लाल ज्वालेचे नद
महावेगानें धावताहेत
पूर्वेकडून पश्चिमेकडे
पश्चिमेकडून पूर्वेकडेस

कलथतात उंच मिनार, विजयस्तंभ
ढासळतात शहरें मोठीं
साक्षात् क्षमा भूमि, पेटली नखशिखांत
क्षितिजें लाल
नीज तूं स्वस्थ
होणार आहे आता पहाट

उद्या कोवळ्या लाल पानांत रक्त नूतन
लाल रस तो सळाळून ये फळाफळांच्या कातडींतून
सोनपिंगट गव्हाचा दर्या घेईल झोके मत्त झिंगून
कोटिकोटिशः शरीरांतून, नाड्यांमधून,
नयनांतून, हृदयांतून धावूं लागेल प्रकाशतत्त्व !

उद्या खचित भेटूं आपण
उद्या सिनेमा...
उद्या गळ्यांत गळा गुंफून हिरव्या डोंगरपायथ्याचिया
कडेकडेने खूप हिंडणें
दुचाकीवरी रत्नतालाच्या काठाकाठाने उद्या चक्कर
नव्या सूर्याच्या प्रकाशाखाली बसूं दोघेंही
—गाईन मीहि
नव्या छंदांच्या डफावरती सूर्ययुगाचें प्रदीप्त गीत
सूर्ययुगाचें नवीन नातें, नवीन प्रीति, नवीन रीत !

अंत आहे आणि आरंभ आहे
अंतिम आचके थंड शरीर
चैतन्यचंचल गुलाबी पिंड
अंत आहे तसा आरंभ आहे

## सूर्ययुग

विराट दुःख
विषादनिशा
मेघकूर्मांच्या काळ्या पाठींचीं अनंत खवलीं
व्यात करिती नभःसराचा प्रत्येक भाग प्रत्येक दिशा

पिवळ्या डागासारखा दिसे निस्तेज चंद्र
पितळी जाड घांटेसारखा उंच तरूस लोंबणारा तो
वाटे अभद्र ! !

सुतकी वारा घाल्तो फेऱ्या खिन्न नी जड अशा पाऊलीं
कधीमधीच ऐकूं येतात वाळक्या पान-न्-पाचोळ्यावरी
सळसळणाऱ्या त्याच्या चाहुली

झाकून तोंड संपूर्ण देह काळ्या वस्त्रांत
दुःखभाराने लवलेल्याशा विलापमूर्ती
घाल्ती फेऱ्या क्षितिजाच्या त्या संधिदेशांत
मुखाने खोल विषाद-जड कसलेंसें तें म्हणत गीत

अतिविराट पीडेच्या ज्वाळा उसळतात अणूअणूंत
केवळ श्वास घोटाळे वाटे, जीवनाच्या या रुग्ण तनूंत

परी या मूर्च्छापटलाखाली
रुग्णतेच्या अन् मरणाच्या त्या सर्वनाशक थराच्या खाली
जागे आहेत नवे निर्झर नव्या दमाचे
प्रत्येक क्षणीं आहेत मत्त फोडण्यांत जे काळें काळीज जड मृत्यूचें

फुटेल कधी मरणाची ही विराट छाती
कोसळतील धरणांतून कोट्यावधींशा महाबलाढ्य
प्रकाशधारा
भिजवितील रुक्ष गरीब तहानलेल्या पृथ्वीवरचा महासहारा

नवे निर्झर सूर्ययुगाचा जाणती पत्ता
जेथे केवळ प्रकाशाचीच निर्वेध सत्ता !

वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...

# थोडें नवकाव्यासंबंधी

[पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना]

नवकाव्यासंबंधी अलीकडे बरीच चर्चा झाली आहे. तीवरून नवकाव्याने रसिकांच्या एका विशिष्ट वर्गाचें तरी लक्ष आपणाकडे ओढून घेतलें आहे असें म्हणावें लागेल. या चर्चेत नवकाव्याची भूमिका आणि वैशिष्ट्यें स्पष्ट होऊं शकलीं नाहीत असा माझा समज आहे. हा काव्यसंग्रह रसिकांच्या हातीं देतांना नवकाव्याची भूमिका स्पष्ट करणें अनुचित होणार नाही असें वाटतें.

काव्याची व्याख्या येथे करावयाची नाही. काव्यांत आत्मप्रत्यय हवा, तो नसल्यास त्याला काव्य म्हणतां येणार नाही, ही गोष्टहि वारंवार सांगावयाची आता गरज उरलेली नाही. ही भूमिका लिहिण्याचा हेतु नवकाव्याचें स्वरूप समजावून देण्याचा आहे. सर्वसाधारण रसिकांच्या मनांत नवकाव्यासंबंधी एक प्रकारची प्रतिकूल भावना वसत आहे. नाविन्याच्या नांवावर कांही तरी तऱ्हेवाईकपणा केला, वाचकांना गोंधळांत पाडील अशी रचना केली की झालें नवकाव्य, असा बहुतेकांचा समज झालेला आहे. कित्येकदा असा समज खराहि असतो हें कबूल करणें बरें. परंतु नवकाव्यांत दिसून येणारी दुर्बोधता, त्यांतील प्रतिमासृष्टि आणि भावनेचा विशिष्ट गुण ह्या गोष्टी आजच्या सामाजिक परिस्थितीच्या संदर्भाने समजून घेतल्या तर नवकाव्यामागील गंभीर भावविश्व सहज समजूं शकेल अशी खात्री वाटते. मात्र मर्यादित पृष्ठसंख्येंत नवकाव्याची भूमिका आणि वैशिष्ट्यें यांचें स्थूल दिग्दर्शनच करतां येणें शक्य आहे एवढें लक्षांत ठेवलेलें बरें.

काव्यांत नवेपणा दोन प्रकारेंच येऊं शकतो : आशयांत आणि अभिव्यक्तीच्या रीतींत. आशयांतील बदल अभिव्यक्तीच्या रीतींत बदल घडवितो. अभिव्यक्तींतील नवेपणा आशयाच्या नवेपणाशिवाय अशक्यच. नवकाव्यांत कोणता नवा आशय प्रकट होऊं पाहत आहे हेंच पाहावयाचें आहे.

आपला समाज आज एका संक्रमणावस्थेमधून विलक्षण वेगाने जात आहे. कालकालपावेतो जीं देशभक्तीचीं ध्येयें कोटिकोटि जनांस स्फुरित, हिल्लोलित करीत होतीं त्यांचा परिणाम आता होईनासा झाला आहे.

देशांतील विराट विपन्नतेमुळे एक प्रकारची सर्वभक्षी निराशा व विफलता साऱ्या भारतास ग्रासूं पाहत आहे. देशी भांडवलशहांबरोबर खांद्याला खांदा भिडवून असीम त्याग करणारा शेतकरी-कामकरी आणि मध्यमवर्ग भांडवलशहांना देशभक्त मानावयास सरावलेला आहे; त्यांच्या नेत्यांस स्वतःचे नेते समजत आला आहे. वास्तविक जीवनांत, भांडवलशाही आणि स्वतःच्या पंक्तींत आणून बसविलेला, वडा भांडवलशहा होऊं पाहणारा सरंजामदारवर्ग यांची युति झालेली आहे. या युतीच्या नफ्याच्या असीम लालसेमुळे सारा बहुजनसमाज आणि मध्यमवर्गहि भयंकर पिळला जात आहे. महाराष्ट्रीय पांढरपेशावर्गाने परदेशी भांडवलशाहीचे पुरोगामी संस्कार स्वीकारून मध्ययुगाच्या नैतिक, सामाजिक, आर्थिक संबंधांचा उच्छेद करण्यांत पुढाकार घेतला होता. याच वर्गाने नव्या व्यक्तिमुक्तीच्या तत्त्वज्ञानाच्या आधारावर नवें वाङ्मय, नवी कला निर्माण केली. राष्ट्रीय लढयांत या ऊर्ध्वमुखी वर्गाने देशभक्तीच्या प्रबळ भावनेने प्रेरित होऊन इतर वर्गांबरोबरच असीम त्यागहि केला. परंतु, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, एकमेकांस सहकारी समजणारे हे वर्ग विरुद्ध आर्थिक हितांच्या गटांत सामील झाले. तसेंच भांडवलशहांचें खरें स्वरूप जरी समाजहितविरोधी असलें तरी प्रत्यक्षांत त्यांच्या वाणीवर गांधीवादी भाषा, त्यांच्या इतिहासांत दीर्घकालीन स्वातंत्र्यसंग्राम याची जनतेनेच देऊं केलेली पुण्याई आहे. त्यामुळे त्यांचें विदारक खरें स्वरूप मान्य करावयाची मनाची तयारी आणि हिंमत मध्यमवर्गाच्या ठायीं नाही; म्हणूनच मध्यमवर्ग एका विफलतेच्या

भावनेने खचून गेलेला आहे. त्याला भांडवलशाहीचें हें अपरिहार्य समाजहितविरोधी स्वरूप एकदा पटलें की त्यांतून बाहेर निघावयाचा अपरिहार्य मार्गहि स्पष्ट दिसावयास लागेल. शेतकरी-कामकरीवर्गास तो दिसत आहे. मध्यमवर्गहि जुनीं स्वप्नें, जुन्या मध्यमवर्गीय आस्था आणि प्रतिष्ठा, ऊर्ध्वमुखी दृष्टि हा सारा केरकचरा झटकून टाकून श्रमिक वर्गाच्या खांद्यास खांदा भिडवून लढावयास सज्ज होईल यांत शंका नाही.

हा संक्रमणकाल मात्र अतिशय यातनामय आहे. ज्या अर्थीं मराठी नवकाव्य मध्यमवर्गीयच लिहीत आहेत त्या अर्थीं त्या वर्गाची मनःस्थितीच वरील समाजसंबंधांच्या संदर्भाने लक्षांत घेणें जरूर आहे. बदललेल्या या समाजसंबंधांबरोबरच दुसरें महायुद्ध, त्यामुळे नष्ट झालेलें युरोपीय जीवन, यंत्रांमुळे होणारा मानवाचा नाश याहि गोष्टींचा परिणाम नवकवींवर झाल्याशिवाय राहिला नाही. वरील सर्वनाश बौद्धिक आणि यांत्रिक प्रगतीनेच झाला आहे अशी समजूत करून घेऊन अबुद्धिवादी आणि प्रगतिविरोधी विचारांचा एक वर्ग नवकवींत निर्माण झालेला आहे.

आधुनिक जीवनच असें आहे की त्याच्या विविध प्रवाहांमागे असलेल्या शक्तींची माहिती करून घेण्यासाठी माणसाला स्वतःची चिंतनशक्ति वाढविणें भाग पडतें. कवींना तर ही चारहि बाजूंनी पेटलेली आग जास्तच जाणवते. ती कां लागली आहे आणि ती विझविण्याचा उपाय असल्यास काय याचीहि एक सुसंगत मीमांसा त्याच्या मनांत तयार होते. त्या दृष्टिकोणांतूनच तो वास्तवाचें वर्णन करतो व आशावादी अथवा निराशावादी निष्कर्ष रसिकांच्या मनावर ठसवितो. कवीस उदात्त ध्येयाचा चुराडा, जीवनांतील उणीवा, स्वप्नभंग या गोष्टी जाणवूं लागल्या आहेत. बाह्य सामाजिक अरिष्टांमुळे कवीच्या मनोविश्वांतहि त्याच्या साऱ्या जुन्या आस्था आणि आणि नवी विद्रूप वास्तवता यांचा संघर्ष होऊन निर्वाणीचे क्षण (crisis) उत्पन्न होत आहेत. आणि या झगड्यामुळे निर्माण झालेला पराकाष्ठेचा भावनेचा ताण स्फोटरूपाने कवितांतून प्रकट होऊं पाहत आहे. बाह्य सामाजिक जीवनांतील अराजक, विसंगति, विद्रूपता, मानवी मूल्यांची

हत्या, एका विराट यंत्रव्यवस्थेंत उपकरणमात्र ठरलेला मानव या साऱ्या सामाजिक वास्तवांमुळे भिन्न व्यक्तित्वांत भिन्न प्रकारचीं द्वंद्वें, भिन्न दिशेनें मानसिक संघर्ष निर्माण झाले असले तरी त्याचें कारण सर्वसामान्य असल्यामुळे विभिन्नतेंतहि एक विशिष्ट प्रकारची एकसूत्रता नवकाव्यांत दिसत आहे. नवकवींच्या या विशिष्ट प्रकारच्या अनुभूतींतूनच नवकाव्यास आकार येऊं पाहत आहे. आणि वर सांगितल्याप्रमाणे या अराजकाचें मूळ कारण व मानवी समाजाचें भवितव्य या दोहोंसंबंधीच्या चिंतनाच्या बैठकीवरूनच या अनुभूतीचें प्रकटीकरण करण्यांत येत आहे. आजचें वास्तव, आजच्या वास्तवाच्या गर्भांतील समतेच्या जीवनाचें उद्याचें वास्तव हीच नवकवितेची आधारशिला होय.

नवकवितेंत एक अधिक पुष्ट होऊं पाहणारा आणि एक बीजावस्थेंत पण फार चर्चिला गेलेला असे दोन प्रवाह आहेत. दोहोंच्या वैचारिक बैठकींत फरक आहे.

दुसऱ्या प्रवाहाची वैचारिक माहिती अगोदर करून देणें जरूर आहे. जागतिक भांडवलशाहीच्या ऱ्हासकालामुळे देशी भांडवलशाही उपजतांच प्रतिगामी निपजली. दडपणुकीचें कार्य जन्मतःच तिला करावें लागलें. या व्यवस्थेच्या समर्थनार्थ आर्थिक, तात्त्विक आणि नैतिक क्षेत्रांतहि तिची धडपड चालू आहे. या वर्गावर बांडगुळाप्रमाणे जगणारा आणि तिच्या मर्यादांत वास्तविक जीवनांत वागणारा असा कलावंतांचाहि एक वर्ग आहे. कलावंत असल्यामुळे चारहि बाजूंस (त्याच वर्गांत) चालणारी दांभिकता, अनीति, अज्ञान, संस्कृतीचा नाश, लैंगिक स्वैराचार या गोष्टी त्याच्या मनांत किळस उत्पन्न करतात. मुस्कटदाबीमुळे बिथरलेल्या पण व्यवहार न सोडण्याइतका सुज्ञपणा असणाऱ्या या कलावंतास सारें जग किळसवाणें वाटणें साहजिक आहे. परंतु एका मृतप्राय वर्गांतील कीड ही साऱ्या मानव-जातीचा गुणविशेष समजून साऱ्या उच्च मूल्यांचा उपहास करावयाची प्रवृत्ति चुकीची नाही असें कोण म्हणेल? मानवाची प्रगति झाली नाही, यंत्राचा माणूस दास झाला आहे, यांतून सुटकेची आशा नाही, अशी ही

अबुद्धिवादी विचारसरणी आहे. खरें म्हणजे जड यंत्रांनी माणसाला दास केलें नसून यंत्राच्या मालकांनी समाजास आपला दास बनविलें आहे. यंत्राची वैयक्तिक मालकी जाऊन सामुदायिक मालकी आल्यास ही दैन्यावस्था यावयाचें कारण नाही. तेव्हा आजच्या हीन समाजजीवनाच्या रोगाचें हें मूळ कारण न बघतां त्याचें कारण माणसाच्या मूल-प्रवृत्तीच हीन आहेत असें समजणें हें या विचारप्रणालीचें असामाजिक, माणुसकीस कमीपणा आणणारें असें वैगुण्य आहे. या भूमिकेवरून (कित्येकदा फक्त मानीव) अशा सामाजिक दंभांवर उपहासात्मक वृत्तीने कला निर्माण करणारा हा दुसरा प्रवाह आहे. ह्या प्रवृत्तीचें प्रकट रूप तुच्छतावादी असें आहे. ही प्रवृत्ति काव्यकलेस पुढे नेईल की नाही हा प्रश्न निराळा असला तरी अत्याधुनिक काव्यांत या निराशामूलक नास्तिवादी काव्यकलेचा अंतर्भाव करावा लागेल. याचें कारण पुढे स्पष्ट होईलच.

यापेक्षा निराळी आणि उज्ज्वल भविष्य असणारी अशी व पुष्ट होत असलेली काव्यधारा समाजवादी तत्त्वज्ञानावर उभारलेली आहे. आजचें सारें दैन्य, वर्जना (inhibitions) आणि कुंठा यांचा नाश हा दिवसेंदिवस अधिक बलाढ्य होणाऱ्या जनशक्तीच्या लढ्यामुळे होणार, ही या विचार-सरणीची वास्तवतेच्या शास्त्रशुद्ध अभ्यासामुळे आणि अवलोकनामुळे निर्माण झालेली तर्कशुद्ध आशावादी निष्ठा. व्यापक सहानुभूति आणि सहानुभव, कणखर आशावादी, वर्गवादी दृष्टिकोण, मानवाच्या उज्ज्वल भवितव्यासंबंधी सुजाण विश्वास हे या विचारसरणीचे गुण होत. या गुणांमुळेच हें काव्य निर्बल, विकृत, तुच्छतामूलक न होतां खोल सहानुभूतीमुळे मानवी भावनांचीं निरनिराळीं सत्यें दर्शविणारें, ओजस्वी असें निर्माण होणार असल्यास तें नैसर्गिकच आहे असें म्हणावें लागेल. एकंदरींत या काव्यधारेचा परिणाम जीवनासंबंधी अधिक जागरूकता, माणुसकीसंबंधी अधिक सहानुभूति, स्थापित स्वार्थाविरुद्ध प्रक्षोभ, मानवी समतेच्या ध्येयाबद्दल अधिक निष्ठा निर्माण करण्यांत होईल, असें म्हटल्यास वावगें होणार नाही; उलट,

मराठीच्या महान् जनवादी क्रांतिकारी साहित्यपरंपरेस सुसंगत असेंच तें होईल.

नवकाव्यांतील वरील दोन विचारसरणींमध्ये मोठेंच वैधर्म्य आहे यांत शंका नाही. एक व्यक्तिवादी, अहंवादी तर दुसरी समाजवादी, मानवतावादी. एक निराशामूलक तर दुसरी दृढ आशेवर फोफावणारी. एकीची त्रयस्थाची उपहासात्मक भूमिका तर दुसरीची सहप्रवाशाची समदुःखी अशी भूमिका. असें असूनहि या दोन्हींत एक गोष्ट समान आहे. ती म्हणजे आजच्या सामाजिक वास्तवतेची दखल दोहींतहि घेतलेली आढळून येते. दोहींतहि प्रचलित विसंगतीच्या आणि विद्रूपतेच्या विरुद्ध विद्रोह आहे. एक अहंवादी विद्रोह तर दुसरा समाजवादी विद्रोह. असें असलें तरी या दोन्ही प्रकारच्या कविताधारांमध्ये अत्याधुनिक कवितेचीं लक्षणें प्रकट होत आहेत म्हणूनच त्या दोघींनाहि निदान आजच्या नवकाव्यांत स्थान आहेच. निराशामूलक ऱ्हासकालीन (decadent) अशा विचारसरणीचा नाश, ज्या वर्गावर ती फोफावत आहे त्याच्या नाशाबरोबरच होईल हें उघडच आहे.

परंतु या दोन्ही प्रकारच्या कवितांमधून जें प्रकट केलें जात आहे त्याची अंतःप्रकृति केशवसुत ते (कवि अनिल, मर्ढेकर वगळून) कुसुमाग्रज या परंपरेपेक्षा अत्यंत निराळी आहे. तेव्हा कोणासहि मराठीचे केशवसुत म्हणणें मानाचें असलें तरी पूर्णपणें अशास्त्रीय आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीच्या आणि नंतरच्या कालखंडांत एक महत्त्वाचा बदल झालेला आहे. मध्यमवर्गीय मूल्यांच्या सीमेंतील विफल प्रणयाचीं गीतें अगर राष्ट्रवादी गीतें हे दोन प्रवाह काव्यांत होते. भारतभूमीच्या स्वतंत्रतेबरोबर 'समता'हि ओघाने येईलच असा दृढ विश्वास बहुजन-समाजांत आणि कवींच्या मनांत वसत होता. त्यामुळे स्वतंत्रतेच्या ठोकळ कल्पनेस विविध स्वरूपाच्या उपमांनी ज्वलंत आणि प्रभावशाली करण्यांत येत होतें. स्वातंत्र्य हें स्वप्न (illusion) असल्यामुळे नाना कल्पनांनी त्याची पूजा बांधली जात होती. प्रतिमांचें कार्य मूळ कल्पनेस अगर अनुभूतीस

अलंकृत करणें हें असे. पारतंत्र्यांतील भारताचें जोरकस चित्रण न होण्याचें कारण साहित्यिक मध्यमवर्ग राजकारणापासून, लोकजीवनापासून दूर होता. प्रत्यक्ष राजकारणापासून दूर राहून मध्ययुगीन सामाजिक क्रांति करावयाचें महान् कार्य साधारणतः १९२० पूर्वींच झालेलें होतें. तेव्हा थोड्याशा पाश्चात्य वळणाचें परंतु स्थगित मध्यमवर्गीय गृहजीवन जगणारे कलावंत कारागीर बनले व केशवसुती परंपरेचा ऱ्हास झाला. स्थगित विफल प्रणयाच्या कांही रम्य छटा या काव्यांत पाहावयास मिळतात, इतकेंच. परंतु मध्यमवर्गीय जीवनाबाहेर जाऊन सर्व सामाजिक प्रवाहांचें सम्यग्दर्शन करून घेण्याइतकी जीवनाची विशालता अगर बौद्धिक पातळी या कवींना कधीच प्राप्त होऊं शकली नाही. वैयक्तिक मध्यमवर्गीय अनुभूतींना रम्य कल्पनांनी अलंकृत करावयाचें कार्य ते कवि करीत असत.

राष्ट्रवादी परंपरेंतहि स्वातंत्र्य आणि समता ही एक सर्वसाधारण भावना (generality) होती. परतंत्रतेचीं विदारक चित्रें कवितेंत फक्त ठरीव प्रतीकांच्या द्वारेंच प्रस्तुत केलेलीं दिसतात. कल्पनारम्य काव्य (romantic poetry) म्हणून या काव्यपरंपरेचाहि उल्लेख करावा लागेल. या प्रवाहांतील कुसुमाग्रजांसारख्या कांही मोठ्या कवींचें काव्य अत्यंत ओजस्वी निर्माण होण्याचें एक कारण, कवींच्या मनांत स्वातंत्र्याबद्दल खरोखरीची तळमळ होती हेंच होय. ते भारतीय स्वातंत्र्याच्या भव्य स्वप्नाशीं समरस झालेले होते.

परंतु मराठी काव्याचा हा कालखंड वैणिकप्रधान, स्थूल भावनांवर आधारलेला, कल्पनारम्यतेवर जास्त भर देणारा असा होता हें म्हणणें बरोबर असल्याचें कबूल करावें लागेल. निष्कर्ष असा की तो कालखंड गीतप्रधान, प्रतिमांचा उपयोग अलंकरणासाठी करण्याचा, आणि भावनांचें उन्नयन (sublimation) करावयाचा होता.

या कालखंडाच्या ऱ्हासकालांतच नवकाव्याचा उगम, कवि अनिल यांनी मुक्तछंदाचा आविष्कार करून जें चिंतनप्रधान काव्य वाचकांसमोर ठेवलें

त्यामुळे झाला. परंतु नवकाव्याचा पाया हा असा घातला गेला तरी नवकाव्यास अलीकडेच खरा बहर येऊं पाहत आहे.

याचें कारण अगदी सुरुवातीस वर्णिलेली, अलीकडे आमूलाग्र बदललेली समाजसंबंधांची जाणीवच होय. आता सामाजिक असंतुलनाकडे तटस्थपणें पाहणें शक्य कोटींतील राहिलें नाही. आधुनिक जीवनाचें हें आक्रमण सर्व बाजूंनी होत असून त्याचा परिणाम सरळ कवींच्या व्यक्तित्वावर होत आहे. नवकवींचा स्वतःचा एक सामाजिक दृष्टिकोण असून आज सामाजिक वास्तवतेने व्यक्तित्वाच्या साऱ्या मानवी सहजवृत्तींवर कसें भयानक आक्रमण करून त्याला विकृत व एकांगी असें केलें आहे त्याचें आणि उद्याचें जीवन घडविणाऱ्या शक्तींचें चित्रण नवकवितेंतून केलें जाणें अपरिहार्य आहे. पुरोगामी नवकाव्य नुसतें सामाजिक परिस्थितीचें चित्रणच करूं पाहत नाही, तर त्या समग्र सामाजिक परिस्थितीवर आरूढ होऊन तीस बदलूं पाहतें. म्हणूनच नवकाव्य हें अत्यंत ज्वलंत आणि परिस्थितीस बदलावयास लोक कटिबद्ध होतील, अशा प्रखर निष्ठेने सरस निर्माण होऊं पाहत आहे.

नवकवींना हें कार्य करावयाचें असल्यामुळे वास्तवतेस ते कल्पनेच्या धुक्यांत गुरफटून अधिक अंधुक करूं इच्छीत नाहीत, तर वास्तवतेच्या आघातांनी तीव्र झालेल्या अनुभूतीस तिच्या संपूर्ण पार्थिव स्वरूपांत (concrete) प्रकट करावयाचा त्यांचा उद्देश असतो. भावनेचें उन्नयन, वास्तवतेपासून एखाद्या मधुर स्वप्निल जगांत पळून जावयाची वृत्ति नवकवितेच्या प्रकृतीच्या विरुद्ध आहे. म्हणूनच समता, देशप्रेम, वगैरे ठोकळ भावनांच्या (generalities) आधारावर सुंदर कल्पनांचा पसारा मांडावयाची रीत नवकवितेची नाही. नवकवींचा दृष्टिकोन अत्यंत व्यापक आणि निष्ठा पुरोगामी असल्यामुळे विषम जीवनामुळे निर्माण झालेल्या जीवनांतील अनेक पैलूंवर प्रकाश पाडणारीं अनेक अनुभूतींचीं सत्यें ते आपल्या काव्यांतून प्रकट करूं इच्छितात. या सर्वांच्या साकल्याने होणारा परिणाम रसिकांच्या मनांत ‘प्रक्षोभ’ निर्माण करण्यांतच होणार. वितृष्णा

आणि प्रक्षोभ हेंच आजचें युगतत्त्व होय. याच पुरोगामी दृष्टीने अनुभूतीचें यथातथ्य अंकन काव्यांतून झालें पाहिजे. तसा प्रयत्न तरी आज होत आहे.

अनुभूतीस तिच्या संपूर्ण पार्थिव स्वरूपांत व्यक्त करावयाची ही इच्छा काव्याच्या आशयांत संपूर्ण नवेपणा आणील यांत नवल नाही. त्याचा अपरिहार्य परिणाम या अनुभूतीचें वहन करणाऱ्या प्रतिमातंत्रावर होणार हें ओघाने आलेंच. प्रतिमांचें अलंकरण-मूल्य (decorative value) गौण ठरून प्रतिमांच्या द्वारें अनुभूतीची पीडा तीव्रतम होऊन तिचें स्वरूप आपल्या संपूर्ण पार्थिवतेंत प्रकट व्हावें, असा हा प्रतिमांसंबंधीचा दृष्टिकोन आहे. या प्रतिमांच्या द्वारें जीवनांतील नानाविध वातावरणांचें, चेतनअवचेतन अवस्थांचें जागरण रसिकांच्या मनांत करून त्यांना त्या अनुभूतींच्या समग्र स्वरूपाचें आकलन व्हावें हा हेतु.

या हेतूस सुसंगत अशा प्रतिमांची निवड होत जाणें साहजिकच आहे. अलंकार म्हणून फक्त प्रतिमांचा उपयोग न करतां अनुभूतीची व्याख्या करील अशी प्रतिमा निवडल्याने, तिचें आशयाशी एकजीव झाल्यामुळे निर्माण झालेलें सौंदर्य कांही कमी नाही. जगांतील कांही वस्तू काव्यमय, सौंदर्यपूर्ण आणि कांही गद्य, सौंदर्यशून्य असें विभाजन करणाऱ्या सौंदर्यवाद्यांना त्या शास्त्रांतलें कितपत कळतें हा प्रश्नच आहे. कारण कलेंत प्रकट होणारें विश्व स्वतः सौंदर्यमय नसूनहि कलात्मक आनंद देतें. तेव्हा प्रतिमासृष्टींतहि विशिष्ट प्रकारच्या प्रतिमांचाच उपयोग व्हावा असा दंडक नाही. परंतु आजच्या कवितेचा आशय अधिक सामाजिक असल्यामुळे तो प्रकट करण्यासाठी व्यावहारिक जीवनांतील प्रतिमांचा उपयोग करावासा वाटणें साहजिक आहे. या प्रतीकरूप प्रतिमा निरनिराळीं वातावरणें निर्माण करण्यास समर्थ आहेत आणि म्हणूनच त्यांचा हळूहळू जास्त जास्त उपयोग होऊं पाहत आहे. नवकाव्यांत जसजसा अधिकाधिक सामाजिक आशय येत आहे तसतसें हें अंगहि पुष्ट होत चाललें आहे.

नवकाव्याच्या छंदाचा विचार केल्याशिवाय नवकाव्याविषयीची चर्चा पूर्ण होऊं शकत नाही. नवकाव्यपूर्व कवितांप्रमाणे नवकाव्यांत एकाच

भावनेचें आंदोलन प्रकट होत नाही. नवकाव्य वैणिकप्रधान नाही. नवकाव्याची बैठक बौद्धिक असून जाणिवांच्या निरनिराळ्या अवस्थांचें (stages of consciousness) वर्णन त्यांत असतें. पुष्कळ वेळा या जाणिवांच्या निरनिराळ्या अवस्थांना जोडणारी एक बौद्धिक विचारशृंखला असते. असें असल्यामुळे भावगीतासाठी उपयुक्त असलेले छंद नवकाव्यास गौण वाटणें साहजिकच आहे. सामाजिक जीवनांतील अनेक सत्यांचें आणि जाणिवांचें अंकन करावयास मुक्तछंद अगर तत्सदृश छंदच उपयुक्त आहे याबद्दल दुमत असूं नये. मुक्तछंद अनुभूतीच्या आवेगाबरोबर निर्झरासारखा वेगांत वाहतो किंवा अनुभूतीच्या गहन संथगतीबरोबर विस्तृत आणि मंदलयींत चालतो; भावनेने वळसा घेतल्याबरोबर तोहि तावडतोब वळसे घेऊन वाहूं लागतो; भावनेच्या एकामागून एक प्रकट होणाऱ्या अनेक प्रकारच्या लयींबरोबरच मुक्तछंदहि द्रुत अथवा मंद गतीचा होऊं शकतो ! अनुभूतीचा विस्तार, खोली आणि सामाजिक संदर्भ आपोआपच मुक्तछंदाचा आकार धारण करतो. ज्याप्रमाणे ओवी आणि अभंग यांना मान्यता मिळून त्यांस मानाचें स्थान प्राप्त झालें, त्याचप्रमाणे मुक्तछंदालाहि मिळेल असा विश्वास प्रकट करणें वेडेपणाचें खचित होणार नाही.

मुक्तछंद हें नवकाव्याचें स्वाभाविक अंग आहे. पण म्हणून मुक्तछंदांत लिहिलें जातें तेवढेंच नवकाव्य असा (सोयिस्कर) गैरसमज करून घेण्याचें कारण नाही हें येथेच नमूद केलेलें बरें. मुक्तछंद अगर तत्सदृश छंद यांत अत्याधुनिक काव्य स्वाभाविकपणें प्रकट होऊं शकतें, प्रकट होतें, एवढेंच म्हणावयाचें आहे. ऐतिहासिक आवश्यकतेंतूनच त्याचा जन्म झाला आहे. फॅशन म्हणून, स्वतःची मौलिकता दर्शविण्यासाठी मुक्तछंदाचा आविष्कार झालेला नाही. हा छंद अत्याधुनिक कवितेचें आवश्यक अंग आहे हें दर्शविण्याचा हा प्रयत्न आहे.

समाजप्रवण, समाजास बदलूं पाहणारी वैचारिक बैठक, प्रतिमांचा उपयोग निवळ अलंकरणासाठी न करतां वास्तवतेचें (आजच्या आणि उद्याच्या) प्रकटीकरण करण्यासाठी प्रतिमांचा उपयोग करण्यावर भर आणि

नवछंद हीं नवकाव्याचीं हळुहळू पुष्ट होत असलेलीं ठोकळ वैशिष्ट्यें आहेत. हीं यापूर्वीच्या कवितेंत नव्हतीं; म्हणूनच या काव्यास नवकाव्य म्हणावयाचें.

वरील वैशिष्ट्यें वर उल्लेखिलेल्या 'सिनिकल' काव्यांतहि आढळून येतात; म्हणून त्याचाहि नवकाव्यांत अंतर्भाव होतो. ही तुच्छता सामाजिक विकृतीसंबंधी असल्यामुळे त्या काव्यांत वास्तववादी प्रतिमातंत्र आणि बौद्धिक बैठक हीं आलींच. खरें म्हणजे, टी० एस्० इलियट, शॉ यांसारखे लेखक भांडवलशाही समाजरचनेच्या अंतर्विरोधामुळे दोन महायुद्धांच्या ज्वाळांतून जगले आहेत. त्यांनी फक्त भांडवलशाहीने निर्मिलेल्या वर्गांतील मूल्यांवर कोरडे ओढले तर त्यांत नवल नाही. इलियटसारख्यांवर निराशेची दाट छाया पसरली असली तर तीहि एक वेळ नैसर्गिक—समर्थनीय नव्हे—म्हणतां येईल. औद्योगीकरणाच्या चरमसीमेस पोचलेल्या त्या देशांतील कलावंतांचे प्रश्न आपले होणें शक्य नाही. परंतु तेच प्रश्न जसेच्या तसेच मराठी कवितेंत आणणें स्वाभाविक आहे असें म्हणतां येत नाही. महाराष्ट्राचे आणि भारताचे प्रश्न अगदी निराळे आहेत एवढेंच संक्षिप्तपणें येथे म्हणतां येईल. पाश्चात्यांच्या त्या तुच्छतामूलक वृत्तीची आयात करून सरतेशेवटी ही विचारसरणी आणि कविताधारा अबौद्धिकता, असामाजिकता, आत्मनाश यांनाच प्रोत्साहन देईल यांत शंका नाही. तशीं लक्षणें आताच प्रकट होऊं लागलीं आहेत. ही निराशामूलक तुच्छतावादी वृत्ति विध्वंसक आहे. पुरोगामी मराठी नवकाव्य हें अनैसर्गिक अमानवी जीवनाचा फक्त नाशच करूं इच्छीत नाही तर नवें जग घडवूं इच्छितें. साऱ्या पीडित मानवजातीं-संबंधी खरीखुरी गंभीर सहानुभूति हा पुरोगामी नवकवितेचा आधार आहे. असामाजिक, निराशावादी, अहंवादी आणि परिणामीं बुद्धिविरोधी अशा काव्यधारेचा ऱ्हास होणें अपरिहार्य आहे, असें म्हणणें चुकीचें ठरणार नाही.

आधुनिक जीवन जितकें गुंतागुंतीचें आहे, तितक्याच नानाप्रकारच्या सूक्ष्म छटा माणसाच्या अंतर्विश्वांत निर्माण झालेल्या आहेत. माणसाच्या साऱ्या सहजवृत्तींच्या निरोधनामुळे अवचेतनांत विविध विकृति निर्माण झालेल्या आहेत. नवकवितेंत व्यक्तित्वाच्या साऱ्या भावनांचें आजचें स्वरूप चित्रित

करण्यांत येत आहे. जाणिवेबरोबर नेणिवेची वास्तवता देखील नवकाव्याचा विषय होत आहे. वास्तवता म्हणजे बाह्यतः जें दिसतें तें, अगर ठोकळ वैषम्याच्या भावना नव्हेत. आजच्या जीवनाचें आणि त्यांतील उद्याच्या वास्तवाचें चित्रण जाणिवेबरोबर नेणिवेंतील सहचारी भावबंध स्फुरवून, नाना वातावरणें निर्माण करून, प्रतिमांच्या द्वारें एक भिन्न विश्व सूचित करून, करण्यांत येत आहे. नवकाव्यांत उपयोगांत येणाऱ्या प्रतिमा बऱ्याच वेळा अद्भुत (fantastic) देखील असतात. आमच्या जीवनाच्या भयानकतेकडे जरा तटस्थतेने पाहिल्यास त्यांत एक अद्भुत वातावरणहि आढळून येईल. वरील सर्व गोष्टींमुळे नवकाव्य रसिकांस समजण्यास किंचित् कठिण वाटणें साहजिक आहे. रूढ काव्य वाचावयास सरावलेल्या रसिकांना अडखळल्या-सारखें, अवघडल्यासारखें वाटतें, त्यांनी नवकाव्याची भूमिका एकवार समजून घेतली तर फारसें अवघड वाटावयाला नको. रसिकाच्या एका वर्गास हें नवकाव्य पटूं लागलें आहे. तेव्हा लौकरच सर्वांना समजूं लागेल अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

परंतु रसिक गोंधळांत पडत आहेत ते आणखी एका निराळ्याच कारणामुळे. नवकाव्याच्या या तुच्छतामूलक कविताधारेमुळे त्यांत जीवनाचें विद्रूप अंग दाखविण्याच्या मिषाने तऱ्हेवाईकपणा केला जात आहे. कवीस स्वतःसच माहीत अशा शब्दांची उधळपट्टी करण्यांत येत आहे. मूलतःच हें काव्य असामाजिक वृत्तींतून निपजत असल्याने त्याचें आवाहन आहे त्यापेक्षाहि कमी कमी होत जाईल हेंहि उघडच आहे.

आजचें नवकाव्य प्रयोगावस्थेंतच आहे, पुरोगामी वृत्तीच्या बैठकीवर तें लिहिलें जात आहे. अजून तें सरमिसळ असलें तरी त्यांत त्याचीं वैशिष्ट्यें, त्याचा आकार जीव धरत आहे, असें दिसून येईल. अत्याधुनिक काव्य रूढ काव्यापेक्षा निराळें आहे, नवें आहे, यांतच त्याच्या उज्ज्वल भविष्यकाळाची साक्ष आहे. मराठींत रूढ परंपरेशीं ज्या ज्या वेळीं बंडखोरी करण्यांत आली तेव्हा तेव्हाच महान् काव्य निपजलें. ज्ञानेश्वराने 'जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात' अशी गंभीर घोषणा करण्यासाठी

मराठींत कविता लिहिली. संतकवींनी साऱ्या महाराष्ट्रास एकत्र केलें. वैयक्तिक देवपूजेची, मोक्षाची परंपरा बाजूस सारून साऱ्यांना एकत्र गात, एकत्र नाचत, एकत्रच पंढरीची वारी करावयाला लावलें. आणि हें कार्य करण्यासाठी जन्ममरणाचे फेरे चुकविण्याचें सोडून तुकारामाने 'तुका म्हणे गर्भवासीं सुखें घालावें आम्हासी' अशी घोषणा केली. मराठीची महान् काव्यपरंपरा त्या त्या काळाच्या संदर्भाने पुरोगामी आहे. ज्या ज्या वेळीं पुरोगामी बैठक सुटली तेव्हा तेव्हा कवितेचा ऱ्हासच झाला. आजच्या कवींची तुलना संतांशी करावयाचा माझा इरादा नाही. परंतु नवकवितेची प्रवृत्ति तीच आहे. प्रयोगाचें महत्त्व १९३७ सालीं 'काव्य : परंपरा आणि प्रयोग' या आपल्या भाषणांत कवि अनिलांनी विशद केलें होतें. तेव्हा-पासूनच नवकाव्य मूळ धरत आहे; भाषेची आशयधारणा करण्याची शक्ति वाढवीत आहे. ती अधिकाधिक अभिव्यक्तिक्षम बनत आहे. याच कवितेचें पुष्ट स्वरूप मराठीच्या काव्यपरंपरेंत सामील होईल यांत अगदी शंका वाटत नाही. प्रयोग हें केवळ साधन आहे, साध्य नाही, याची पुरेपूर जाणीव नवकवींस आहे. समाजाचें निव्वळ चित्रण करूनच नव्हे तर त्याला बदलून 'जो जें वांछील तो तें लाहो। प्राणिजात' या आदर्शाला वास्तविक जीवनांत मूर्त करावयाचें आहे. त्यासाठी सतत संघर्ष करावयाचा आहे. तेव्हा या काव्याबद्दल रसिकांच्या मनांत अधिकाधिक आस्था निर्माण होईल यांत शंका नाही.

प्रस्तावना संपली. नवकाव्याची भूमिका स्थूलमानाने दिग्दर्शित करणेंच मर्यादित जागेमुळे शक्य झालें. या कवितासंग्रहाबद्दल आभारप्रदर्शनाचेंच तेवढें कार्य उरलें आहे. आभार मानावयाची रीत जरी बरीचशी औपचारिक असली तरी माझी कृतज्ञता प्रकट करावयाचा तेवढाच एक मार्ग आहे. या कवितासंग्रहाचें प्रकाशन मोठ्या जिव्हाळ्याने अंगावर घेउन संग्रह अगदी अल्प वेळांत छापून प्रसिद्ध करण्यासाठी 'वीणा प्रकाशन'चे प्रकाशक श्री० राजाभाऊ गर्गे यांनी फार आस्था दाखविली आणि श्रम घेतले. मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

माझे प्रिय मित्र श्री० ना० रा० शेंडे यांचा उल्लेख करणें आवश्यक आहे. त्यांनी घेतलेल्या श्रमाबद्दल कोणतेहि शब्द औपचारिक ठरतील हेंच खरें. तसेंच माझे आदरणीय मित्र श्री० दादासाहेब आदालतवाले यांचीच प्रेरणा विशेषेंकरून हा कवितासंग्रह प्रसिद्ध व्हावयास कारणीभूत झाली. मी त्यांचा ऋणी आहें.

—शरच्चंद्र मुक्तिबोध

ग्रंथ संग्रहालय
क्र.
REFBK-0014092
REFBK-0014092